## ७ सीटरमध्ये १३ प्रवासी, ६ ठार

■ वृत्तसंस्था, बालोद, दि. १६ :

छत्तीसगडमधील बालोद जिल्ह्यातील भानुप्रतापपूर-दल्लीझारा रस्त्यावर सोमवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. इतर सात जण गंभीर जखमी आहेत. मृतांमध्ये एक बालक, 4 महिला आणि एका पुरुषाचा समावेश आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने कारला धडक दिली. प्रकरण दौंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चौरापावाडजवळचे आहे.

माहितीनुसार, या वाहनात13 लोक बसले होते, ज्यात 2 मुलांचा समावेश होता. दौंडीहून गुरेडा येथे परतत असताना त्यांचा अपघात झाला. ट्रक आणि झायलोची समोरासमोर धडक झाली. जखमींना राजनांदगाव जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २६० * * नागपूर * | मंगळवार, दिनांक १७ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018



महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात


अग्राग्रलेख

खरीखरी...

## नाराजांची नाराजी

गेल्या अनेक वर्षापासून सतत मंत्री पदावर असलेल्या अनेक बड्या बड्या निवडून आलेल्या आमदारांना देवेंद्रजींच्या नव्या मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. यात प्रमुख म्हणजे अत्यंत कार्यक्षम मंत्री सुधीर मुनगंटीवार, त्यासोबतच ओबीसींचे मोठे नेते छगनराव भुजबळ, त्यानंतर आदिवासींचे कर्तबगार नेते धर्मराव बाबा आत्राम यांचा समावेश आहेच. याशिवाय पुरंदरचे विजय शिवतारे, स्वयंभू नेते रवी राणा, शेतकरी नेते सदाभाऊ खोत, विशेष म्हणजे एका मोठ्या बँकेचे मजूर अध्यक्ष आणि अनेक वेळा निवडून आलेले आमदार या सर्वांची नाराजी नाट्ये काल बघावयास मिळाली. याची परिणिती म्हणून आज मोठ्या प्रमाणावर दोन-दोन, पाच -पाच किलो नाराजी दिसून आली आहे. आता सुधीर भाऊंच्या चंद्रपूरचीच गोष्ट घ्या. एकेकाळी सुधीर भाऊ मंत्रिमंडळातील अत्यावश्यक आमदार होते. 1995 च्या युती सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळातही ते होते. कालपर्यंत 'जेव्हा जेव्हा युती, तेव्हा तेव्हा मुनगंटीवार यांच्याशिवाय नाही गती, अशी होती स्थिती' पण यावेळी चंद्रपूर जिल्ह्यातील अनेकांनी सुधीर भाऊंच्या विरोधात आघाडी उघडली होती. यावेळी सुधीर भाऊंचा विरोध असूनही अपक्ष जोरगेवार यांना भाजपमध्ये घेऊन तिकीट देण्यात आले. तेव्हाच अनेकांच्या डोक्यात ट्यूबलाईट पेटलेला होता. इतरही अनेक बाबी एकाच वेळी एकवटल्या. त्या सर्व बाबींमुळे त्यांचा करेक्ट कार्यक्रम झाला. दुसरे जे ओबीसींचे राष्ट्रव्यापी नेते छगन भुजबळ यांचे बळ जरांगे पाटलांसमोर कमी पडले आणि इतरही काही कारणांमुळे 'छगन मगन प्यारेलाल, करलो कलेवा' असे म्हणत त्यांनाही वाळीत टाकण्यात आले. नागपूर येथील कालच्या अजित दादांच्या मेळाव्यात त्यांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवत होती. शिवसेनेच्या एकेकाळाच्या मुलुख मैदानी तोफेची अशी गत झाली. ही दोन फक्त प्रातिनिधीक उदाहरणे आहेत. यावेळी युतीचे आमदार भलत्याच मोठ्या संख्येने निवडून आले. आपल्या मंत्रिमंडळात तर जास्तीत जास्त 43 मंत्री असू शकतात. पण आता बहुमताच्या आकड्यापेक्षा दीडपट आमदार असल्यामुळे यावेळी नवा फॉमुर्ला शोधण्यात आला. सध्या जे जे नाराज आहेत. त्यांना गप्प करण्यासाठी हे मंत्रिमंडळ अडीच वर्षांचे आहे. असा अडीचकीचा पाढा तीनही पक्षांनी वाचण्याचे ठरवलेले दिसते. सदा न कदा सत्ता पदावर आरुढ असलेले आमचे रामदास भाऊ आठवले यांना देवेंद्र भाऊ विसरलेच कसे, हे त्यांनाही कळले नाही. त्यांनीही आपला घनघोर विरोध बोलून दाखवलेला आहे. भंडा?्याचे आमदार इतके नाराज झाले आहेत की, आमदारकी सोडल्यास इतर सर्व पदांचे त्यांनी चक्क राजीनामे देऊन टाकले. अशा अनेक नाराजींच्या नाट्यछटांचे अनेक प्रयोग आज दिवसभर विधान भवन आणि राज्यभर होत होते. गेल्या मंत्रिमंडळात वर्षानुवर्ष मंत्रीपदे प्रलंबित होतीच. नवीन निवडणूक आली तरी ती मिळाली नाहीत. पण त्या मंत्रिमंडळातही काँग्रेस मधून टुण्णकन उडी मारून शिवसेनेत आलेल्या अब्दुल सत्तार यांना मंत्रिपद देण्यात आले होते. तेही आता विजनवासी झालेले आहेत. एक गोष्ट नक्की आहे. ती ही की, मंत्रिपद मिळाले नाही. तरी जळगाव जामोदचे आमदार संजय कुटे अत्यंत उत्साहाने आपले कार्य करीत होते. 'ठेवीले देवेंद्रे तैसेची रहावे, मंत्रीपदाची अपेक्षा करू नये' अशी अलिप्ततावादी भूमिका घेऊन कुटे साहेब अडीच वर्षांची वाट पाहायला तयार आहेत. असे दिसले. अडीच वर्षांचा हा फॉर्म्युला फक्त काही मंत्र्यांसाठी आहे की, संपूर्ण मंत्र्यांसाठी आहे हे अजून जाहीर झालेले नाही. एक मात्र खरे आहे की कोणी असो किंवा नसो मुख्यमंत्री पदावर मोदींचे लाडके देवेंद्रजीच असतील. याबाबत संपूर्ण जगात कुणालाही शंका नाही. आजचे हे नाराजी नाट्य म्हणजे एक तर तो आमदार दबेल तेव्हा थांबेल, किंवा कोणत्याही स्थितीत थांबणारच नाही. असे आपण समजावे काय ? एकूणच आमदार कमी आले तरी गोंधळ. थोड्याफार बहुमताने आले तर महागोंधळ आणि प्रचंड बहुमताने आले तर गोंधळच गोंधळ. तेव्हा आपणही अधिक विचार न करता, महाराष्ट्राच्या विकासासाठी दूरदृष्टीने झेप घेण्यासाठी तत्पर राहावे. एवढीच सर्वांना आग्रहाची विनंती!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


# मंत्रीपदाची संधी हुकल्याने
# महायुतीत नाराजीनाट्य!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारच्या मंत्र्यांच्या शपथविधी रविवारी संपन्न झाला. भाजपा, शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेकांना डच्चू देण्यात आल्याने महायुतीत नाराजीनाट्य सुरू झाले आहे.

राष्ट्रवादीचे माजी मंत्री छगन भुजबळ यांनी थेट नाराजी व्यक्त केली असून, शिंदे गटाचे भंडाराचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी सरळ एकनाथ शिंदे यांच्यावर तोफ डागली आहे. तिकडे, भाजपाचे आमदार संजय कुटे यांनीही मंत्रीमंडळात स्थान न मिळाल्याने उघड नाराजी व्यक्त केली आहे.

'होय मी नाराज आहे', असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. 'होय मी नाराज आहे, पुढे काय करणार? मी पुन्हा सांगतो मी नाराज आहे' असे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. राज्य मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने छगन भुजबळ नाराज आहेत. मात्र, छगन भुजबळ यांची नाराजी दूर करण्यासाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने प्रयत्न सुरू केले आहेत.

मी एक सामान्य कार्यकर्ता आहे. मला डावलले काय किंवा फेकले काय? कोणाला काय फरक पडतो? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आयुष्यात अनेकदा मंत्रीपदे मिळाली आहेत किंवा किती वेळा ती गेली देखील आहेत. परंतु छगन भुजबळ अद्याप संपला नाही. तुम्ही मंत्रीपदावर मला प्रश्न विचारण्याऐवजी ज्यांनी डावलले, त्यांना विचारायला हवे, असे देखील भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले आहे.

आठ दिवसांपूर्वी मला राज्यसभेवर जा, असे पक्षाकडून सांगण्यात आले होते. मात्र विधानसभा निवडणुकीनंतर आता मी राज्यसभेवर जाण्यासाठी इच्छुक नसल्याचे मी पक्षाला स्पष्टपणे कळवले होते, मला माझ्या मतदारांनी निवडून दिले आहे. मग आता मी जर राज्यसभेवर गेलो, तर ती मतदारांची प्रतारणा ठरेल, असा दावा त्यांनी केला आहे.

ओबीसींचा लढा आणि लाडकी बहिण योजनेमुळे महायुतीला राज्यात चांगले यश मिळाले, मी ओबीसींच्या हक्कासाठी लढत होतो आणि पुढेही लढत राहणार आहे. या माध्यमातून भुजबळ यांनी पक्षाकडे थेट आपली नाराजी व्यक्त केली आहे.



### भाजप आमदार कुटे संतप्त

जळगाव जामोदचे भाजप आमदार संजय कुटे यांनीही कॅबिनेटमध्ये स्थान न मिळाल्याची जाहीर खंत व्यक्त केली आहे. राजकारणात कूटनीति मोठ्या प्रमाणात वापरली जाते. पण ही गोष्ट माझ्या स्वभावात व संस्कारात नसल्यामुळेच माझ्यावर कुठेतरी बाहेर राहण्याची वेळ आली असेल, असे ते भाजपमधील अंतर्गत राजकारणावर भाष्य करताना म्हणाले.

मला पक्षाकडून मंत्रीपदाचे आश्वासन देण्यात आले होते, मात्र, ऐनवेळी दगा झाला. मी आता माझा निर्णय घेणार असल्याचे कुटे म्हणाले.

### भाजपची संधी नाकारल्याचा पश्चाताप...

राज्य मंत्रिमंडळात संधी न मिळाल्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत खदखद वाढली आहे. भंडारा विधानसभा मतदारसंघाचे आमदार नरेंद्र भोंडेकर यांनी या प्रकरणी एकनाथ शिंदेंवर उघड नाराजी व्यक्त करत शिवसेनेत गेल्याचा पश्चाताप होत असल्याचा दावा केला आहे. शिवसेनेत मागून आलेल्यांना न्याय मिळतो. पण आम्हाला नाही. भाजप प्रवेशाचा आग्रह असताना आम्ही शिवसेनेत आलो त्याचा आता पश्चाताप होत आहे, असे ते म्हणालेत.

महायुती सरकारचा रविवारी मंत्रिमंडळ विस्तार झाला. त्यात नरेंद्र भोंडेकर यांना स्थान मिळाले नाही. यामुळे नाराज झालेल्या भोंडेकर यांनी आपल्या शिवसेना उपनेतेपदाचा राजीनामा दिला. तसेच शिवसेनेत आल्याचा पश्चाताप होत असल्याचेही संतप्त मत व्यक्त केले. ते म्हणाले, मागील अडीच वर्षांपूर्वी 10 अपक्ष आमदारांपैकी मी सर्वप्रथम एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला. कोणताही स्वार्थ न ठेवता मी त्यांच्यासोबत गेलो. तेव्हा त्यांनी मला शब्द दिला होता. आपले सरकार आल्यानंतर तुम्हाला सन्मानाने मंत्रिपद देऊ असे ते म्हणाले होते. पण त्यानंतरही त्यांनी ते मला दिले नाही. त्यानंतरही आम्ही त्यांच्यासोबत राहिलो. पण अडीच वर्षांनंतर पक्षप्रवेशाची वेळ आली तेव्हा आमच्यात पुन्हा चर्चा झाली. मागे मंत्रिपद नाही, महामंडळही दिले नाही.

पण आता नव्या सरकारमध्ये तुम्हाला मंत्रीपद देऊ असे शिंदे यांनी मला शब्द दिला. आमच्यात बोलणे झाले तेव्हाही त्यांनी मला शपब्द दिला. एवढेच नाही तर जाही सभेतही त्यांनी ते बोलून दाखवले. पण प्रत्यक्षात आम्हाला काहीच मिळाले नाही.

भोंडेकर पुढे म्हणाले, शिवसेनेत आमच्या मागून आलेल्यांना मंत्रिपदे मिळाली. पण पक्षासोबत प्रामाणिक राहणा?्यांना मिळत नाही. त्यामुळे पदावर राहून काहीच उपयोग नाही. शिवसेनेत नेता, उपनेता हे मोठे पद असते. 6 जिल्ह्यांचे समन्वयक पद आहे. पण कोणतीही चर्चा नाही. कोणतीही विचारपूस नाही. कोणतीही संधी नाही. मला जनतेला न्याय देता येत नसेल तर पदावर राहून काय उपयोग? त्यामुळे मी माझ्या पदाचा राजीनामा दिल्याचे आमदार भोंडेकर यांनी यावेळी सांगितले.

## ..तर विरोधकांना राजकीय उत्तर!



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

विधीमंडळात चर्चा करण्याची तयारी असेल, तर खोटे बोलू नका, असे आव्हान अंबादास दानवे यांनी सरकारला केले होते. त्यांच्या या आव्हानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले. आम्ही चर्चा करायला तयार आहोत. पण विरोधकांनी राजकारण करायचे ठरवल्यास त्यांना राजकीय उत्तर मिळेल, असे फडणवीस म्हणाले. तसेच सुधीर मुनगंटीवार यांना विशिष्ट जबाबदारी देण्याचा पक्षाचा मानस असल्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात घेतले नसल्याचे ते म्हणाले.

विधीमंडळात चर्चा करण्याची तयारी असेल, तर खोटे बोलू नका, असे आव्हान विधान परिषद विरोधी पक्षनेता अंबादास दानवे यांनी सरकारला केले होते. या आव्हानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. विरोधकांनी महत्वाच्या विषयांवर हवी ती चर्चा करावी. सरकार उत्तर द्यायला सक्षम आहे. सरकार कुठलीही बाजू लपवून ठेवणार नाही, मागे-पुढे पाहणार नाही. मात्र विरोधकांनी केवळ राजकारण करायचे ठरवले, तर राजकीय उत्तर मिळेल, असे सडेतोड उत्तर देवेंद्र फडणवीस यांनी अंबादास दानवे यांना दिले.

35 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडलेल्या आहेत. त्या सर्व मागण्या चर्चेनंतर लवकरच मंजूर होतील, असे फडणवीसांनी सांगितले. ते म्हणाले, महाराष्ट्राचा अर्थसंकल्प 6 लाख कोटींपेक्षा मोठा आहे. आपला अर्थसंकल्प 2-अडीच लाख कोटींचा होता, तेव्हाही 15 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या मांडायचो. जेव्हापासून आपण नवीन अकाउंटींग सुरू केल्यापासून पुरवणी मागण्यांची संख्या वाढलेली आहे.

काँग्रेस पक्षाला ओबीसींबद्दल बोलायचा अधिकार नाही. काँग्रेसने त्यांच्या उभ्या आयुष्यात ओबीसींवर अन्याय करण्याच्या व्यतिरिक्त काहीही केले नाही. महाराष्ट्रातील ओबीसी मंत्रालय मी मुख्यमंत्री असताना स्थापन झाले. मी आणि शिंदे साहेब असताना ओबीसी समाजासाठी बरीच कामे केली आहेत. काँग्रेसने केलेले दाखवण्यासारखे एकही काम नाही.

काँग्रेसमध्ये नाना पटोले आणि विजय वडेट्टीवार यांच्यावर जो अन्याय होतो, त्याचा राग आमच्यावर न काढता योग्य ठिकाणी काढावा, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लगावला. सुधीर मुनगंटीवार आमचे ज्येष्ठ नेते आहेत. पक्षाने काही लोकांना मंत्रिमंडळात न घेण्यामागे त्यांना काही विशिष्ट जबाबदारी देण्याचा मानस तयार केला आहे. मुनगंटीवार अनुभवी नेते आहेत. केंद्रीय पक्षाने त्यांच्याबद्दल काही विचार करूनच त्यांना मंत्रिमंडळात घेतलेले नाही, असे स्पष्टीकरण देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

## एक देश एक निवडणूक विधेयक संसदेच्या पटलावर नाही

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १६:

एक देश-एक निवडणुकीशी संबंधित दोन विधेयकांना नुकतीच केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली होती. विधेयक सोमवारी लोकसभेत मांडण्यात येणार, अशी माहिती देण्यात आली. सरकारकडूनही याची तयारी सुरू होती.

तथापि, सुधारित कार्यसूची आली तेव्हा यात विधेयकाचा उल्लेख नाही. सध्या यावर कोणतेच अधिकृत वक्तव्य आलेले नाही. विधेयक न आणण्याचा निर्णय का घेण्यात आला व आता हे विधेयक कधी आणले जाईल हेदेखील स्पष्ट नाही.

तथापि, केंद्र सरकार आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवे आयकर विधेयक आणणार नाही. ही शक्यता अर्थ मंत्रालयाने फेटाळली.

हे विधेयक कधी मांडले जाईल, याबाबत अनिश्चितता आहे.

## दोन्ही सभागृहांचे कामकाज स्थगित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर नागपूर मध्ये आज अधिवेशनाचा पहिलाच दिवस चांगलाच गाजला. विधानसभेत परभणी तर विधान परिषदेत बीड प्रकरणावरुन विरोधक आक्रमक झाले.

दोन्ही सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले. सरकार कोणत्याही चर्चेला तयार असून दोषींवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दोन्ही सभागृहात दिली. नंतर दोन्ही सभागृहाचे कामकात स्थगित करण्यात आले.

विधानपरिषदेत अंबादास दानवे यांनी परभणी आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाचे विषय उपस्थित केले. यावर मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतरही विरोधकांचे समाधान झाले नाही. परिणामी, कामकाज तहकुब करण्यात आले. विधानसभेत शोक प्रस्ताव मांडण्यात आल्यानंतर उद्या सकाळपर्यंत विधानसभेचे कामकाज स्थगित करण्यात आले. मंगळवारी सकाळी विधानसभेचे कामकाज सुरु होणार आहे.

## शहडोलमध्ये पारा १ अंशावर



■ वृत्तसंस्था, भोपाल, दि. १६:

डोंगराळ भागात झालेल्या बर्फवृष्टीमुळे देशाच्या उत्तरेकडील राज्यांमध्ये हिवाळा तीव्र होत आहे. मध्य प्रदेशात सात दिवसांपासून थंडीची लाट सुरू आहे. सोमवारी शहडोल येथील तापमान 1.0 अंशांवर पोहोचले आहे. अन्य भागातही तापमान घसरले आहे.


चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार
मा.किशोरभाऊ जोरगेवार
यांच्या वाढदिवसाच्या निमित्त
हार्दिक शुभेच्छा!


मा.सुरज मोरपाका
यंग चांदा बिग्रेड घुग्घुस


# सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणावरून संताप!


## सोमनाथ यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचा स्पष्ट उल्लेख; पोलिस कोठडीत झाला होता मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६:

परभणी येथील आंदोलक सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टेम रिपोर्ट अर्थात शवविच्छेदन अहवाल समोर आला आहे. त्यात त्यांचा मृत्यू मारहाणीमुळेच झाल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. परिणामी, आंबेडकरी अनुयायांत संतापाची तीव्र लाट उसळली आहे. विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही या प्रकरणाचे पडसाद उमटले.

परभणी शहरात गत आठवड्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापुढील संविधानाची विटंबना करण्यात आली होती. या घटनेचे शहरात तीव्र पडसाद उमटले होते. आंदोलकांनी वाहनांची प्रचंड तोडफोड केली होती. त्यानंतर पोलिसांनी केलेल्या कोम्बिंग ऑपरेशनमध्ये अनेकांना अटक करण्यात आली होती. त्यात 35 वर्षीय सोमनाथ सूर्यवंशी यांचाही समावेश होता. सोमनाथ सूर्यवंशी यांचा रविवारी पोलिस कोठडीत संशयास्पद मृत्यू झाला. यामुळे आंबेडकरी समाजात संतापाची तीव्र लाट उसळली होती.





वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी सूर्यवंशी यांचा पोस्टमार्टेम ऑन कॅमेरा करण्याची मागणी केली होती. त्यानुसार सोमनाथ सूर्यवंशी यांचे छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. या शवविच्छेदनाचा अहवाल समोर आला आहे. त्यात सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाल्याचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे.

या रिपोर्टमध्ये मृत व्यक्तीच्या अंगावर मारहाणीच्या अनेक खुणा स्पष्टपणे दिसत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

### सरकारची सविस्तर चर्चेची तयारी - फडणवीस

बीड, परभणी येथील घडलेल्या दोन्ही घटना गंभीर आहेत. या घटनासंदर्भात सविस्तर चर्चा करण्याची सरकारची तयारी असून संविधानचा अपमान सहन केला जाणार नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्पष्ट केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेबांच्या संविधानानुसार अपेक्षित चर्चा सभागृहात झाली पाहिजे. संविधानाचा अपमान करणारा व्यक्ती मनोरुग्ण होता. विरोधी पक्षाने राजकारण न करता अशा घटना घडू नयेत यासाठी चांगल्या सूचना मांडाव्यात अशी अपेक्षा देखील मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. नाना पटोले यांनी यासंदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्थगन प्रस्ताव दरम्यान सविस्तर चर्चा करण्यात येईल असे स्पष्ट केले.

आरोपी कोणत्याही पक्षाचा, जातीचा, भाषा बोलणारा असला तरी त्याच्यावर कारवाई करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मात्र, सभागृहात एखाद्या मंत्र्यांकडे निर्देश करणे, योग्य नसल्याचेही त्यांनी दानवे यांना सुनावले. गुन्हेगाराला आम्ही सोडणार नसल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे. बीडचे सरपंच हत्या प्रकरण गंभीर असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे. आरोपींना वाचवा असा कोणताही दबाव किंवा फोन सरकारला आलेला नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.


चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार
मा.किशोरभाऊ जोरगेवार
यांच्या वाढदिवसाच्या निमित्त
हार्दिक शुभेच्छा!


मा.संतोष नुने
माजी.सरपंच घुग्घुस

## संक्षिप्त

### कंटेनरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी

नाशिक-ठाणे वाहिनीने मुंब्र्याकडे जाणाऱ्या दुचाकीस्वारास भरधाव कंटेनर चालकाने जोरदार धडक दिली असता झालेल्या अपघातात दुचाकी स्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.मो. समिर मो.मुस्तफा हाश्मी (३९) असे अपघातात मयत पावलेल्या तरुणाचे नाव आहे.याप्रकरणी अज्ञात कंटेनर चालकाच्या विरोधात कोनगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,फिर्यादी शाबुद्दिन मुसा शेख हे मुंब्रा येथील यादव नगर मध्ये राहत असून त्यांचे मयत साडू मो.समीर हाश्मी हे शाबुद्दीन याच्याकडे १२ डिसेंबर रोजी सकाळी पाउणे सात वाजता जाण्यासाठी दुचाकी क्र.एम एच ०४ एल व्ही ६७१५ ने नाशिक - ठाणे वाहिनीने जात असताना पिंपळास फाटा या ठिकाणी आला असता त्यास पाठीमागून आलेल्या अज्ञात कंटेनर चालकाने जोरात धडक दिली.या अपघातात दुचाकीस्वारास डोक्यास व उजव्या हातास गंभीर दुखापत होऊन अतिरिक्त स्त्रावाने समिरचा जागीच तडफडून मृत्यू झाला आहे.दरम्यान कोनगाव पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह शवविच्छेदना करिता येथील शासकीय स्व.इंदिरा गांधी रुग्णालयात पाठवला आहे. याप्रकरणी कोनगाव पोलिस ठाण्यात अज्ञात कंटेनर चालकाच्या विरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह मोटर वाहन कायदा कलम १३४ (अ)(ब),१८४ न्वये गुन्हा दाखल केला असून पोलिस सिसीटिव्ही च्या आधारे फरार ट्रक चालकाचा शोध घेत आहेत.पुढील तपास पोउनि निलेश वाडकर करीत आहेत.

### राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठाच्या वतीने माहिती अधिकार विषयक विशेष कार्यशाळा उत्साहात संपन्न

नवी मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 ची अंमलबजावणी करतांना शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना येणा-या अडचणींचे निराकरण व्हावे व त्यांना अधिनियमाची सर्वांगीण माहिती व्हावी या दृष्टीने माहितीचा अधिकार विषयक एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असून या माध्यमातून कायद्याची उजळणी होईल व माहिती अधिकार अन्वये प्राप्त होणा-या अर्जांवर योग्य कार्यवाही होउन अपिलांची संख्या कमी होईल असा विश्वास महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या कोकण खंडपीठाचे आयुक्त श्री. शेखर चन्ने यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कोकण खंडपीठाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका व यशदा, पुणे यांच्या सहयोगाने महापालिका मुख्यालयातील ज्ञान केंद्रात आयोजित माहितीचा अधिकार अधिनियम 2005 – एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. याप्रसंगी नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, अतिरिक्त आयुक्त श्री. सुनिल पवार, प्रशासन विभागाचे उपआयुक्त श्री. शरद पवार, शहर अभियंता श्री. शिरीष आरदवाड उपस्थित होते. आयोगाच्या वतीने उपसचिव श्रीम. रीना फणसेकर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यशाळेमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेसह कल्याण डोंबिवली, मिरा भाईंदर, उल्हासनगर, पनवेल महानगरपालिकेचे जनमाहिती अधिकारी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

### लहान भावाला मारल्याचा जाब विचारणाऱ्या मोठ्या भावावर चाकू हल्ला

भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी

चौघांनी आपसात संगनमत करून लहान भावाला मारल्याने त्याचा जाब विचारणाऱ्या मोठ्या भावाला चौघांनी लाथा बुक्क्यांसह एकाने चाकू हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना शांतीनगर परिसरातील फातिमा नगर येथून समोर आली आहे.याप्रकरणी चौघांवर शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सादिक अली अन्सारी (२८) असे हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर शहबाज शहा,फारुक शेख,सुफियान अंन्सारी,सदरे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे असून घटनेनंतर ते फरार झाले आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,शांतीनगर हद्दीतील फातिमा नगर येथील अनमोल हॉटेल समोर जखमी सादिक आणि त्याचा भाऊ माजिद कुटुंबासह राहत आहेत.दरम्यान १३ डिसेंबर रोजी रात्री साडे आठ वाजेच्या सुमारास आरोपी चौघांनी माजीद यास अनमोल हॉटेल जवळ मारहाण केली.याचा जाब माजीद चा भाऊ साजिद ह्याने चौघांना विचारला असता या गोष्टीचा राग येवून चौघांनी आपसात संगनमताने साजिद ला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.तर आरोपी शहबाजने त्याच्याकडील चाकूने साजिद च्या पाठीवर वार करून त्यास गंभीर जखमी केले आहे.त्याच्यावर येथील रुग्णालयात उपचारा नंतर चौघांवर शांतीनगर पोलिस ठाण्यात भा.न्या. सं.कलम ११८(१),११५(२) सह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पोलिस फरार आरोपींचा शोध घेत आहेत.

### सियाराम कापडाच्या बनावट मालाची विक्री करणाऱ्यावर गुन्हा दाखल

भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी

सियाराम कंपनीच्या बनावट शर्ट आणि पँट पिसची विक्री करणाऱ्या तरुणाच्या विरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच्याकडून बनावट दीड लाखांचा कपड्याचा माल जप्त करण्यात आला आहे.यश पांडुरंग लायगुडे (२२ ) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,यश कचेरी पाड्यात राहत असून त्याचा लाहोटी कंपाऊंड मध्ये पूजा कलेक्शन नावाने शर्ट,पँट पिसचा दुकान आहे.दरम्यान तो सियाराम सिल्क मिल्स लिमि.कंपनीच्या बनावट ट्रेडचा वापर करून सियाराम कंपनीचे ब्रँड ॲम्बेसीडर अभिनेते रणवीर सिंह यांचा फोटो छापलेला बनावट बॉक्स व त्यावर सियाराम मिनिटर अशा शब्दात लीहलेल्या बॉक्समध्ये बनावट शर्ट आणि पँट पिस ची जोडी विक्री करताना आढळून आला आहे.याप्रकरणी यशच्या विरोधात नरेंद विजय वेडवाल यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिस ठाण्यात प्रतीलीपी अधिकार अधिनियम १९५७ चे कलम ६३ न्वये गुन्हा दाखल करून त्याच्याकडून १ लाख ५५ हजार ५२७ रुपये किमतीचा बनावट पँट, पिस कपड्याचे एकूण १७३ बॉक्स पोलिसांनी जप्त करून यशला भा.ना.सु.सं. कलम ३५ (३) अन्वये नोटीस देण्यात आली आहे.पुढील तपास सपोनि दिनेश महाले करीत आहेत.

# इंस्टाग्रामवरील जाहिरातीवर क्लिक करणे पडले महागात

## 71 लाखांची फसवणूक, रशियन आरोपीला अटक

पुणे, दि. १६ : प्रतिनिधी




सोशल मीडिया हे जीवनातील अविभाज्य घटक झाला आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, टेलिग्राम, एक्स या ॲपवर आपण दिवसभर ॲक्टिव्ह असतो. पण हेच सोशल मीडियाचे प्लॅटफॉर्म आपल्याला महागात ही पडू शकतात. पिंपरी- चिंचवडमधील संगणक अभियंत्याची ७१ लाखांची फसवणूक करण्यात आली आहे.

इन्स्टाग्रामवर आलेल्या जाहिरातीवर क्लिक केल्यानंतर त्यांना शेअर मार्केटच्या ग्रुपमध्ये ॲड करून चांगले रिटर्न देण्याचं आमिष दाखवून तब्बल ७१ लाखांची फसवणूक केली. घटनेप्रकरणी सायबर पोलिसांनी गोवा राज्यातून रशियन आरोपीला अटक केली आहे. आरोपी टोनीच्या माध्यमातून सर्व सूत्र पुण्यात राहणारा आरोपी श्रेयस संजय माने बघायचा त्याला देखील पोलिसांनी आधीच बेड्या ठोकल्या आहेत.

सविस्तर माहिती अशी, तक्रादार हे इन्स्टाग्रामवर रिल्स पाहात होते. रिल्स पाहात असताना त्यांना जाहिरात दिसली आणि कुठलाही विचार न करता त्यावर त्यांनी क्लिक केलं. काही क्षणातच वेगवेगळ्या नंबर वरून शेअर मार्केटच्या व्हाट्स ग्रुपला त्यांना ॲड करण्यात आलं. शेअर मार्केटमध्ये चांगले रिटर्न मिळवून देण्याच आमिष दाखवलं. फेक वेबसाइटवरून शेअर मार्केटचे स्टॉक आणि आयपीओ ट्रेंडिंग करण्यास सांगून ७१ लाखांची फसवणूक करण्यात आली. घटनेप्रकरणी संगणक अभियंता असलेले तक्रादार यांनी पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसात धाव घेतली. तक्रार नोंदवण्यात आली. सायबरचे पोलीस निरीक्षक स्वामी यांच्या टीमने तपास करण्यास सुरुवात केली. ज्या बँक खात्यात पैसे गेले ते बँक खाते गोवा राज्यात वापरलं असल्याचं तपासात पुढे आलं.

सायबर पोलिसांची टीम गोवा येथे गेली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने रशियन आरोपी टोनीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या. आरोपी श्रेयसला आधीच पोलिसांनी अटक केली आहे. श्रेयस हा मित्रांकडून गेमिंगच्या नावाने बँक खाते आणि मोबाईल लिंक घेऊन तो विमानाने गोव्याला जायचा. तिथं टोनीसोबत संपर्क साधून त्याच्याकडून सायबर गुन्हे करवून घेत असल्याचे समोर आलं आहे. गुन्ह्यातील रक्कम दुबई आणि इतर ठिकाणी वळवण्यात आली आहे. रशियन आरोपी टोनीचा शोध गुजरात पोलीस देखील घेत होते. प्रकरणी मार्क, श्रेयस आणि टोनी तिघेजण सायबर गुन्हे करत असल्याचं उघड झालं आहे. पैकी, दोघांना अटक करण्यात आली आहे.

# तरुणीच्या हत्या प्रकरणी मारेकऱ्याला जन्मठेपेची शिक्षा

ठाणे, दि. १६ : प्रतिनिधी



ठाण्यातील एका तरुणीच्या हत्या प्रकरणी मारेकरी आकाश पवार याला ठाणे न्यायालयाने आजन्म कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. २०१८ मध्ये एकतर्फी प्रेमातून आकाश पवार याने भररस्त्यात तरुणीची चाकूने हल्ला करून हत्या केली होती.

ठाण्यातील एका महाविद्यालयात तरुणी शिकत होती. ४ ऑगस्ट २०१८ या दिवशी सकाळी ११ वाजता ती पूर्व द्रुतगती महामार्गावरून जात असताना आकाश पवार याने तिला भर रस्त्यात गाठले. आकाश पवार हा तिच्यावर एकतर्फी प्रेम करत होता. त्यास नकार दिल्याने आकाश याने तिच्यावर चाकूने हल्ला करत तिची हत्या केली होती. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून आकाश पवार याला पोलिसांनी अटक केली होती. त्याच्या विरोधात ठाणे सत्र न्यायालयात ३१ अक्टोबर २०१८ मध्ये नौपाडा पोलिसांनी शवविच्छेदन आहवाल, साक्षीदार यांचे जबाब, प्रत्यक्षदर्शींचे जबाब नोंदवून न्यायालयात आरोप पत्र सादर करण्यात आले.

या प्रकरणात सरकारी वकील ए.पी. लाडवंजारी यांनी न्यायालयात बाजू मांडताना भक्कम पुरावे, २१ साक्षीदार यांच्या जबाबासह पोलिसांनी मिळविलेले सीसीटीव्ही चित्रीकरण, साक्षीदारांचे जबाब सादर केले. त्यांनी न्यायालयात सादर केलेले पुरावे ग्राह्य मानून न्यायमूर्ती ए.बी. अग्रवाल यांनी आकाश पवार याला दोषी ठरवून आजन्म कारावासाची शिक्षा आणि ५० हजारांच्या दंडाची शिक्षा सुनावली आहे.

# नवी मुंबईत 7 ठिकाणी 12 कोटींचे ड्रग्ज जप्त

## 11 नायजेरियनना अटक; पहाटेपर्यंत धाडसत्र सुरु

नवी मुंबई, दि. १६ : प्रतिनिधी

थर्टी फर्स्टच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबईत सात ठिकाणी छापे टाकण्यात आले. या कारवायांमध्ये १२ कोटींचे ड्रग्ज पोलिसांच्या हाती लागले आहे. याप्रकरणी ११ नायजेरियन नागरिकांना अटक करण्यात आली आहे. गुरुवारी रात्रीपासून शुक्रवारी पहाटेपर्यंत पोलिसांचे हे धाडसत्र शहरभर सुरू होते.

नवी मुंबईत ड्रग्ज विक्रेत्यांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. गतवर्षी खारघर येथे नायजेरियन व्यक्तींच्या अड्ड्यावर छापा टाकून थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांमध्ये पुरवले जाणारे ड्रग्ज जप्त केले होते. त्यानुसार यंदाही थर्टी फर्स्टच्या अगोदरच पोलिसांनी ड्रग्ज विक्रेत्या टोळ्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्याची मोहीम राबवली. पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकामार्फत ड्रग्ज विक्रीत सक्रिय असलेल्या नायजेरियन टोळ्यांची माहिती मिळवली होती. त्याद्वारे गुन्हे शाखा व स्थानिक पोलिसांच्या पथकांनी गुरुवारी रात्री एकाच वेळी परिमंडळ एक व दोनमधील सात ठिकाणी छापे टाकले.

वाशी, कोपर खैरणे, नेरूळ, तळोजा, खारघर परिसरात वास्तव्याला असलेल्या नायजेरियन व्यक्तींची झाडाझडती घेण्यात आली. त्यात ८ नायजेरियन व्यक्तींकडे एकूण १२ कोटींचे विविध प्रकारचे ड्रग्स मिळून आले, तर तीन नायजेरियन व्यक्ती बनावट कागदपत्रांद्वारे भारतात वास्तव्य करत असल्याचे समोर आले. या एकूणच कारवाईत ११ नायजेरियन नागरिकांना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

**शहरात आश्रय**

दीड वर्षांपूर्वी अशाच प्रकारे पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अमली पदार्थ विक्रीचे रॅकेट चालवणाऱ्या नायजेरियन व्यक्तींवर सर्जिकल स्ट्राइक केले होते. त्यानंतर अनेकदा ठिकठिकाणी छापे टाकून ड्रग्ज विक्री करणाऱ्या टोळक्यांचे कंबरडे मोडण्याचे काम पोलिसांमार्फत झाले आहे. त्यानंतरदेखील नायजेरियन व्यक्तींकडून शहरात छुपा आश्रय मिळवून ड्रग्ज विक्रीचे रॅकेट चालवले जात असल्याचे या कारवाईतून दिसून येत आहे.



# माथेरानमध्ये घोड्यांच्या संख्येला 'लगाम'?

## ⏭ हरित लवादाच्या सुनावणीकडे लक्ष

## ⏭ त्रिसदस्यीय समितीने केली होती पाहणी

माथेरान, दि. १६ : प्रतिनिधी



संवेदनशील माथेरानमध्ये वाहतुकीसाठी ४६० घोडे व मालवाहतुकीसाठी ३०० ते ३५० घोडे सेवेत आहेत. घोड्यांची संख्या वाढल्याने तीन टन लीद जमा होत असते. त्याची विल्हेवाट लावण्याची कोणतीही यंत्रणा पालिकेकडे नाही. येथील पर्यावरण धोक्यात आले आहे. याबाबत हरित लवादाकडे याचिका दाखल केली होती. त्रिसदस्यीय समितीने ३ दिवसांपूर्वी पाहणी केली.

ही समिती आपला अहवाल हरित लवादाकडे सादर करणार असून याप्रकरणी २३ डिसेंबरला होणाऱ्या सुनावणीत लवाद कोणता निर्णय घेणार याकडे येथील अश्वचालकांचे लक्ष आहे. माथेरान हे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र आहे. त्यामुळे येथे इंधनावर चालणाऱ्या वाहनांना बंदी आहे.

दळणवळणाचे साधन म्हणून येथे घोडा व हात रिक्षाचा वापर केला जातो. अलीकडे ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या आहेत. येथे प्रवासी वाहतुकीसाठी सध्या ४६० घोडे व मालवाहतुकीसाठी ३०० ते ३५० घोडे सेवेत आहेत. मात्र, त्या तुलनेत ६६ तबेले आहेत. घोड्यांच्या जमा होणाऱ्या लीदची विल्हेवाट लावण्याची नगरपालिकेकडे कोणतीही यंत्रणा नाही.

परिणामी पर्यावरणावर याचा परिणाम होत आहे. ही समस्या मांडणारी याचिका सामाजिक कार्यकर्ते सुनील शिंदे व केतन रमाणे यांनी पुणे येथील राष्ट्रीय हरित लवादाकडे केली होती. यावर २५ ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली.

यात हरित लवादाचे न्यायाधीश शिओ कुमार सिंग व पर्यावरणतज्ज्ञ डॉ. विजय कुलकर्णी यांनी तीनसदस्यीय समिती गठित करून माथेरानची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

**या ठिकाणी केली पाहणी**

पर्यावरण विभागाचे डॉ. थुरू (शास्त्रज्ञ श्रेणी), प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऋतुजा भालेराव, माथेरान पालिकेच्या अधिकारी यांनी सोबत शरलोट लेक, दस्तुरी नाका येथील बोरीचे मैदान व सिम्पसन टँक व इतर परिसराची पाहणी केली.

**'त्या' निर्णयाची पुनरावृत्ती होणार?**

हिमाचल प्रदेश येथील कुफ्री येथेही हीच समस्या होती. याबाबत हरित लवादाने अश्वचालकांचे पुनर्वसन करून घोड्यांची संख्या कमी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. त्यामुळे माथेरानमध्येही हा निर्णय लागू होणार का, अशीही चर्चा सुरू आहे.

# पुण्यातील रस्त्याची राष्ट्रपतींनी घेतली दखल!

## राज्याच्या मुख्य सचिवांना दिल्या सूचना

पुणे, दि. १६ : प्रतिनिधी

शहरातील वाहतूक कोंडी आणि त्यातून मार्ग काढताना वाहन चालकांना होणारा त्रास यावर उपाययोजना कराव्यात यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या पुणे महापालिकेकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या. मात्र त्याचा कोणताही परिणाम झाला नाही. केवळ आश्वासने दिली गेली.

पुणे शहराचा चारही बाजूंना होणारा विस्तार आणि वाढत असलेली लोकसंख्या या तुलनेत वाहतुकीसाठी कमी पडणारे रस्ते यामुळे शहरातील अनेक भागात सदा सर्वदा वाहतूक कोंडीचा त्रास पुणेकरांना सहन करावा लागतो. धायरी भागातील नागरिकांनाही गेल्या अनेक वर्षांपासून या वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. महापालिकेच्या विकास आराखड्यात (डी पी) मध्ये प्रस्तावित करण्यात आलेले रस्ते तयार करून ते वाहतुकीसाठी उपलब्ध करून द्यावेत. यामुळे वाहतुकीची समस्या कमी होईल, नागरिकांना दिलासा मिळेल यासाठी धायरी परिसरातील प्रस्तावित चार डीपी रस्ते सुरू करावेत, यासाठी येथील नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे अनेकदा पाठपुरावा केला. राज्य सरकारचे दरवाजे ठोठावले मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे या भागातील नागरिकांनी हा प्रश्न राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दरबारात मांडण्याचा निर्णय घेतला. धायरी भागात होत असलेली वाहतूक कोंडी आणि त्यामुळे नागरिकांना होत असलेल्या मनस्तापाची तक्रार या भागातील नागरिकांनी राष्ट्रपतींकडे केली. आपल्या त्रासाची माहिती टपाल कार्यालयाच्या माध्यमातून पत्राद्वारे राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आली. या पत्राची दखल घेत राज्याच्या मुख्य सचिवांना राष्ट्रपतींनी सूचना देखील केल्या आहेत.

धायरी येथील प्रलंबित डीपी रस्त्यांची दखल थेट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी घेतली असून, प्रलंबित रस्त्यांच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही करावी, अशा सूचना राज्याच्या मुख्य सचिवांना केल्या आहेत. याबाबतचे पत्र राष्ट्रपती कार्यालयाकडून पाठविण्यात आल्याने २८ वर्षांपासून रखडलेले हे रस्ते तयार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर यांनी याबबात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना निवेदन पाठविले होते. त्याची दखल घेण्यात आली आहे. शहरातील विकास आराखड्यात (डीपी) प्रस्तावित केलेले अनेक रस्ते कागदावरच आहेत. धायरी येथील चार रस्ते डीपीमध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. मात्र, गेल्या २८ वर्षांपासून त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही. या रस्त्यांना पर्यायी रस्ते उपलब्ध नसल्याने धायरी गावासह इतर रस्त्यांवर वाहतूककोंडीची समस्या गंभीर झाली आहे. या भागात सतत होत असलेल्या कोंडीमुळे नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले आहेत. हे डीपी रस्ते विकसित करून नागरिकांची वाहतूककोंडीतून सुटका करावी, अशी मागणी या भागातील रहिवाशांनी अनेकदा महापालिकेकडे केली आहे. मात्र, त्याची दखल महापालिकेकडून घेण्यात आली नव्हती. राज्य सरकारकडेदेखील स्थानिकांनी पाठपुरावा केला होता.

सिंहगड रोड ते धायरी सावित्री गार्डन हा डीपी रस्ता तयार करण्यासाठी महानगरपालिकेने आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचा खर्च करूनही हा रस्ता कागदावरच आहे. वाहतूककोंडीच्या त्रासाची दखल कोणीही घेत नसल्याने स्थानिकांनी आणि आम आदमी पक्षाचे शहराध्यक्ष धनंजय बेनकर यांनी याची तक्रार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे करून त्यांना निवेदन दिले होते. त्याची दखल घेत राष्ट्रपती कार्यालयाने धायरी गावातील डीपी रस्त्यांच्या समस्येवर योग्य ती कार्यवाही करावी. त्याची माहिती बेनकर यांना द्यावी, अशी सूचना राज्याच्या मुख्य सचिवांना दिली आहे. त्याची एक प्रत राष्ट्रपती कार्यालयाने बेनकर यांनाही दिली आहे. याबाबत बेनकर म्हणाले, 'विकास आराखड्यात प्रस्तावित असलेल्या धायरी येथील सावित्री गार्डन ते सिंहगड रोड या रस्त्यावर गेल्या चार ते पाच वर्षांत कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले आहे. एवढा खर्च करूनही मध्यभागी जेमतेम चारशे मीटर इतकेच काम करण्यात आले आहे. उर्वरित काम अनेक वर्षे प्रलंबित आहे. वाहतूक नियंत्रित करण्यासाठी येथे पुरेसे पोलीस कर्मचारी, होमगार्ड, वाहतूक वॉर्डन नसतात. अनेकदा वाहतूक नियंत्रक दिवे बंद असतात. त्यामुळे धायरीगाव रस्त्यासह धायरी, नऱ्हे, नांदेड फाट्यापासून नांदेड सिटी, लगड मळा ते धायरी फाटा या रस्त्यावर वाहतूककोंडीची गंभीर समस्या बनली आहे. २८ वर्षांपूर्वी या चार डीपी रस्त्यांचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, महापालिका, राज्य सरकार यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करूनही केवळ दुर्लक्ष केले जाते. नागरिकांच्या समस्येची दखल घेतली जात नसल्याने राष्ट्रपती मुर्मू यांना निवेदन देण्यात आले होते. त्यांनी याची दखल घेत मुख्य सचिवांना सूचना केल्या आहेत.

धायरीतील डीपी रस्त्याच्या समस्येबाबत महापालिका प्रशासन, राज्य शासन यांच्याकडे अनेकदा पाठपुरावा करण्यात आला. मात्र, याबाबत दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांनी उपोषणाचा पवित्रा घेतला होता. राष्ट्रपतींनी निवेदनाची दखल घेतल्याने हा प्रश्न आता मार्गी लागेल, असा विश्वास धनंजय बेनकर यांनी व्यक्त केला.

# भिवंडीतील काल्हेर कोपर परिसरातील दोस्ती बिल्डर विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन; खा.बाळ्या मामा यांचे बिल्डरच्या प्रवेशद्वारावरच ठिय्या आंदोलन

भिवंडी, दि. १६ : प्रतिनिधी

तालुक्यातील कोपर काल्हेर परिसरातील दोस्ती गृप या बांधकाम व्यावसायिकाने स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला मागील अनेक वर्षांपासून न देता जमिनी बळकावल्या असून स्थानिक शेतकऱ्यांना प्रकल्पात कोणतेही काम मिळत नसून उलट शेतकऱ्यांवर गुंडांकरवी दादागिरी केली जात असल्याचा आरोप करत शनिवारी स्थानिक शेतकऱ्यांनी कोपर काल्हेर येथील दोस्ती बिल्डरच्या मुख्य प्रवेश द्वारावर आंदोलन केले.या आंदोलनाप्रसंगी भिवंडी लोकसभेचे खा. बाळ्या मामा दाखल होत त्यांनी बांधकाम व्यावसायिक मालकांशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला असता पोलिसांनी त्यांना प्रवेश द्वारावर अडवले होते.यावेळी बराच वेळ प्रवेशद्वारावर अडवून ठेवत शेतकऱ्यांच्या कोणत्याही मागण्या बांधकाम व्यावसायिक मान्य करत नसल्याने संतप्त खासदार बाळ्या मामा यांनी दोस्ती गृप बिल्डरच्या प्रवेश द्वारावर थेट खाली बसून ठिय्या आंदोलन केले.जोपर्यंत शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही,तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार अशी भूमिका खा.बाळ्या मामा यांनी घेतली होती.पोलिसांनी खासदारांना विनंती करत आंदोलन स्थगित करण्याची वारंवार विनंती केली,मात्र जोपर्यंत शेतकऱ्यांना जमिनींचा मोबदला मिळत नाही,स्थानिक शेतकऱ्यांना काम मिळत नाही व येथील गावगुंडांची दादागिरी थांबत नाही,तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील अशी भूमिका खा.बाळ्या मामा यांनी घेतली होती.तब्बल तीन तास सुरू राहिलेले आंदोलन शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला आजच्या बाजारभावा नुसार देणे व स्थानिक भूमिपुत्रांना या ठिकाणी काम देणे या मागण्या मान्य केल्या नंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.या आंदोलनात असंख्य शेतकरी व स्थानिक नागरिक मोठया संख्येने सहभागी झाले होते.येथील शेतकऱ्यांवर दोस्ती बिल्डरने केलेल्या अन्याया विरोधात शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आपण



या आंदोलनात सहभागी झालो असून बिल्डर ने दहा ते पंधरा वर्षांपूर्वी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या पण आजपर्यंत व्यवहार पूर्ण केलेले नाहीत. शेतकरी काम मागायला गेले की ते त्यांना काम न देता माजी खासदारांच्या बंगल्यावर जाण्याचा सल्ला बिल्डर देत असून,येथे त्यांच्या कुटुंबीयांची गुंडांची दादागिरी सुरू आहे.ज्या शेतकऱ्याने जमीन दिली नाही.त्याच्या जागेत जबरदस्तीने माती भराव करून नंतर शेतकऱ्यांना उलट तुमची जमीन कोठे आहे ? ती दाखवा असा प्रश्न केला जातो.प्रशासनाची मदत घेऊन गुंडांच्या माध्यमातून बिल्डर दादागिरी करीत आहे,त्याला पोलिस प्रशासन ही मदत करीत असून आम्ही यापूर्वी सुध्दा बिल्डर सोबत चर्चा केली,परंतु त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने आमच्यावर आंदोलनाची वेळ आली असून आमच्या शेतकऱ्यांना न्याय मिळे पर्यंत हे आंदोलन सुरू राहील अशी प्रतिक्रिया भिवंडी लोकसभेचे खासदार बाळ्या मामा यांनी दिली आहे.

# मुख्याध्यापकाची शिक्षिकेकडे शरीर सुखाची मागणी

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १६ :

मुख्याध्यापकाने शिक्षिकेकडे शरीर सुखाची मागणी केल्याचा धक्कादायक प्रकार अकोला जिल्ह्यात समोर आला आहे. अकोला जिल्ह्यातील अकोट येथील एका शाळेत हा प्रकार घडला. याप्रकरणी पीडिताच्या तक्रारीवरून मुख्याध्यापकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, आरोपीवर कोणतीही कारवाई होत नसल्याने पीडिताने आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या घटनेने जिल्ह्यातील शिक्षण वतुर्ळात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, पीडिता ही भाजप नेत्याची मुलगी आहे.

अकोट शहरातील एका शाळेत शिक्षिका असलेल्या तरुणीकडे शाळेतील मुख्याध्यापकाने शरीर सुखाची मागणी केली होती. तसेच मागील काही दिवसांपासून ते मानसिक त्रास देत असल्याचा आरोप या शिक्षिकेने केला आहे. या प्रकरणी पीडित शिक्षिकेच्या तक्रारीवरून मुख्याध्यापकाविरोधात अकोट शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, गुन्हा दाखल होऊनही मुख्याध्यापकावर कुठलीही कारवाई होत नसल्याचा आरोपही या पीडित शिक्षिकेने केला आहे. त्यामुळे मुख्याध्यापकाला तात्काळ अटक करण्यात यावी.

तसेच त्याचे निलंबन करावे, या मागणीसाठी पीडित शिक्षिका अकोल्यातील जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसली आहे. परंतु या संपूर्ण प्रकरणावर शिक्षण विभाग आणि पोलिस विभाग मौन बाळगले आहे.

दरम्यान, आरोपी मुख्याध्यापकाच्या पत्नीने देखील उपोषणकर्त्या शिक्षिकेविरोधात तक्रार दाखल केली आहे. शिक्षिका ब्लॅकमेल करत असल्याचे मुख्याध्यापकाच्या पत्नीने तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे या दोन्ही प्रकरणातील गुन्ह्यांमध्ये सत्य बाहेर काढण्याचे काम अकोट शहर पोलिसांना करावे लागणार आहे.

गेल्या काही महिन्यात लैंगिक अत्याचाराच्या घटनांमुळे शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाल्याचे पाहायला मिळाले. बदलापूर येथील एका शाळेत बाल लैंगिक अत्याचार आणि पुण्यातील बस चालकाने अल्पवयीन मुलींसोबत केलेल्या कृत्याने राज्यभरात संतापाची लाट उसळली होती.

अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी शाळा आणि शिक्षणाधिकारी यांनी काळजी घेतली, तर राज्य सरकारने कठोर नियमावली बनवली. परंतु आता शाळेतील महिला कर्मचारीबाबत असाच काहीसा प्रकार समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

# सुपरस्पेशालिटीत आंतर रुग्ण सेवेला होणार प्रारंभ

## दहा आरोग्य सेवा विभागांमध्ये प्रत्येकी २० या प्रमाणे रुग्णालयात नवीन २०० बेडची व्यवस्था

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १६ :



येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न सुपर स्पेशालिटी रुग्णालयात मंगळवार, १७ डिसेंबरपासून आंतररुग्ण सेवा सुरु होणार आहे. त्यासाठी कार्यरत दहा आरोग्य सेवा विभागांमध्ये प्रत्येकी २० या प्रमाणे रुग्णालयात नवीन २०० बेडची व्यवस्था करण्यात आली आहे.त्या दृष्टीने मनुष्यबळ आणि तांत्रिक सुविधांची उपलब्धता काही प्रमाणात करण्यात आली आहे. याच दिवशी रुणालयातील आंतरविभागात अँजिओप्लास्टीची पहिली शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

१ ऑगस्ट २०२२ पासून येथील सुपरस्पेशालिटी रुग्णालयात बाह्यरुग्ण विभाग रुग्णसेवेत कार्यान्वित आहे. या रुग्णालयात कार्डियोलॉजी, न्यूरोलॉजी, नेफ्रॉलॉजी, न्यूरोसर्जरी, प्लास्टिक सर्जरी, रेडियोलॉजी विभागात केवळ बाह्यरुग्ण सेवा उपलब्ध होती. आता विभागांसह पॅथॉलॉजी, अँनेस्थेसियोलॉजी, यूरोलॉजी, युरोसर्जरी व न्यूजओनेटोलॉजी हे पाच नवीन विभाग मिळून दहा विभागांत आंतररुग्ण सेवा सुरु होत आहे. सुपर स्पेशालिटी रुग्णालयात १० नवीन विभाग कार्यान्वित होतील. सहा विभागात आयसीयू सेवाही उपलब्ध होईल. सर्वोपचार रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या बाह्य रुग्ण कक्षातून संदर्भित रुग्णांवर येथे उपचार होतील.

२० तज्ज्ञ डॉक्टरांची आणखी गरज सुपर स्पेशालिटी रुग्णालयात आंतररुग्ण सेवा सुरु करण्यासाठी अधिपरिचारिका व चतुर्थ श्रेणी कर्मचारी संख्या पुरेशी आहे. सध्या ९ सहयोगी प्राध्यापक आणि १२ वरिष्ठ निवासी डॉक्टर-प्राध्यापक आहेत.

# आमदार वानखडेंनी घेतला तिवसा तालुक्याचा आढावा

■ महासागर प्रतिनिधी, तिवसा, दि. १६ :

तिवसा तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत आमदार राजेश वानखडे यांनी तालुक्यातील विविध कामांचा आढावा घेतला. बैठकीत शेतकरी तसेच नागरिकांकडून प्राप्त प्रकरणे जागीच निकाली काढण्यात आली. या प्रसंगी प्रलंबित प्रकरणांचा जलद गतीने निपटारा करण्याच्या सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

आढावा बैठकीला तहसीलदार, बीडीओ, नायब तहसीलदार, पंचायत, पाटबंधारे, महसूल, कृषी, जलसंधारण, क्रीडा, आरोग्य, महिला व बालकल्याण, वन विभाग, सामाजिक वनीकरण, ग्रामीण रुग्णालय, सहकार, विद्युत, भूमि अभिलेख आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत तालुक्यातील घरकुले, शेतरस्ते मातीकाम, खडीकरण व मजबूतीकरण, शेत रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड, फळबाग लागवड, स्मशानभूमी कामे, वनीकरण, जल जीवन मिशन अंतर्गत कामे, गोठे, शेततळे, आरोग्य सुविधा, जंगली जनावरे आदींसह महावितरण, पाणीपुरवठा व सार्वजनिक बांधकामांसह इतर विभागांशी निगडित कामांचा आढावा घेण्यात आला. या प्रसंगी आमदारांनी उपस्थित अधिकाऱ्यांना फळबाग लागवड केलेल्या शेतकऱ्यांना प्राधान्याने अनुदान मंजूर करावे, घरकुल लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध करून त्यांना लाभ द्यावा, पाणंद व गाडीरस्ते अतिक्रमण मुक्त करून त्याचे मातीकाम करावे, शासनाने मंजूर केलेली तसेच जिल्हा नियोजन निधीमधून मंजूर झालेली सर्व कामे विहित वेळेत पूर्ण करावी.

तालुका स्तरावर मूलभूत, अल्पसंख्याक विकास, सामाजिक न्याय, तांडा वस्ती तसेच जिल्हा वार्षिक योजना निधी अंतर्गत गावातील जनसुविधा योजना त्वरित जॉबचे वितरण करावे आदी सूचना दिल्या. या बैठकीला या अधिकाऱ्यांसह सर्वच विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी, सरपंच, मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रीय अल्पसंख्याक दिनानिमित्त अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडवावे

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १६ :



राष्ट्रीय अल्पसंख्याक दिन दरवर्षी १८ डिसेंबर रोजी देशभरात साजरा केला जातो. अल्पसंख्याक दिनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक दिन उत्साहात साजरा करून अल्पसंख्याकांचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व शैक्षणिक प्रश्न सोडवण्यासाठी उपाययोजना राबवण्यात याव्या, अशी मागणी ओपन मुस्लिम कोअर कमिटीने करण्यात आली आहे. या संदर्भात कमिटीच्या वतीने नुकतेच जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे.

अल्पसंख्याक दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना व शिक्षकांना निमंत्रित करून कार्यक्रम आयोजित केला जातात. उपरोक्त कार्यक्रमात अल्पसंख्याक समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी कोणतेही ठोस प्रयत्न केले जात नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे येत्या १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या अल्पसंख्याक दिनानिमित्त मुस्लिम सेवाभावी संस्था आणि सामाजिक क्षेत्रात सक्रिय सहभाग घेणाऱ्या लोकांना अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी आमंत्रित करावे.

सध्याच्या काळात विशेषतः पोलिस खाते, शिक्षण विभाग, महसूल विभाग, राष्ट्रीयीकृत बँका आणि इतर सरकारी कार्यालयांमध्ये मुस्लिम अल्पसंख्याक समाज संख्याच्या तुलनेत सर्वाधिक मागासलेला आहे. त्यामुळे मुस्लीम समाजाला समाजाच्या प्रगतीसाठी पुढे नेण्यासाठी प्रशासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे. अशी मागणी ओपन मुस्लिम कोअर कमिटी बुलडाणा यांनी केली आहे. यावेळी हाजी सय्यद बिलाल, मोईनोद्दीन काझी, शेख जुनेद, इक्बाल अहेमद, सय्यद जुनेद, शेख जावेद, जुबेर खान, सय्यद आसिफ, अ‍ॅड.सैयद आरिफ, अ‍ॅड.राज शेख, आदिल भाई, अशरफ भाई, दानिश अजहर, इक्बाल टेलर, हाफिज रईस, कलीम खान, मुबश्शीर अहेमद, मुजफ्फर, अब्दुर्ररहेमान खान, शेख नदीम, नजीर भाई, शेख रहीम, शेख शोएब, नईम भाई उर्फ शानु, रशीद साहेब, शहेजाद नवाब, शेख सलीम, सय्यद मुजीब डोंगरे, शफिक खान, मो.नईम शानु, जुबैर मोहम्मद खान, कय्युम खान आदि उपस्थित होते.

# जैन मंदिरातून साठ हजारांचा ऐवज पळवला

■ महासागर प्रतिनिधी
सिंदखेडाराजा, दि. १६ :

स्थानिक चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिरातून चोरट्यांनी चांदीच्या छत्र्या आणि अभिषेक पात्र असा ६१ हजार रुपयांच्या ऐवज चोरून नेला. ही घटना शुक्रवार, दि. १४ डिसेंबर रोजी पहाटे उघडकीस आली.

शहरातील मध्यवस्तीत असलेल्या या चंद्रप्रभू दिगंबर जैन मंदिरात यापूर्वीही दोनवेळा चोरीच्या घटना घडल्या आहेत. मंदिरातून एकदा महावीर प्रभूंची प्राचीन मूर्ती चोरीला गेली होती, तर अन्य एका घटनेत मंदिरातील अन्य ऐवज चोरीस गेला होता. शुक्रवारी पहाटे चोरट्यांनी मंदिराच्या मुख्यद्वाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर गाभाऱ्यातील मूर्तीवर असलेल्या चांदीच्या छत्र्या आणि जुने अभिषेक पात्र असा ऐवज चोरून नेला. यावेळी मंदिरातील दानपेटी फोडण्याचाही प्रयत्न केला.

# आतातरी टेक्स्टाइल पार्कचा विषय मार्गी लागण्याची आशा

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. १६ :

टेक्स्टाइल पार्कचा विषय मार्गी लागेल का? जिल्ह्यात आरोग्य, शिक्षण, कृषी व महत्वाचा उद्योग हा विकासाचा आत्मा आहे. शाश्वत विकासाची ही लक्षणे असले तरी आमदार आकाश फुंडकर यांना कोणते मंत्रीपद मिळते. त्या पदाचा फायदा ते जिल्ह्याला कसे करुन देतील? यावर सर्वांचे लक्ष राहील. खामगावात टेक्स्टाइल पार्क व्हावा, ही स्व. भाऊसाहेब फुंडकर यांची इच्छा पूर्ण करण्याचे एक आव्हानच त्यांच्यासमोर असून इतर विकासाची कामेही मार्गी लावतील, अशी अपेक्षा आहे.

खामगाव विधानसभा मतदार संघाचे सलग तिसऱ्यांदा निवडून आलेले भाजप महायुतीचे आमदार अ‍ॅड.आकाश फुंडकर यांची राज्य मंत्रिमंडळात वर्णी लागली असून रविवारी नागपुरातील राजभवनात अ‍ॅड. फुंडकर यांनी पहिल्यांदा मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. आमदार आकाश फुंडकर हे भाजपचे ज्येष्ठ नेते माजी कृषी मंत्री स्व. भाऊसाहेब फुंडकर यांचे सुपुत्र आहेत.

विधानसभा निवडणूक सन २०१४,२०१९, आणि आता २०२४ च्या निवडणुकीत ते तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून आले. ३१ वे मंत्री म्हणून घेतली शपथ मी शपथ घेतो की.. राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार रविवारी नागपूर आतील राजभवनात पार पडला. यावेळी आमदार आकाश फुंडकर यांनी ३१ वे मंत्री म्हणून मंत्रिपदाची शपथ घेतली. यावेळी शपथ घेताना त्यांनी "मी शपथ घेतो की.. मी आकाश सुनीता पांडुरंग उपाख्य भाऊसाहेब फुंडकर, असे म्हणत त्यांनी शपथ घेतली.

# शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करुन देण्याची केली मागणी

# अल्टीमेटम संपताच गावकऱ्यांच्या अन्नत्याग आंदोलनाला सुरूवात

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १६ :



जिल्हयातील देऊळगावराजा तालुक्यातील अनेक गावांत सिंचन समस्या निर्माण होत आहे. ही समस्या तत्काळ सोडवण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली होती. या मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास १५ पासून अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता.

या अल्टीमेटमकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने १५ डिसेंबर पासून अनेक गावांतील शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील शिवणी आरमाळ परिसरात अन्नत्याग आंदोलनास सुरूवात केली आहे.

शेतकऱ्यांनी काही दिवसापूर्वीच देऊळगावराजा तालुका प्रशासनाला निवेदन देण्यात आले होते. तालुक्यातील अंढेरा, शिवणी आरमळ, धोत्रा नंदई, सुरा, नागनगाव, पाडळी शिंदे, सावखेड नागरे, मेंडगाव, बायगाव, गुंजाळा, आसोला, सेवानगर आदी भागाला धरण उशाशी असताना देखील पाणी मिळेना झाले आहे.

अंढेरा येथील रामेश्वर लघु प्रकल्प तसेच गुंजाळा परिसरातील असोला, अंढेरा, गुंजाळा लघु प्रकल्प, मेंडगाव परिसरातील लघु प्रकल्प, शिवणी आरमाळ शिवारातील शिवणी आरमाळ लघु प्रकल्पामध्ये खडकपूर्णा धरणातून अतिरिक्त पाणी नदीत सोडले जाते. हे पाणी डाव्या बाजूच्या कालव्यात जात नसल्याने या भागातील शेकडो शेतकऱ्यांची शेती ही सिचंनापासून वंचित राहत आहे. या परिसराला ही पाणी उपलब्ध करुन द्या अशी मागणी परिसरातील नागरिकांनी अनेकवेळा केली आहे. परंतु याकडे प्रशासनाचे सातत्याने द दुर्लक्ष होत आहे. यंदाच्या वर्षी झालेल्या जोरदार पावसाने खडकपूर्णा धरण शंभर टक्के भरले आहे.

त्यामुळे परिसरातील सर्वच गावांना सिंचन सोय होईल असे गावकऱ्यांना वाटत होते.मात्र या भागात अद्यापही पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी परिसरासाठी कोणतीही योजना राबवा व पाणी उपलब्ध करुन द्या, अशी मागणी केली होती. या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आल्यास १५ डिसेंबरपासून उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला होता. त्या अनुशंगाने आता शेतकऱ्यांनी आपले उपोषण प्रारंभ केले आहे.

या उपोषणात कैलास नागरे, उमेश आरमाळ, रामप्रसाद पऱ्हाड, दत्ता नागरे, परमेश्वर सोनुने, गणेश आरमाळ, विशाल वायाळ, आनंदा कायंदे, सचिन सोनुने, सुनील पवार, गजानन आरमाळ, पंढरी आरमाळ, दीपक राठोड, योगेश आरमाळ आदी शेतकऱ्यांचा समावेश आहे.

# जिल्ह्यात मत्स्य व्यवसायासाठी १३ हजारांवर जलक्षेत्र

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १६ :

जिल्ह्यात एकूण १०६ पाटबंधारे तलाव, ६२५ जिल्हा परिषद तलाव, ५० ग्रामपंचायत तलाव, जवळपास ५ हजार शेततळी असून मत्स्यव्यसायासाठी एकूण १३ हजार ८२३.५० हे जलक्षेत्र उपलब्ध आहे. या गोड्या पाण्याचे जलक्षेत्रात कोळंबीचे भारतीय प्रमुख कार्प जसे कटला, रोहू व मृगल प्रजातींच्या माशाचे उत्पादन घेतात. जिल्ह्यात काही मत्स्यव्यावसायिक करत असलेल्या गोड्या पाण्यातील कोळंबी संवर्धनाचा अपवाद वगळता यामध्ये बहुतांश मत्स्यकास्तकार हे आपल्या मालकीच्या किंवा ठेक्याने घेतलेल्या तलावात भारतीय प्रमुख कार्प जातीच्या माशांचे मत्स्योत्पादन घेतात. तथापि अशा जलक्षेत्रामध्ये गोड्या पाण्यात वाढणाऱ्या कोळंबीचे भारतीय प्रमुख कार्प जसे कटला, रोहू व मृगल प्रजातींच्या माशांबरोबरच गोड्या पाण्यातील कोळंबीचे संवर्धन केल्यास मत्स्यकास्ताकारांना व शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने अधिक फायदेशीर ठरु शकेल.

जिल्ह्यातील मत्स्यकास्ताकारांना व शेतकऱ्यांना कोळंबी संवर्धनाचे तंत्रज्ञान व त्यासंदर्भात जनजागृती व्हावी व उत्पन्नात वाढ व्हावी याकरता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीच्या मंजुरीने कोराडी येथे हा गोड्या पाण्यातील कोळंबी संवर्धनाचा पथदर्शक प्रकल्प राबवण्यात येत आहे.

# आरोपींचा शोध घेण्याऐवजी आंबेडकरी समाजावर गुन्हे दाखल करा

## संविधानाचा अवमान, सम्राट अशोक प्रतिष्ठानचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. १६ :



संविधान अवमान प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा, अशी मागणी सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीम शक्ती संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली. सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचा डाव असून, आरोपींचा शोध घेण्याऐवजी आंबेडकरी समाजावरच गुन्हे दाखल करण्यात येत असून, हे प्रकार थांबवावेत, अशीही मागणी केली आहे.

परभणीत समाजकंटकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ काचेत ठेवलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची तोडफोड केली. याप्रकरणी एका माथेफिरूला अटक केली. संतप्त जमावाने या व्यक्तीला चोप दिला होता. अवमानानंतर बंदची हाकही दिली. बंदला हिंसक वळण लागले होते. त्यामुळे पोलिसांनी आंदोलकांवर गुन्हे दाखल करून अटकसत्र राबवले. दरम्यान याप्रकरणी सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीम शक्ती संघटनेने अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. परभणी येथील आंबेडकरी समाजाच्या झालेल्या आंदोलनासाठी राज्य सरकार जबाबदार असून, सरकारच्या नाकर्तेपणामुळे आंबेडकरी समाजाला रस्त्यावर यावे लागले. या प्रकरणातून महाराष्ट्राचे सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्याचा डाव आहे, असा आरोप सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीम शक्ती संघटनेने केला. सामाजिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योग्य पावले उचलावीत, अशीही मागणी केली आहे. हे निवेदन सम्राट अशोक प्रतिष्ठानने मुख्यमंत्री यांच्या नावे अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

याप्रसंगी प्रा विजय आठवले, प्रा. डॉ बाळकृष्ण खंडारे, भीम शक्तीचे प्रदेश सरचिटणीस मधुसूदन भटकर, अनिल गवई,अनिल तायडे, रवींद्र पळसपगार, प्रा. सुनील कांबळे, विद्याधर मोहोड,संदेश गवई, प्रा. शैलेश इंगळे, बी.जी.इंगळे आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान हा दुर्दैवी असून, या घटनेतून नवनिर्वाचित राज्य सरकारचा नाकर्तेपणा सुद्धा समोर आला आहे. अवमान होणे गंभीर बाब असतानाही प्रशासनाने तत्काळ सूत्रधारांनाही अटक करायला पाहिजे होते. मात्र दुदैवाने शासनाने कठोर पावले उचलली नाहीत. परिणामी परभणी येथील आंबेडकरी समाजाला रस्त्यावर येऊन आंदोलन करावे लागले आरोपीचा शोध घेण्याऐवजी पोलिस प्रशासनाकडून आंबेडकरी समाजावर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत सरकारच्या नाकर्तेपणाचा व पोलिस कारवाईचा निषेधही निवेदनातून केला आहे.

सम्राट अशोक प्रतिष्ठान व भीम शक्ती संघटनेने काही मागण्या केल्या आहेत. या मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा निवेदनातून दिला. परभणी येथील संविधान प्रतिकृती अवमान करणा?्या सर्व आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल करून कारवाई करावी. परभणी शहरातील आंबेडकरी तरुणांवर सुरू असलेली पोलिस कारवाई थांबवावी.

# दत्त जयंतीनिमित्त पान्हेरा येथे शोभायात्रा

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १६ :

तालुक्यातील पान्हेरा खेडी येथे दरवर्षी प्रमाणे या वर्षी देखील दत्त जयंती उत्साहात पार पडली. त्यामध्ये सकाळपासूनच विविध कार्यक्रमांच्या रेलचेलसह शोभायात्रा काढण्यात आली. यात लेझीम पथक मिरवणुकीचे आकर्षण बिंदू ठरले. हा कार्यक्रम नुकतेच पार पडला.

दरम्यान, यावेळी गावात सकाळी पूजावसर, देवपूजा वंदन, मंगलस्थान, पंचावतार उपहार, आरती करण्यात आली. यावेळी फटाक्यांच्या आतिषबाजीत, बॅन्डच्या नांदनिनादात महिला मंडळाच्या लेझीम पथकासह शोभा यात्रा पार पडली. त्यानंतर धर्मकुमारी पूजा शास्त्री यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर गावातील मान्यवर प्रकाश जाधव, संजय तायडे, गोकुळ वैराळकर, संतोष किन्होळकर, प्रदीप शिंदे यांच्या तर्फे महाप्रसाद वितरित करुन जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विनोद गारवे, निंबाजी किन्होळकर, सुभाष गुरुजी, शिवाजी वैराळकर, दत्ता पाटील, दत्ता वैराळकर, अनिल पाटील, सुदर्शन रहाणे, बाळु रहाणे, भरत रहाणे, रामभाऊ गहाळणे, अनिल काकर, शांताराम वैराळकर, सुरेश, रामराव किन्होळकर आदिंची उपस्थिती होती.

# लोक अदालतीमध्ये ५२ कोटींचा दंड वसूल

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १६ :



राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलडाणा तथा वकील संघाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील सर्वच न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५ हजार ६७४ प्रकरणे निकाली काढण्यात आली, त्यापोटी ५१ कोटी ८० लाख ४३ हजार ९८१ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. ही लोक अदालत शनिवार १४ डिसेंबर रोजी घेण्यात आली.

दरम्यान, जिल्हा न्यायालय बुलडाणा येथे आयोजित राष्ट्रीय लोक अदालत मध्ये विशेष पॅनल तयार करण्यात आले होते. यात जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष एस. सी. मुनघाटे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बुलडाणा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधीश आर. एन. मेहेरे, मुख्य न्याय दंडाधिकारी श्रीमती एस. आर. गायकवाड, सहन्यायाधीश दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर डी.पी.काळे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर डी. पी. काळे, सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठस्तर पी.बी.देशपांडे, सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठस्तर श्रीमती पी.ए. खंडारे बुलडाणा यांना नियुक्त करण्यात आले होते. या पॅनलने बँक, ग्रामपंचायत, नगर परिषद, तसेच वाहतूक शाखा, भारतीय दूरसंचार निगम तसेच राज्य विद्युत वितरण कंपनी यांचे दाखल पूर्व ५१ हजार ५७५ प्रकरणे दाखल असलेल्या प्रकरणातील ४७७२ प्रकरण निकाली काढले. त्यापोटी शासनाला २ कोटी ४० लक्ष ८० हजार ४७४ रुपयांचा तडजोड वसूल करण्यात आला.

तर न्यायालयातील प्रलंबित १३ हजार ५५९ प्रकरणे यावेळी ठेवण्यात आली होती. त्यातील ९०२ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यापोटी ४९ कोटी ३९ लक्ष ६३ हजार ५०७ रुपये तडजोड शुल्क वसूल करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील एकूण ६५ हजार १३४ प्रकरणातील ५ हजार ६७४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून त्यापोटी ५१ कोटी ८० लक्ष ४३ हजार ९८१ रुपयांचा तडजोड शुल्क वसूल करण्यात आला. यशस्वितेसाठी जिल्हा वकील संघाचे सर्व विधिज्ञांनी योगदान दिले. दिव्य मराठी विशेष. विशेष पॅनलच्या सदस्यांनी साडे पाच हजार प्रकरणे काढली निकाली.

# "कामापासून विभक्त" होण्याचा मानवी अधिकार आवश्यक!

**भारतामध्ये खासगी क्षेत्रात 24/7 म्हणजे दिवसाचे 24 तास व आठवड्याचे सातही दिवस कंपनीशी बांधील असण्याची कुप्रथा आहे. जगभरातील अनेक देशात "राईट टू डिस्कनेक्ट" नावाचा म्हणजे कामापासून विभक्त होण्याचा कायदा संमत होण्यास प्रारंभ झाला आहे. भारतात त्याबाबत फार काही प्रगती झालेली नाही. सध्या तरी ते मृगजळ आहे. दुसरीकडे कामाच्या प्रचंड ताणामुळे जीव गमवावा लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या वाढताना दिसत आहे. यानिमित्ताने 'राईट टू डिस्कनेक्ट' या संकल्पनेचा केलेला उहापोह.**

---------------

**प्रा. नंदकुमार काकिर्डे**

---------------

जगभरातील प्रगत देशांमध्ये कामगारांच्या हिताच्या दृष्टिकोनातून नवनवीन कायदे तयार केले जात आहेत. यामध्ये प्रत्येक कामगाराचे कामाचे दिवस किंवा दररोजचे तास हेही निश्चित करण्यात येत आहेत.

काही महिन्यापूर्वीच बेल्जियममध्ये याबाबतचा एक महत्त्वपूर्ण कायदा संमत करण्यात आला. त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यातील फक्त चार दिवस कामाचे निश्चित केलेले आहेत. त्यामुळे या कायद्यानुसार बेल्जियम मधील नागरी सेवकांना कोणत्याही कारवाईची भीती न बाळगता कार्यालयीन वेळेनंतर त्यांचे अधिकृत कामाचे ईमेल, भ्रमण दूरध्वनी बंद करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

याचा अर्थ असा आहे की अधिकृत कार्यालयीन वेळेनंतर कोणत्याही संवादाची देवाण-घेवाण करण्याचा त्यांच्यावर कोणताही दबाव राहणार नाही. एवढेच नाही तर असे त्याने केल्यामुळे त्या कर्मचाऱ्यांची नोकरी ही जाणार नाही. या अधिकाराला "राईट टू डिस्कनेक्ट म्हणजे कामापासून विभक्त होण्याचा अधिकार असे संबोधले जाते.

या कायद्याची जागतिक पातळीवर काय व्याप्ती आहे याचा विचार केला तर फ्रान्सने याबाबतचा कायदा सर्वप्रथम 2001 मध्ये संमत केला. पोर्तुगाल, स्पेन व आयर्लंड, जपान यांनी कामापासून विभक्त होण्याचा कायदा केला आहे. अलीकडेच ऑस्ट्रेलियामध्येही हा कायदा संमत झाला आहे.

जर्मनीमध्ये हा कायदा जरी अधिकृतरित्या अस्तित्वात आलेला नसला तरी तेथील मोठ्या कंपन्यांमधून कामाच्या वेळेनंतर कर्मचाऱ्यांशी संपर्क न साधण्याचे धोरण अस्तित्वात आहे. अनेक युरोपियन देशांनी तेथील कर्मचाऱ्यांना कामापासून विभक्त होण्याचा अधिकार किंवा 'राईट टू डिस्कनेक्ट' चा अधिकार बहाल केलेला आहे. त्यांच्या कडे प्रत्येक कर्मचाऱ्याला कामापासून विभक्त करण्याचा, कामाशी संबंधित कोणत्याही इलेक्ट्रॉनिक कम्युनिकेशन पासून वेगळे व दूर राहण्याचा अधिकार दिलेला आहे.

यामुळे कर्मचाऱ्यांच्या अधिकृत कामाच्या कालावधी व्यतिरिक्त ईमेल आणि इतर संदेशांशी कनेक्ट रहाण्याची आवश्यकता दूर होते. त्याच्या प्रकृतीवर आणि मानसिक स्वास्थ्यावर कोणताही विपरीत परिणाम होऊ नये म्हणून हा अधिकार महत्त्वाचा असल्याने अनेक युरोपियन देशांनी त्याची अंमलबजावणी केलेली आहे. प्रत्येक कर्मचाऱ्यांचे जगणे अधिक आनंदाचे करण्यासाठी हा राईट टू डिस्कनेक्ट म्हणजे कामावरून घरी गेल्यानंतर कोणतेही कार्यालयीन फोन दूरध्वनी न घेण्याचे किंवा कोणत्याही ई-मेल ला उत्तर न देण्याचे स्वातंत्र्य प्रत्येक कर्मचाऱ्याला कायद्यानुसार देण्यात आलेले आहे.

आजच्या घडीला सरकारी नोकर असो किंवा खाजगी सेवांमधील कर्मचारी असो




त्यांना 24 तास म्हणजे अहोरात्र वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीच्याद्वारे संपर्कात राहण्याचे किंवा सतत संभाषण करण्याचे मोठे दडपण असते.

एखाद्या कर्मचाऱ्याने अशा प्रकारचा अशा प्रकारचे संभाषण केले नाही किंवा वरिष्ठांना काही उत्तर दिले नाही तर त्यांची त्यांच्या नोकरीवर गदा येण्याचा मोठा धोका असतो. सरकारी क्षेत्रात नोकरी जाण्याचे दडपण नसले तरी खासगी क्षेत्रामध्ये अशा कर्मचाऱ्यांची तडकाफडकी नोकरी जाऊ शकते.

तीनचार वर्षांपूर्वी करोना महामारीने जगभरामध्ये नवीन कार्य संस्कृती निर्माण केली आणि ती घरी बसल्या काम म्हणजे "वर्क फ्रॉम होम" होय. या संस्कृतीमुळे तर प्रत्येकाचे निवासस्थानातील जीवन व कार्यालयातील जीवन यांच्यातील सीमारेषा केवळ पुसट झाल्या नाहीत तर त्या जवळजवळ नष्ट झाल्या आहेत. यामुळेच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या फोनला उत्तरे देण्यासाठी कर्मचाऱ्यांना अहोरात्र तयार राहावे लागते ही वस्तुस्थिती आहे. यामुळे कर्मचाऱ्यांवर सतत दबाव निर्माण होऊन

त्यांच्या केवळ प्रकृतीवरच परिणाम होत नाही तर त्यांचे मानसिक संतुलन बिघडत असल्याचे आढळून आले आहे. 24 तास कामाचा दबाव, दडपण राहिल्याने कर्मचाऱ्यांचे मानसिक संतुलन बिघडल्याचे निष्कर्ष विविध पाहण्यांमध्ये काढण्यात आलेले आहेत. बुद्धीजीवी काम करणाऱ्या पांढरपेशा कर्मचाऱ्यांवर याचे इतके प्रचंड दडपण असते की त्यामुळे अनेकांचे मृत्यू झाल्याचे किंवा काहींनी आत्महत्या केल्याची प्रकरणे दुर्लक्ष करण्यासारखी नाहीत.

राष्ट्रवादी पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी काही महिन्यापूर्वी संसदेमध्ये या बाबतचे एक खाजगी विधेयक मांडलेले होते. तसेच खासदार शशी थरूर यांनीही त्याबाबत संसदेत आवाज उठवण्याचे जाहीर केले होते. मात्र त्याबाबत अजूनही फार काही महत्त्वाची प्रगती झाल्याचे दिसत नाही.

कार्यालयीन वेळेनंतर कामासंदर्भातील फोन नाकारणे तसेच ई-मेल्सला उत्तरे न देण्याचा अधिकार प्रत्येक कर्मचाऱ्याला देण्याची तरतूद या विधेयकात आहे. हा विषय संसदेच्या पटलावर येऊन त्यानिमित्ताने उद्योग क्षेत्र व समाज माध्यमात सर्वांगीण चर्चा होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्याकडे घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये याचा उल्लेख वेगळ्या प्रकारे आहे.

प्रत्येक कर्मचाऱ्याला काम करताना आरोग्यदायी योग्य वातावरण निर्माण केले पाहिजे असे यामध्ये म्हटले आहे. कल्याणकारी राज्य ही संकल्पना राज्यघटनेत आहे. विशाखा विरुद्ध राजस्थान सरकार या गाजलेल्या खटल्यामध्ये कामाच्या ठिकाणी प्रत्येक व्यक्तीची प्रतिष्ठा जपण्याचा प्रत्येकाला अधिकार असून त्यांचे लैंगिक शोषण केले तर त्यांच्या मूलभूत हक्काची पायमल्ली आहे असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तसेच लिंगभेद समानता, समान वेतन समान काम ही भूमिका मार्गदर्शक तत्त्वांमध्ये मान्य केलेली आहे.

शारीरिक दृष्ट्या अपंग असलेल्या व्यक्तींनाही समाविष्ट करून घेण्याचा अधिकार आहे. प्रत्येक व्यक्तीची क्षमता लक्षात घेऊनच मालक वर्गाने त्यांना काम दिले पाहिजे हा अधिकार मान्य करण्यात आलेला आहे. एका प्रकरणात तर केवळ प्रशासकीय कामातील किरकोळ चुकांसाठी अन्य कर्मचाऱ्यांच्या समक्ष संबंधित कर्मचाऱ्याला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी झापणे किंवा पाणउतारा करणे हे अयोग्य असल्याचे स्पष्ट केलेले आहे.

कर्मचाऱ्यांच्या मानसिक आरोग्याचा विचार करून प्रत्येकाची कामाच्या ठिकाणी योग्य ती प्रतिष्ठा जपली पाहिजे असे विविध उच्च व सर्वोच्च न्यायालयाने मान्य केले आहे. कामाच्या तासांवर निश्चितपणे बंधने असली पाहिजेत व वेळप्रसंगी कंपन्यांनी या तरतुदींचा भंग केला तर त्यांच्यावर काही दंडात्मक कारवाई करण्याची कायद्यामध्ये गरज आहे.

सध्याच्या धावपळीच्या दिवसांमध्ये स्पर्धेच्या नावाखाली सर्व कर्मचाऱ्यांना कनेक्टेड राहून कामाच्या स्वतःच्या वेळा सांभाळणे, स्वतःचे खासगी पण सांभाळणे आणि कुटुंबासाठी वेगळा वेळ देणे हे आवश्यक मानले जात असून त्याला योग्य महत्त्व लाभत आहे. त्या दृष्टीने एक पाऊल पुढे जाण्याच्या दृष्टिकोनातून कर्मचाऱ्यांचा हा अधिकार मान्य करण्याची गरज आहे. एवढेच नाही तर अलीकडे 'राईट टू डिस्कनेक्ट' एक मानवी अधिकार असल्याचे मत जागतिक पातळीवर व्यक्त केले जात असून त्याबाबत चर्चा सुरू आहे.

आज भारतासह जगभरात प्रत्येक व्यक्तीच्या जगण्यामध्ये अमुलाग्र बदल झालेले असून आबालवृद्धांपर्यंत सर्वांना इंटरनेट किंवा मोबाईल यांनी अक्षरशः वेड लावलेले आहे.

लहान मुले मोबाईल मध्ये व्यग्र झाल्याने त्यांचे अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष होत आहे एवढेच नव्हे तर त्यांच्या वर्तनामध्ये गंभीर बदल झालेले आहेत. आई-वडिलांचे किंवा वरीलधाऱ्यांचे न ऐकणे, उलट उत्तरे किंवा दुरुत्तरे करणे, स्वभाव चिडचिडा होणे याचा प्रादुर्भाव झालेला आहे.

आज आपल्यापैकी अनेकांना मोबाईल हातात नसेल तर चैन पडत नाही. मोबाईल फोन हाती आल्यामुळे सगळे जग मुठीतआल्यासारखे वाटते. इंटरनेटचा वापर मर्यादेच्या पलीकडे वाढलेला असून मोबाईल, ईमेल किंवा अन्य समाज माध्यमांवर प्रत्येकाचा वेळ दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक अधिकारी किंवा कर्मचारी यांना रात्री बे-रात्री उठून मोबाईल वरील व्हॉट्सअप तपासून पहाण्याची व निद्रानाशाला बळी गेल्याची उदाहरणे घराघरांमध्ये दिसत आहेत.

कार्यालयीन वेळेनंतर किंवा सुट्टीवर असतानाही कर्मचारी मोबाईलवर उपलब्ध असल्यामुळे कोणत्याही वरिष्ठ अधिकारी किंवा अन्य कर्मचारी यांना त्याच्याशी संपर्क साधने व कामासंदर्भात बोलणे सहज शक्य झालेले आहे.

भारतात सर्वत्र मोबाईलचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर झाला असून त्याबाबत पालकांना कधीही चिंता वाटत नाही व त्याचे गांभीर्य लक्षात येत नाही ही वस्तुस्थिती आहे. एखादा कर्मचारी कामावरून घरी आल्यानंतर जर तो त्याच्या खोलीतून किंवा घराबाहेर उभा राहून त्याच्या कार्यालयीन कामा संदर्भातच चर्चा करत राहिला म्हणजे ईमेल किंवा मोबाईल वर बोलत राहिला तर त्याच्या घरी जाण्याला काहीही अर्थ राहत नाही.

त्याचे संपूर्ण जीवन कार्यालयीन कामासाठीच व्यापलेले दिसते. प्रत्येक व्यक्तीला त्याचे आयुष्य सुखा समाधानाने व्यतीत करण्याचा अधिकार असून आयुष्याचा दर्जा उंचावणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

एखादी व्यक्ती 24 तास कामाच्या विचारात घडून गेलेली असली किंवा त्याचा स्वतःसाठीचा किंवा कुटुंबीयांसाठीचा वेळ कमी होऊ लागला की ताण-तणाव निर्माण होतात व त्याचे प्रतिकूल परिणाम त्या कर्मचाऱ्यांच्या जगण्यावर होतात. पयार्याने कार्यालयीन कामकाजावरही प्रतिकूल परिणाम होतो. कामातील लक्ष कमी होणे, कामाचा दर्जा घसरणे या गोष्टी निश्चितपणे अनुभवास येतात.

भारतामध्ये अनेक खासगी, शासकीय कार्यालयांमध्ये कामाच्या तासांवर कोणतेही बंधन नसते असे आढळले आहे. त्यांना कामापासून विभक्त होण्याचा अजून अधिकार देण्यात आलेला नाही. हॉर्वर्ड बिझीनेस रिव्ह्यू यांनी केलेल्या एका पाहणीत कामाच्या अतिरेकामुळे कर्मचारी प्रचंड तणावाखाली राहुन त्यांना हृदयविकार, रक्तदाब वाढण्याचे विकार जडतात असे आढळले आहे.

जास्त काम म्हणजे जास्त कार्यक्षमता, उत्पादकता या कल्पना चुकीच्या आहेत असेही लक्षात आलेले आहे. कामाच्या ठिकाणी कर्मचारी आनंदी असेल तरच उत्पादकतेमध्ये चांगली वाढ होते असेही आढळून आले आहे.

या पार्श्वभूमीवर भारतामध्ये कामापासून विभक्त होण्याचा प्रत्येक कर्मचाऱ्याचा अधिकार हा लवकरात लवकर मान्य करून एकूणच देशाची कार्यक्षमता वाढवणे काळाची गरज आहे. यामध्ये केवळ कर्मचाऱ्यांचेच नाही तर उद्योजक, मालक वर्ग यांचेही भले होईल यात शंका नाही.

------------

**(लेखक पुणेस्थित अर्थविषयक ज्येष्ठ पत्रकार असून बँक संचालक आहेत)**

●●●●●●●●●

# भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र व्हावा!

राज्यात भाजप, शिवसेना (शिंदे गट) व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांचे महायुती सरकार विक्रमी बहुमताने स्थापन झाले.

आजवर कोणत्याच सरकारला मिळाले नाही इतके विक्रमी बहुमत या सरकारला महाराष्ट्रातील मतदारांनी दिले आहे. या सरकारचा शपथविधी समारंभ नुकताच मोठ्या थाटामाटात पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर माननीय एकनाथ शिंदे व माननीय अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. ३९ आमदारांनी देखील नागपुरात मंत्रीपदाची शपथ घेतली. नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येताच सरकार ॲक्शन मोड मध्ये आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सर्व विभागाची बैठक घेऊन सचिवांना पुढील शंभर दिवसांचा कार्यक्रम आखण्यास सांगितले आहे.

जनातेच्याही या सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. एक तरुण म्हणून मला तरुणांचे प्रश्न महत्वाचे वाटतात. नव्या सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करायला हवेत. कारण गेल्या चार पाच वर्षात राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे.

शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही त्यात आर्थिक मंदी आणि कोरोनाने अनेक तरुणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. सरकारी नोकरभरती बंद आहे. रोजगार नसल्याने राज्यातील तरुण नैराश्याच्या गर्तेत अडकला आहे. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढायचे असेल तर रोजगार निर्मितीसाठी सरकारने ठोस प्रयत्न करायला हवेत.

बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मुख्यमंत्र्यांनी नोकर भरतीचे आश्वासन दिले आहे ही आनंदाची बाब असली तरी ही नोकरभरती कंत्राटी नको तर कायम स्वरूपाची हवी. मागील सरकारने नोकर भरतीचे दिलेले आश्वासन हवेतच विरले. या सरकारने तरी नोकर भरतीचे दिलेले आश्वासन पूर्ण करावे.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

राज्यातील ४० टक्के लोकसंख्या १८ ते ४५ या वयोगटातील आहे या तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतल्यास महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल यात शंका नाही. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत.

मागील काळात महाराष्ट्रातील काही उद्योग गुजरातमध्ये गेल्याचे आपण पाहिले आहे आता तरी महाराष्ट्रातील उद्योग दुसऱ्या राज्यात जाणार नाही याची दक्षता सरकारने घ्यावी. उद्योगधंद्यात महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर ठेवण्याचे मोठे आव्हान या सरकारपुढे आहे. महाराष्ट्रात मोठे उद्योग आले तर रोजगारी कमी होऊन राज्याची अर्थव्यवस्था गतिमान होईल.

महायुती सरकारने जे विक्रमी बहुमत मिळवले आहे त्यात राज्यातील लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीला भरभरून मते दिली आता सरकारनेही लाडक्या बहिणींना विसरु नये. लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्वासन पूर्ण करावे.

त्यासोबतच महागाई करून दाजिंनाही दिलासा द्यावा. लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे पाठवले म्हणजे सरकारचे काम संपले असे नाही तर लाडक्या बहिणींच्या संरक्षणाची जबाबदारी देखील सरकारने घ्यायला हवी. राज्यात महिला अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. तीन वर्षाच्या चिमुरडी पासून साठ वर्षाच्या आजीपर्यंत सर्व वयोगटातील महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत.

सरकारने महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालून आणि नराधमांना कठोर शिक्षा द्यावी. मागील अनेक वषार्पासून प्रलंबित असलेले शक्ती विधेयक या सरकारने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. मागील काही काळापासून राज्यातील शेतकरी सरकारी धोरणावर नाराज आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत. शेतकऱ्यांसोबत कष्टकरी, कामकरी आणि व्यापारी वगार्चे देखील प्रश्न सरकारने प्राधान्याने सोडवावेत.

जनतेचा सर्वाधिक पैसा शिक्षण आणि आरोग्यावर खर्च होतो. या सरकारने जनतेचा शिक्षण आणि आरोग्यावर होणारा खर्च कमी करावा. राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि नागरिकांना निरोगी आरोग्य लाभेल या दृष्टीने सरकारने धोरणे आखावित. सरकारने सर्वांना परवडेल अशा माफक दरात आरोग्यसेवा पुरवावी. के जी ते पी जी शिक्षण मोफत करावे.

या सरकारने इंदु मिल मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारक तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांच्या कामाला गती द्यावी. या सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी. जलसिंचन, नदी जोड सारखे प्रकल्प राबवावेत.

सरकारने प्रशासनातील भ्रष्टाचार मोडून काढावा. राज्यातील स्त्रिया, मुलींना सुरक्षित वाटेल असे कायद्याचे राज्य स्थापन करावे. जाती - जातीत, धर्मा - धर्मात तणाव वाढत आहे. हा तणाव कमी करून राज्यात सौहादार्चे वातावरण निर्माण करावे. एकूणच या सरकारने भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र निर्माण करावा.

●●●●●●

# चहाचे बदलते स्वरूप॥

जगभरात टी- चहाचे उत्पादन करणारे देश आज १५ डिसेंबरला आंतरराष्ट्रीय चहा दिवस साजरा करत आहेत, पण भारताच्या शिफारशीवरून युएन- संयुक्त राष्ट्राने २१ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय चहा दिवस म्हणून घोषित केला आहे. मिलान येथे चार वर्षांपूर्वी झालेल्या आंतरराष्ट्रीय खाद्य आणि एफएओ- कृषी संघटनेने आंतरसरकारी गटाच्या बैठकीत भारताने हा प्रस्ताव मांडला होता. संयुक्त राष्ट्र महासभेने चहाच्या औषधी गुणधमासीबतच सांकृतिक महत्व मान्य केले आहे. दि.१५ डिसेंबर २००५ साली आंतरराष्ट्रीय चहा दिवसाची सुरूवात नवी दिल्ली येथे झाली होती. त्यानंतर हा दिवस श्रीलंकेत साजरा केला गेला. तिथून तो जगभरात साजरा केला जाऊ लागला.

------------

जगभरातील काही देशात १५ डिसेंबर हा दिवस वर्ल्ड टी डे- जागतिक चहा दिवस म्हणून साजरा केला जातो. मात्र, चहाचा व्यापार आणि चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या कामगारांच्या समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी २१ मे रोजी आंतरराष्ट्रीय चहा दिवस साजरा केला जातो. आजच्या दिवसाचा उद्देश चहाच्या व्यापाराला प्रोत्साहन देणे आणि त्याच्या नैतिक आणि टिकाऊ उत्पादनावर लक्ष केंद्रीत करणे हा आहे. माझे प्रांजळ मत असे, की चहाची तलफ एक व्यसनच आहे, परंतु ते विडी, सिगारेट, तंबाखू किंवा दारू यांरखे हानीकारक मुळीच नाही. म्हणूनच जागतिक संघटनांकडून चहाला मान्यता प्राप्त झाली.



**कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**९४२३७१४८८३.**

चहाचे बदलते स्वरूपः दैनंदिन जीवनात चहाचे महत्व वाढत चालले आहे. आता आरोग्याच्या दृष्टीने नागरिकांचा ग्रीन टी, ब्लॅक टीकडे कल अधिक वाढत चालला आहे. चहाचे सेवन प्रमाणात केले, तर ते अमृताचे कार्य करते, असे तज्ज्ञांचे मत आहे. भारतात आसामच्या पर्वत भागात सन १८२४ दरम्यान चहाची पाने सापडली. त्यानंतर इंग्रजांनी सन १८३६पासून चहाचे उत्पादन सुरु केले. सुरुवातीला यासाठी चीनमधून चहाचे बी मागवले जायचे. त्यानंतर आसामच्या भागात चहाच्या बियांचा वापर सुरू झाला.

भारतातील चहाचे उत्पादन हे ब्रिटनमधील चहाची मागणी पूर्ण करण्यासाठी केले जात असे. आज चहा भारतातील सर्वात स्वस्त आणि लोकप्रिय पेय आहे. आसामचा चहा सर्व जगभर प्रसिद्ध आहे. भारतील अनेक नागरीकांची आनंदी व उत्साही सकाळ चहा पिल्यानंतर सुरू होते. भारत, चीन, केनिया आणि श्रीलंका हे जगातील प्रमुख चहा उत्पादक देश आहेत. याव्यतिरिक्त, बांग्लादेश, यूगांडा, इंडोनेशिया, टांझानिया आणि मलेशिया या देशातही चहाचे उत्पादन घेतले जाते. चीन हा जगातील सर्वात मोठा चहाचा निर्यात कर्ता देश आहे. भारततही चहाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. पण स्थानिक स्तरावर त्याचे सेवनही मोठ्या प्रमाणात केले जाते. भारतातील चहाच्या एकूण उत्पादनापैकी ८० टक्के उत्पादन हे भारतातच सेवन केले जाते.

**चहाचे फायदेः** चहामध्ये एंटीजन असतात, जे एंटी-बॅक्टेरियल क्षमता प्रदान करतात. चहामध्ये असलेला फ्लोराईड हाडांना मजबूत करतो व दातांना कीड लागण्यापासून थांबवतो. चहामध्ये कैफिन आणि टैनिन असतो, जो शरीराला स्फुर्ती प्रदान करतो.

चहामध्ये असलेला अमिनो-एसिड डोक्याला शांत व चपळ ठेवण्यास मदत करतो. चहा हे म्हातारपण वाढण्याचा वेग कमी करतो, तसेच शरीर वाढीच्या नुकसानापासून वाचवतो. चहा शरीरातील एंटी-ऑक्सिडेन्स इम्युन सिस्टिम व्यवस्थित ठेवतो. जगात पाण्यानंतर चहा हे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वाधिक सेवन केले जाणारे पेय आहे. उत्तर भारत, उत्तर म्यानमार आणि नैऋत्य चीन हे चहाचे उगमस्थान मानले जाते. येथील अनेक लहान-मोठी कुटुंबे चहाच्या शेतीत गुंतलेली आहेत. त्यामुळे चहाचा वापर आणि मागणी वाढवण्यावर भर देण्यासाठी दरवर्षी २१ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय चहा दिन म्हणून साजरा केला जातो.

आंतरराष्ट्रीय चहा दिनाचा उद्देश चहाचे उत्पादन वाढवून त्याबद्दल जागरूकता पसरवणे आणि भूक आणि गरिबीमध्ये त्याचे महत्त्व अधोरेखित करणे हा आहे. चहाचा अर्थ फक्त दूध असलेला चहा असा नाही तर चहापानांचे इतरही अनेक प्रकार आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील चहाच्या योगदाविषयी लोकांना जागरूक करण्यासाठी भारताने दिलेल्या या प्रस्तावाला संयुक्त राष्ट्रसंघाने मान्यता दिली. युएनच्या मते २१ मे हा आंतरराष्ट्रीय चहा दिवस म्हणून घोषित केल्याने त्याचे उत्पादन आणि वापर वाढविण्यासाठी मदत मिळेल. ही मदत ग्रामीण भागातील भूक आणि गरिबीशी लढण्यासीठी महत्वाची ठरेल. संयुक्त राष्ट्राने त्यांचे सदस्य असलेल्या सर्व देश, आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक संघटनांना दरवर्षी २१ मे रोजी आंतरराष्ट्रीय चहा दिन साजरा करण्याचे आवाहन केले. भारत, नेपाळ, बांग्लादेश, इंडोनेशिया, श्रीलंका, टांझानिया व्यतिरिक्त इतर अनेक देश १५ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय चहा दिन साजरा करतात.

●●●●●●●●●

# बनावट प्रोटीन पावडरमुळे आजारी पडण्याची शक्यता?

उत्तर प्रदेशातील नोएडा पोलिसांनी बनावट प्रोटीन पावडर बनवणाऱ्या कंपनीचा पदार्फाश केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून बनावट खाद्यपदार्थ, कॅप्सूल बॉक्स आणि प्रोटीन पावडर बनवण्याचे साहित्य असा सुमारे 50 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही बाब तेव्हा उघडकीस आली जेव्हा एका ग्राहकाने या कंपनीची ऑनलाइन प्रोटीन पावडर खरेदी केली, ती खाल्ल्यानंतर त्याला यकृताचा संसर्ग आणि त्वचाविकार यासारख्या आरोग्याच्या समस्या होऊ लागल्या. पीडितेने याप्रकरणी सेक्टर-63 पोलिस ठाण्यात तक्रार केली होती, त्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

आजच्या युगात तरुणांमध्ये बॉडी बिल्डिंगची क्रेझ वाढत आहे. त्यामुळे आहारातील पूरक पदार्थांची विक्री झपाट्याने वाढत आहे. 2023 मध्ये भारताची प्रोटीन सप्लिमेंट मार्केट 33,000 कोटी रुपयांची आहे. प्रथिने पावडर आहारातील पूरक विक्रीत 50% पेक्षा जास्त आहे. बाजारात अनेक बनावट ब्रँड्स उपलब्ध आहेत, ज्यामुळे आपल्याला अनेक गंभीर आजार होऊ शकतात.

प्रोटीन सप्लिमेंट्सच्या वाढत्या मागणीमुळे, बाजारात हजारो ब्रँड्स उपलब्ध आहेत, परंतु हे प्रोटीन सप्लिमेंट्स भेसळयुक्त किंवा बनावट असू शकतात. ज्यामुळे अनेक गंभीर आजार होऊ शकतात.

शरीराची प्रोटीनची गरज वजन आणि




लिंगानुसार बदलते. एका सामान्य माणसाला दररोज 0.84 ग्रॅम प्रथिने प्रति किलोग्रॅम शरीराच्या वजनासाठी आवश्यक असतात. उदाहरणार्थ, जर एखाद्या माणसाचे वजन 85 किलो असेल तर त्याच्या शरीराला दररोज सुमारे 71 ग्रॅम प्रोटीनची आवश्यकता असते.

महिलांसाठी, शरीराच्या वजनासाठी 0.75 ग्रॅम प्रति किलोग्राम आवश्यक आहे. म्हणजेच जर एखाद्या महिलेचे वजन 70 किलो असेल तर तिच्या शरीराला दररोज 52 ग्रॅम प्रथिनांची गरज असते. तर गरोदर स्त्रिया, दैनंदिन कसरत किंवा व्यायाम करणाऱ्या व्यक्तींना प्रति किलोग्राम शरीराच्या वजनासाठी 0.8 ते 1.25 ग्रॅम प्रथिने आवश्यक असतात.

प्रोटीन सप्लिमेंट घेण्यापूर्वी ते खरे आहे की बनावट हे ओळखणे आवश्यक आहे. बनावट किंवा भेसळयुक्त प्रोटीन सप्लिमेंटमुळे तुमच्या शरीराला फायद्याऐवजी गंभीर आजार होऊ शकतात.

काही नैसर्गिक गोष्टी देखील प्रथिनांचे चांगले स्त्रोत आहेत. साधारणपणे, अंडी, मासे किंवा मटण यांसारख्या मांसाहारी पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात प्रथिने असतात, जर तुम्ही शाकाहारी असाल तर तुम्ही तुमच्या दैनंदिन आहारात दुग्धजन्य पदार्थ, कडधान्ये किंवा सुका मेवा समाविष्ट करू शकता.

शरीराची प्रथिनांची गरज भागवण्यासाठी आपल्याकडे पुरेसे नैसर्गिक स्त्रोत आहेत. यामुळे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. तर प्रोटीन सप्लिमेंट्स घेतल्याने दुष्परिणाम होऊ शकतात. म्हणून, प्रथिने पूरक आहार पूर्णपणे टाळणे चांगले.

तुमची दैनंदिन प्रथिनांची गरज नैसर्गिक स्त्रोतातून पूर्ण होत नसेल, तर तुम्ही प्रोटीन सप्लिमेंट्सची मदत घेऊ शकता. केवळ जिम ट्रेनरच्या सल्ल्याने प्रोटीन सप्लिमेंट्स घेणे सुरू करू नका. यासाठी आहारतज्ञांचा सल्लाही घ्या. आपल्या शारीरिक विकासासाठी प्रथिने आवश्यक आहेत. स्नायूंच्या वाढीसाठी आणि हार्मोन्ससाठी हे खूप महत्वाचे आहे. शरीरात प्रथिनांच्या कमतरतेमुळे थकवा, अशक्तपणा, हाडे कमजोर होणे, केस गळणे, नखे पांढरे होणे, अशक्तपणा यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

●●●●●●

## अशोकायन

### तदेव लग्नम्

आयुष्यभर काटकसरीने
करतो पैशाची साठवण
खोट्या प्रतिष्ठेपायी
लग्नकार्यात करतो समाज
गुलालासारखी
पैशाची उधळण ..

लग्नसराईत भौ
बँड मंडप सारं ताईट
वधूपिता देतो
उसनं अवसान आणून
महागाईशी फाईट ..!



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## वाचक लिहितात

### हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व

आपल्या हिंदू धर्मानुसार आचार, विचार, कृती करणे म्हणजे मागासलेपणाचे लक्षण आहे असे मानण्याची प्रथा सुरू झाली आहे. दिवसेंदिवस पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव आपल्यावर वाढतो आहे .बुध्दीवादी म्हणवणाऱ्या अनेक नास्तिकतावादी संघटना यांना मोठ्या प्रमाणात खतपाणी घालून मोठे करण्याचा प्रयत्न करत आहेत. या सगळ्यात एक आशेचा किरण म्हणजे सनातन संस्था ही संस्था समाजात सनातन धर्म, सनातन संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न करीत आहे.

कोरोनाकाळात भारतीय संस्कृती आणि धर्माचरणानेच आपल्याला वाचवले. उदाहरणार्थ शेकहँड न करता हात जोडून नमस्कार करणे, घरी आल्यावर हात पाय धुणे, शाकाहार, आयुर्वेद इत्यादी. हिंदू संस्कृतीचे, आचार'- विचार, संस्कार 'हे सर्व रोगांवर प्रतिरोधात्मक उपाय आहे. गेल्या काही वर्षांपासून नवनवीन रोगांचा उद्भव होतो आहे, तसेच नैसर्गिक आपत्तीचे प्रमाणही वाढत आहे.

धर्माचरण हे कृतीचे शास्त्र आहे. आयुर्वेदिक, धर्माधिष्ठित जीवनप्रणालीचा अंगीकार हीच निरोगी आणि आनंदी सुखी आयुष्याची गुरुकिल्ली आहे असे म्हणायला हरकत नाही. पुढे येणारा काळ कसा असेल हे सांगता येत नाही. कुठल्याही भूलथापांना बळी न पडता महान हिंदु संस्कृतीचे आचरण करुया. धर्माशी पुन्हा आपली नाळ जोडुया. कारणं यातुनच व्यक्तिचे, समाजाचे आणि राष्ट्राचे हित समावले आहे, हे आता भारतीयांनी ओळखले आहे. धर्माने सांगितलेल्या श्रेष्ठ धर्माचरणाचे पालन करुया.

● **सौ. रमा देशमुख, नागपूर.**

# टाटा कॅपिटल देणार महाराष्ट्रातील एमएसएमई क्षेत्रावर मोठा भर

## उत्पादन, माहिती तंत्रज्ञान सेवा, औषध निर्माण, रसायने, ग्राहकोपयोगी वस्तू, आरोग्य सेवा, वाहन उद्योग यावर विशेष लक्ष

**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १६ :** टाटा सन्सची प्रमुख वित्तीय सेवा शाखा टाटा कॅपिटल लि. ने महाराष्ट्रात एमएसएमई (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग) कर्जांसाठी मागणीत मोठी वाढ झाल्याचे निरीक्षण नोंदवले आहे. वैविध्यपूर्ण उद्योगांच्या पार्श्वभूमी सह महाराष्ट्र ही टाटा कॅपिटलच्या एमएसएमई पोर्टफोलिओमध्ये महत्त्वाचा वाटा उचलणारी एक प्रमुख विकास बाजार पेठ राहिली

टाटा कॅपिटलने महाराष्ट्रातील आपले जाळे ५० शाखां पर्यंत वाढवले असून ठाणे, नाशिक आणि चंद्रपूर सारख्या टियर वटियर शहरांमध्ये आपली पोहोच आणखी मजबूत केली आहे. या नेटवर्क विस्तारामुळे कंपनीला उत्पादन, माहिती तंत्रज्ञान सेवा, औषध निर्माण, रसायने, ग्राहकोपयोगी वस्तू, आरोग्य सेवा, वाहन उद्योग क्षेत्रांतील एमएसएमईंच्या विविध आर्थिक गरजा अधिक परिणामकारकपणे पूर्ण करता येणार आहेत. महाराष्ट्रातील एमएसएमई क्षेत्राचा कंपनीच्या एकूण एमएसएमई कर्ज पोर्टफोलिओत सुमारे ४०% वाटा आहे. व्यवसायाचीही दिशा छोट्या उद्योगांना त्यांची अल्पकालीन व दीर्घकालीन आर्थिक गरजा भागवून राज्यातील छोट्या उद्योगांवर लक्ष केंद्रित करत आहे. आर्थिक वर्ष २५ च्या पहिल्या सहामाही अखेर, टाटा कॅपिटलच्या एकूण कर्ज पोर्टफोलिओचे मूल्य १७६,००० लाख कोटी रु. पेक्षा अधिक होते.

कंपनीच्या अल्पकालीन कर्ज उपाययोजनां मध्ये वर्किंग कॅपिटल लोनचा समावेश होतो. हे व्यवसायांना त्यांच्या चालू खर्चाचे व्यवस्थापन करण्यासाठी, व्यापार किंवा उत्पादनासाठी कच्चामाल खरेदी करण्यासाठी आणि विक्री नंतरच्या देयकांचे व्यवस्थापन करण्यासाठी मदत करते. याशिवाय, टाटा कॅपिटलच्या दीर्घकालीन वित्तपुरवठा उपायांमध्ये व्यवसाय विस्तारासाठी उपकरण कर्ज आणि प्रोजेक्ट टर्म लोन यांचा समावेश आहे. टाटा कॅपिटल मालमत्तेवर आधारित लीजिंग उपाय देखील देते. त्यामध्ये प्रकल्प व यंत्र सामुग्री, आयटी हार्डवेअर, पायाभूत सुविधा आणि वाहतूक उपकरणां सारख्या विविध श्रेणींचा समावेश आहे. या सर्व समावेशक उपाययोजनांमुळे उत्पादन, व्यापार किंवा सेवा क्षेत्रातील एमएसएमईंना त्यांच्या बदलत्या व्यवसाय गरजांसाठी अनुकूलित आर्थिक उपाय मिळू शकतात. टाटा कॅपिटलची एमएसएमई कर्जे प्रगत ऑन बोर्डिंग आणि क्रेडिट एनेबलिंग साधनांनी सुसज्ज आहेत. जलद निर्णय घेता येतो. आमच्या ९५% पेक्षा जास्त सेवा डिजिटल स्वरूपात सक्षम असून, ग्राहकांना अखंड विना अडथळा अनुभव देण्याबरोबर चकर्ज मंजुरी आणि वितरणाची कार्यक्षमता सुधारण्यास मदत करतात.

# यास्मीन कराचीवाला नववधूंना त्यांच्या विवाहाच्या दिवशी मोहक दिसण्यासाठी सांगत आहेत टिप्स

**महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई, दि. १६ :** प्रत्येक नववधूची विवाहाच्या दिवशी आकर्षक व मोहक दिसण्याची इच्छा असते. पण, जीवनातील या महत्त्वपूर्ण दिवसाकडे वाटचाल करताना विवाहाचे नियोजन, शॉपिंग व आमंत्रण देणे अशा अनेक कामादरम्यान आरोग्य व फिटनेसवर परिणाम होऊ शकतो. फिटनेस प्रशिक्षक व पिलेट्स तज्ञ यास्मीन कराचीवाला यांनी नववधूंना विवाहाच्या दिवशी आत्मविश्वासू व मोहक दिसण्यास मदत करण्यासाठी पाच टिप्स सांगितल्या आहेत:



**कॅलिफोर्निया बदामांचे स्मार्टपणे सेवन करा**

स्मार्टपणे आहार सेवन करणे म्हणजे आहार कमी करणे किंवा डाएटिंग करणे असा अर्थ होत नाही. त्याऐवजी, आवश्यक पौष्टिक घटक असलेल्या संतुलित आहाराचे सेवन करा. कॅलिफोर्निया बदामांसारख्या नट्सचे स्मार्टपणे सेवन करणे महत्त्वाचे आहे. हून अधिक प्रकाशित करण्यात आलेल्या संशोधनांमधून निदर्शनास आले आहे की, बदाम अनेक आरोग्यदायी फायदे देतात, बदामांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियल, प्रोटीन, रायबोफ्लेविन व झिंक यांसारखे पौष्टिक घटक असतात. विशेषत: कॅलिफोर्निया बदाम प्रोटीनचे संपन्न स्रोत आहेत. हा पौष्टिक घटक ऊर्जा देण्यासोबत स्नायूबळ वाढवण्यास व कायम ठेवण्यास मदत देखील करतो. बदामांचे सेवन करण्याच्या अनेक पद्धती आहेत, जसे बदाम भाजून खाता येतात किंवा भारतीय मसाल्यांसोबत मिक्स करता येतात. बदाम ऊर्जेचे पॉवरहाऊस आहेत, बदामांच्या सेवनाने तुम्हाला ऊर्जा मिळाल्यासारखे वाटेल.

**व्यायाम महत्त्वाचा आहे**

नववधू म्हणजे सतत व्यस्त राहावे लागते आणि व्यायाम करण्यासाठी वेळ नाही असे वाटू शकते.

# हिचकीने नागपूर येथील आउटलेटमध्ये 'हिचकी प्रीमियर' मेनू केला लाँच



**महासागर प्रतिनिधी,**

**नागपूर, दि. १६ :** हिचकी, एक आयकॉनिक बॉलिवूड-थीम असलेला रेस्टो-बार, जो नॉस्टॅल्जिया आणि नाविन्यपूर्ण खाद्य निर्मितीला एकत्र करतो, त्याच्या नागपूर आउटलेटवर 'हिचकी प्रीमियर' हे नवीन मेनू लाँच करण्याची घोषणा गर्वाने करत आहे. पुनर्रचित मेनू नागपूरच्या ग्राहकांचा खाद्य अनुभव उंचावण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे, आणि तो पारंपारिक व आधुनिक चवींच्या अनोख्या संगमाद्वारे भारताच्या खाद्य यांच्या समृद्ध विविधतेचा उत्सव साजरा करतो. हिचकी प्रीमियर मेनू कालातीत परंपरा आणि आधुनिक ट्रेंडचे अत्याधुनिक मिश्रण सादर करतो. या पाककलेचे प्रमुख म्हणजे फायरक्रॅकर चिकन, एक आदर्श सिग्नेचर डिश जी रेस्टॉरंटच्या नाविन्यपूर्ण दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. नॉस्टॅल्जिया पुन्हा एकदा केंद्रस्थानी येते गुलाबो कॉकटेलसह, ज्यात गुलाबी बबलगमचे मिश्रण आहे, तर चुलबुली सामी चवदार टकीलाचे, जगदलपूर चिंचेचे आणि खजूराच्या ताडगुळाचे मिश्रण सादर करते. या गॅस्ट्रोनॉमिक प्रवासाला समृद्ध करणाऱ्या सिग्नेचर क्रिएशन्समध्ये राग आणि मेक्सिको चायना यांचा समावेश आहे, प्रत्येक पदार्थाची आपली वेगळी ओळख आणि फ्लेवर आपल्या उच्चतम डाइनिंग अनुभवात भर घालतात.

सोनीली मलिक, ऑपरेशन्स हेड आणि मिक्सोलॉजिस्ट, बायरोट आणि हिचकी, यांनी मेनूमागील प्रेरणा शेअर केली हिचकीमध्ये, आम्ही नेहमीच अप्रतिम नाविन्याद्वारे सांस्कृतिक विविधतेचा उत्सव साजरा करण्यावर विश्वास ठेवला आहे.

# 'प्लॅटिनम लव्ह बँड' सहबांधीलकीचा हंगाम साजरा करा

## प्रेमाप्रमाणेच दुर्मिळ, मौल्यवान, स्थिर उत्सव

**महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई, दि. १६ :** हिवाळ्यातील थंडवाऱ्याची झुळूक प्रेमाने भरलेली असते, जी जोडप्यांना त्यांच्या अनोख्या वचन बद्धतेचा उत्सव साजरा करण्यासाठी एकव्यास पीठ तयार करते. लग्नाची घंटा वाजत असताना आणि लग्नाच्या वाढदिवसाच्या योजना आकार घेताना स्पष्ट होते की प्रेम, त्याच्या सर्व स्वरूपात व्यक्त होणार आहे. जोडप्यांमधील प्रेमाची भावना अशावेळी पूर्णपणे अलिखित असते आणिजी एकमेकांच्या चुका आणि विक्षिप्त सवयींचे स्वागत करते. संशय आणि भीतीवर हे जोडपे एकत्रितपणे मात करतात, त्यांच्या



प्रेमाच्या परिवर्तनीय सामर्थ्याने भविष्यात एकत्रित पाऊल टाकतात. अशा निर्णायकक्षणी फक्त एकच धातू अशा नाते संबंधाची खोली आणि दुर्मिळता प्रतिबिंबित करू शकतो, तो म्हणजे प्लॅटिनम.

# सा रे ग म प च्या स्पर्धकांना त्यांचा सीझन संपण्याच्या आधीच मिळाला त्यांचा पहिला तिकिट असलेला कॉन्सर्ट

**महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई, दि. १६ :** जमाई नं.१ मधील कलाकार सिमरन कौर आणि अभिषेक मलिक तसेच जानेअनजानेहममिले मधील आयुषी खुराणा आणि भरत अहलावत यांनी केले त्यांच्यासाठी चिअर आणि थक्क केले चाहत्यांनासा रे ग म पलाईव्ह च्या मंचावर उपस्थित होऊन काल रात्री, झी टीव्हीच्या सा रे ग म प मधील पाच असाधारण स्पर्धकांनी मुंबईतील एका नेत्रदीपक लाइव्ह कॉन्सर्टमध्ये सनसनाटी पार्श्वगायिका दिव्या कुमारसोबत स्पॉटलाइट शेअर करतसंगीत आणि प्रतिभेची जादू रंगवली. हा झी टीव्हीसाठी अभिमानाचा क्षण आहे कारण रिॲलिटी शोचे स्पर्धक त्यांचा सीझन संपण्यापूर्वीच तिकिट असलेल्या मैफिलीत खचाखच भरलेल्या प्रेक्षकांसमोरसादरीकरण करत होते सा रे ग म प लाइव्ह कॉन्सर्ट हा विलक्षण प्रतिभेचा उत्सव असूनहा नवोदित कलाकारांच्या बहुचर्चित कार्यक्रमातील परिवर्तनशील प्रवासाचा उत्सव होता. त्यांच्याविद्युतीय कामगिरीने त्यांची अफाट क्षमता आणि अष्टपैलुत्वाचे प्रदर्शन केले. आणि



# आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने ९९.०४% दावे निकाली

**महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १६**

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने जुलै २०२४ते सप्टेंबर २०२४ या कालावधीसाठी ९९.०४% क्लेम सेटलमेंट रेशो घोषित केला आहे, जो उद्योगातील सर्वोच्च आहे. विशेष म्हणजे, मृत्यूचा दावा निकाली काढण्याचा सरासरी कालावधी केवळ १.२ दिवस होता. श्री. अमीश बँकर, चीफ ऑपरेशन्स ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स म्हणाले, दावा हा सत्याचा अंतिम क्षण असतो आणि आम्ही प्रत्येक दावा अत्यंत संवेदनशीलतेने हाताळतो. आर्थिक वर्ष २०२५च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये, आमचा क्लेम सेटलमेंट रेशो ९९.०४% होता, तर कागदपत्र प्राप्त झाल्याच्या तारखेपासून तपास न केलेल्या दाव्यांसाठी सरासरी दावे निकाली काढण्याचा कालावधी केवळ १.२ दिवस होता. याशिवाय, आम्ही याच कालावधीत एकूण ४५१ कोटीं रुपयांपेक्षा जास्त किमतीचे मृत्यूचे दावे निकाली काढले. आमच्या क्लेम फॉर शुअर उपक्रमाअंतर्गत, आम्ही सर्व आवश्यक कागदपत्रे सादर झाल्यानंतर पात्र दावे एका दिवसात निकाली काढण्याचे वचन देतो. या उपक्रमांतर्गत आर्थिक वर्ष २०२५च्या दुसऱ्या तिमाहीमध्ये आम्ही ७१.२४ कोटी रुपयांचे मृत्यू दावे निकाली काढले आहेत. आमचे क्लेम सेटलमेंट रेशो सातत्याने उद्योगात आघाडीवर आहे;

# मूव्ही क्लिप्स सांगत आहे जमाई नं. १ मधील नायक अभिषेक मलिक

**महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई, दि. १६ :** झी टीव्ही वाहिनी आता स्टुडिओ एलएसडी प्रॉडक्शन्स यांच्या सहकार्याने आणखी एक नवीन रोचक मालिकाजमाई नं.१ घेऊ नयेत आहे. भारतीय घरांमध्ये जावयाला नेहमीच राजेशाही मान मिळतो. त्याच्यावर प्रेम आणि आदराचा वर्षाव केला जातो. पारंपारिक पद्धतीने एक जावई हा त्याच्या पत्नीच्या घरी नम्रता आणि संयमाने भेट देतो आणि कुटुंबाच्या चौकटी मध्ये स्वतःला सामावून घेतो. मात्र काय होईल जेव्हा एक जावई घरामध्ये आपल्या खास पद्धतीने गोष्टी बदलण्याचा प्रयत्न करेल? विनोद आणि नाट्यासह पुरेपूर



भरलेली मालिकाजमाई नं.१ ही नी लपरांज पेया हुशार आणि आकर्षक अशा जावयाची कथा आहे. चोटवानी परिवारामध्ये त्यांचा जावई म्हणून प्रवेश केलेला नीलहा हुशार आणि चैतन्याने भरलेला आहे आणि आपल्या आगळ्यावेगळ्या पद्धतीने तो या परिवारातील नाते संबंधांची पुनर्व्याख्या करेल. नील परांजपेची प्रमुख भूमिका अभिषेक मलिक साकारत आहे. नाशिकच्या पवित्रभूमी मध्ये जन्म आणि लहानाचा मोठा झालेला नील हा मध्यम वर्गीय कुटुंबातील आहे. त्याचे वडील त्र्यंबकेश्वराच्या मंदिरात पुजारी म्हणून करतात. अतिशय बळकट मूल्यांसह त्यांनी नीलला मोठे केले आहे पण आपली नियती स्वतःच निर्माण करण्याचे नीलचे स्वप्न आहे. देखणा, जुगाडू आणि अतिशय विनोदी असाहानील परिस्थिती पारंपरिक आणि तरीही प्रभावी पद्धतीने हाताळतो.

# मी वास्तविक जीवनात इश्कबाज नाही: रोहिताश्व गौड

**महासागर प्रतिनिधी,**

**मुंबई, दि. १६ :** रोहिताश्व गौड यांनी एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय विनोदी मालिका भाबीजी घर पर है'मधील मनमोहन तिवारीच्या भूमिकेत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. अनिता भाबीचे (विदिशा श्रीवास्तव) मन जिंकण्याच्या सततच्या प्रयत्नाने तिवारीला लोकप्रिय पात्र बनवले आहे. पण, पडद्यामागे रोहिताश्व यांचा प्रवास उत्कटता, स्थिरता आणि अथक मेहनतीने भरलेला आहे. या मुलाखतीमध्ये अभिनेते ही लोकप्रिय भूमिका साकारणे, त्यांचे वैयक्तिक जीवन, संघर्ष आणि अभिनयाप्रती अविरत प्रेम याबाबत सांगत आहेत. मनमोहन तिवारी चाहत्यांचा आवडता बनला



आहे. तुमच्या मते या भूमिकेला लोकप्रिय बनवणारी बाब कोणती? मनमोहन तिवारी विलक्षण व विरोधाभासी भूमिका आहे आणि माझ्या मते हीच बाब या भूमिकेला लोकप्रिय बनवते. तो मोहक, जुन्या पद्धतीने रोमांस करणारा व खोडकर आहे, पण साधा माणूस देखील आहे, जो संबंधित संघर्षांचा सामना करतो. अनिता भाबीचे मन जिंकण्याचे त्याचे प्रयत्न, विभुतीसोबत (आसिफ शेख) चढाओढ आणि व्यावसायिक व वैयक्तिक जीवनामध्ये संतुलन राखण्याचे त्याचे प्रयत्न त्याला मनोरंजनपूर्ण व प्रेमळ बनवतात. सर्वजण तिवारी सारख्या व्यक्तींना ओळखतात, जे उत्साही असण्यासोबत जीवनातील आव्हानांचा हसत व मनापासून सामना करतात. तिवारीचे लुक आणि सिग्नेचर कुर्ता-पजामा स्टाइलमागील सिक्रेट काय आहे? आरामदायीपणा महत्त्वाचा आहे! तिवारीच्या स्टाइलमधून विशिष्ट मध्यमवर्गीय उद्योगपतीचे गुण दिसून येतात -साधा, पारंपारिक, पण मोहक. मला पडद्यामागे देखील कुर्ता परिधान करायला आवडते. ते आरामदायी आहेत आणि त्यामधून आपली समृद्ध भारतीय संस्कृती दिसून येते.

**तुम्ही दररोज तिवारीच्या भूमिकेसाठी कशाप्रकारे तयारी करता?**

मी त्याची मानसिक स्थिती जाणून घेण्यावर लक्ष केंद्रित करतो. तिवारी आत्मविश्वासू असण्यासोबत त्याच्या मनात असुरक्षिततेची भावना देखील आहे, म्हणून मी त्याचे हावभाव, आवाजातील बदल आणि देहबोलीकडे लक्ष देतो. अनेक वर्षांपासून ही भूमिका साकारत असल्यामुळे मी भूमिकेमध्ये सामावून गेल्यासारखे वाटते.

# आजचे राशिभविष्य

**मेष :** कौटुंबिक सदस्यांसोबत आणि नातेवाईकांसोबत संबंध मजबूत करा. गोष्टींना खुल्या दिलाने समजून पुढे चला. सामाजिक कार्यांमध्ये वाढ होईल.

**वृषभ :** प्रवासाशी संबंधित अडचणी येऊ शकतात. आजचा दिवस आपल्याला सर्वांबद्दल आदर आणि सन्मान दाखवण्याची संधी देईल. महत्त्वपूर्ण गोष्टींमध्ये आपल्याला अनुकूल परिणाम मिळतील.

**मिथुन :** आपल्या प्रियजनांसोबत वेळ घालवाल आणि आनंददायक सहलींमध्ये सहभागी व्हाल. प्रियजनांकडून चांगली बातमी मिळण्याची शक्यता आहे. आजचा दिवस व्यक्तिगत यश वाढवेल.

**कर्क :** आपल्याला सौम्य आणि संवेदनशील लोकांसोबत चांगले संबंध राहतील. चांगल्या बातम्या येण्याची शक्यता आहे. धैर्य आणि साहस वाढवण्याची संधी मिळेल.

**सिंह :** व्यक्तिगत लाभ वाढवण्यासाठी प्रयत्न चालू राहतील. समर्पण स्थिर राहील. जबाबदा-यांना कार्यक्षमतेने पार पडाल. विवाह संबंधित चांगली बातमी ऐकण्याची शक्यता आहे.

**कन्या :** परीक्षा आणि स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी आपला प्रयत्न राहील. नोकरी आणि व्यवसायात आपला प्रभाव राखाल. बैठकीसाठी आणि संवादासाठी प्राधान्य द्या. तयारी चालू ठेवा.

**तूळ :** आजचा दिवस इतका चांगला नाही. नोकरीच्या ठिकाणी अघटीत घडेल. कौटुंबिक सदस्यांसोबत वाद होऊ शकतात. पालकांच्या आशीवार्दाने सुरू केलेल्या कायार्तून लाभ मिळेल.

**वृश्चिक :** आज आर्थिक बाबतीत उत्तम संधी मिळेल. घरात आनंदी वातावरण राहील. कौटुंबिक गोष्टींमध्ये वाढलेली रुची असेल. आपले सामाजिक वलय आणि संबंध वाढतील.

**धनु :** आजचा दिवस संमिश्र असा राहील. आरामदायक वातावरणापासून लाभ मिळेल. कामाच्या ठिकाणी चांगला वेळ घालवा. आपल्या कुटुंबासाठी विशेष लक्ष द्यावे.

मकर : हात लावाल त्या कामात यश मिळेल. गावात तुमचा रुबाब वाढेल. गावातील राजकारणापासून दूर राहा. महागाईमुळे त्रस्त व्हाल. परदेशी जाणा-यांसाठीआज अनुकूल दिवस असेल.

**कुंभ :** संभाषणांमध्ये माधुर्य राहील. प्रियजनांसोबत बाहेर जाऊन वेळ घालवणे मानसिक आरोग्याला लाभदायक ठरेल. दाम्पत्य जीवनात आज मतभेद होण्याची शक्यता आहे.

**मीन :** सर्वांबद्दल आदर दाखवण्याचा प्रयत्न करा. आज आपल्याला मूल्यवान गिफ्ट मिळण्याची शक्यता आहे. सुरक्षितता आणि संग्रहण्याबद्दल वाढलेली रुची असेल.


## आज का अंदाज

**मंगळवार १७ डिसेंबर २०२४**

जबरदस्त पास होणारे चान्सेस

**पत्थर फोड एकच**

### कल्याण बाजार

| 1 | 2 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 119 | 138 | 122 | 170 |
| 290 | 345 | 357 | 260 |
| 380 | 679 | 267 | 350 |
| 14 | 24 | 59 | 89 |
| 16 | 26 | 53 | 83 |
| 17 | 27 | 50 | 80 |

### मुंबई बाजार

| 4 | 5 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 149 | 780 | 178 | 234 |
| 257 | 150 | 358 | 450 |
| 789 | 348 | 277 | 379 |
| 41 | 51 | 67 | 97 |
| 40 | 50 | 68 | 98 |
| 42 | 52 | 63 | 93 |


**१७ डिसेंबर २०२४**
**सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| 31 | 61 | 78 | 08 |
| 32 | 62 | 79 | 09 |
| 34 | 64 | 75 | 05 |

कल्याण व मुंबईकरिता आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

**प्रो. बालाजी कुमार**
**9822486034**


# शब्दकोडे क्रमांक १९९५



**आडवे शब्द :-**

१) शोभिवंत
५) हाडवैरी, फार जुना आणि मोठा शत्रू
९) चंद्र
१२) हात
१३) फाजील, बडबडी, लोचट स्त्री
१६) आत्तापर्यंत
१८) मृत्युदेवता
१९) सुटकेचा मार्ग
२१) नातेवाईक
२२) एक जुनी लेखणी प्रकार
२४) दादला
२६) समतल
२८) हाट, मंडई
३०) संन्यासाचे निवासस्थान
३१) शक्यता
३२) डोंगराचा तुटलेला उभा कडा
३४) प्रभात
३६) सातू
३७) अंत:करण
३८) मज्जाव
३९) सैन्याचा मुक्काम, बूड
४०) फिकीर, काळजी
४२) गोलमटोल
४५) हिंदुंचे दोन महानग्रंथ
४९) लापशी, क्षीर
५१) थाटमाट, छानदारपणा
५२) सवय, अभ्यास,
५३) देवाशी केलेला करार
५४) माफ
५५) चौक
५७) सैन्याचा मालपुरवठा
५९) शपथ
६०) फळांच्या रसाचे पेय
६२) स्वत:बद्दल कमीपणाची भावना
६५) घाण
६६) सरहद्द
६७) वर्ष, साल
६८) ठोकाठोकी, हाणामारी
७०) वजन
७२) नोकरी
७३) कावळा
७५) रविवासर
७६) मसाल्यातील एक पदार्थ
७७) कर्ज देणारा

**उभे शब्द :-**

१) प्रशाला
२) निकट
३) पालखी, मेणा
४) मालक
५) संगत
६) आगबोट
७) नोकर,
८) शत्रुत्व
१०) जनाबाई
११) खोडकर, दुष्ट, खट्याळ
१४) अति परिश्रमामुळे अंगातून येणारा घाम
१५) कहाणीतील ऐसपैस गाव
१६) छाती
१७) सनई, चौघडा वगैरे ठेवण्याची बंदिस्त जागा
१९) हार
२०) गंध
२१) शिक्षा
२३) पंकज
२५) पहिला ऋतू
२७) एकाग्र नजर
२८) किंचित वक्रता
२९) हस-या चेहऱ्याचा
३३) दरवेश, फकिरांचा एक पंथ
३५) मृत्यू, वेळ
३६) सामान
३८) अभिप्राय
४०) लोकनाट्य
४१) अंगावर येणारा काटा
४३) रत्न
४४) पद्धतशीर
४६) चर्चा
४७) निष्ठूर, भावना नसलेला
४८) भूदल
५०) राखणदार
५६) कर्णेंद्रिय
५८) युद्ध
५९) सारख्या वजनाचे
६०) बातमी
६१) मुस्लीमांचा एक सण
६३) एक ज्वालाग्रही खनिज पदार्थ
६४) भीती
६७) फुरसत
६९) मनुष्य
७१) सूर्याचे एक नाव
७३) आजच्या आधीचा दिवस
७४) चोरी करणारा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



# वाल्मिक कराडला अटक करा अन्यथा आंदोलन, आमदार क्षीरसागर यांचा इशारा

**महासागर प्रतिनिधी, बीड दि. १६ :**
बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येमागे वाल्मिक कराड हा मुख्य सुत्रधार आहे. पोलिस या प्रकरणात दिशाभूल करत आहे. या अधिवेशनात वाल्मिक कराडला अटक झाली नाही तर अधिवेशन संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी आंदोलन पुकारण्यात येईल, असा इशारा बीडचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)चे आमदार संदीप क्षीरसागर यांनी विधानभवन परिसरात प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना सोमवारी दिली. संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. सध्या या प्रकरणावरून पोलिसांच्या कार्यशैलीवर शंका व्यक्त



करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर संदीप क्षीरसागर म्हणाले, पोलिस या प्रकरणात दिशाभूल करत आहे. या हत्येमागे वाल्मिक कराड असल्याचे सर्व पुरावे माझ्याकडे आहे. या घटनेनंतर संपूर्ण बीड जिल्ह्यात दहशतीचे वातावरण आहे. देशमुख कुटुंबीय भीतीच्या सावटखाली आहे. सरकारने या घटनेला कारणीभूत असलेल्या वाल्मिक कराडला अटक न केल्यास मोठे आंदोलन पुकारण्यात येणार आहे. आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले, बीड जिल्ह्यात दोन वर्षांत खून झाले आहेत. वाल्मिक कराड या सर्व प्रकरणांचा मास्टरमाइंड आहे. वाल्मिक कराडच्या मागे कोण, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे सरकारने जनतेच्या सुरक्षिततेचा परिचय देत त्याला अटक करावी. तसेच परभणी प्रकरणातील कारागृहात असलेल्या आंदोलकाच्या मृत्यूप्रकरणी जबाबदार पोलिस कर्मचाऱ्यांना तत्काळ निलंबित करावे. या दोन्ही मुद्यांच्या अनुषंगाने मविआतील आमदारांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. यावेळी आमदार अभिजित वंजारी, आमदार रोहित पाटील, आमदार भाई जगताप उपस्थित होते.

# बचत गटातील महिलांच्या योगदानातून तेजस्विनी महाराष्ट्रातील एकमेव पथदर्शी उपक्रम

**महासागर प्रतिनिधी, अकोला दि. १६ :**
महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत लोकसंचालित साधन केंद्र व बचत गटांतील महिलांच्या योगदानातून अकोल्यात तेजस्विनी भवन उभारण्यात आले आहे. साधन केंद्रातर्फे उभारलेली ही महाराष्ट्रातील पहिली इमारत ठरली. अकोल्यात हा पथदर्शी उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटाच्या चळवळीला बळ मिळणार आहे.
महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाली की कुटुंबाचा व समाजाचाही विकास होतो. त्यादृष्टीने विविध व्यवसाय, उपक्रमांची जोड देणे आवश्यक असते. शेतीपूरक व्यवसायांबरोबरच इतर व्यवसायांचाही विचार होणे गरजेचे आहे. महिलांना सक्षम करण्याचे कार्य बचत गटाच्या माध्यमातून होत असते. लोकसंचालित साधन केंद्र व बचत

- **महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत लोकसंचालित साधन केंद्र व बचत गटांतील महिलांच्या योगदानातून अकोल्यात तेजस्विनी भवन उभारण्यात आले आहे.**
- **या उपक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटाच्या चळवळीला बळ मिळणार आहे.**




गटातील महिलांनी शहरातील डाबकी रस्त्यावरील उगलेवाडीत तेजस्विनी भवन साकारले आहे. या वास्तूचे उद्घाटन नुकतेच जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते झाले. बचत गटांच्या माध्यमांतून ग्रामीण व शहरी भागात विविध व्यवसाय करणाऱ्या महिलांचे एकत्रीकरण झाले. महिलांच्या कष्ट व योगदानातून शहरात तेजस्विनी भवनची वास्तू उभी राहिली आहे. तेजस्विनी भवनाची दोन मजली इमारत असून, त्यात कार्यालय, प्रशिक्षण सभागृह, वाहनतळ, स्वच्छतागृह आदी सुविधा आहेत. ही वास्तू तीन हजार फुटांच्या क्षेत्रात सुमारे लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात आली आहे. तालुका लोकसंचालित साधन केंद्रातर्फे एक हजार बचत गट व सुमारे हजार महिला संघटक कार्यरत आहेत. या सर्व महिलांना उद्योग- व्यवसाय उभारणीसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन करण्यात येते. त्यामुळे अकोला तालुक्यात गावोगाव अनेक छोटे व्यवसाय सुरू झाले आहेत. आता तेजस्विनी भवन निर्माण झाल्यामुळे गटांना उत्तम प्रशिक्षणासाठी सभागृहाची सुविधा उपलब्ध झाली, असे लोकसंचालित साधन केंद्राच्या व्यवस्थापक सोनाली अंबरते यांनी सांगितले.

**सुवर्ण महोत्सवी वर्षात स्वबळावर इमारत**
माविमच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात केंद्राची स्वबळावर इमारत उभी झाली. हे महिलांच्या स्वयंपूर्णतेचे आदर्श उदाहरण ठरत आहे. जिल्ह्यात तूर डाळ, सोयाबीन, कपाशी ही प्रमुख पिके आहेत. त्यातून बचत गटाच्या माध्यमातून कृषी प्रक्रिया व्यवसायांचे जाळे निर्माण होऊ शकते. लोकसंचालित साधन केंद्र व बचत गटांतील महिलांच्या योगदानातून अकोल्यात तेजस्विनी भवन उभारले. या प्रकारची महाराष्ट्रातील पहिली इमारत आहे. बचत गटाच्या चळवळीतील हा महत्त्वाचा टप्पा ठरला.

# चिखलीत पिसाळलेल्या कुत्र्याचा हैदोस

**महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :**
बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहरात पिसाळलेल्या कुत्र्याने हैदोस घातला आहे. या कुत्र्याने अनेकांना चावा घेतल्याने शहरवासीयांत भीती आणि दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रामुख्याने चिखली शहरातील आठवडी बाजार, तहसील कार्यालय परिसर आणि राऊतवाडी परिसरात या कुत्र्याने तब्बल ३० नागरिकांना चावा घेतला. तहसिल कार्यालय, आठवडी बाजार हे सार्वजनिकपरिसर दिवसभर गजबजलेले राहतात. यामुळे या पिसाळलेल्या कुत्र्याचा धोका जास्तच वाढला आहे. सध्या अधून मधून असणारे ढगाळ वातावरण कुत्र्याने दंश केलेल्या रुग्णांसाठी जास्त धोकादायक असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. या घटनेमुळे शहरभर खळबळ माजली आहे. प्राप्त माहितीनुसार चिखली येथील



शासकीय सामान्य रुग्णालयात कुत्र्याने चावा घेतलेल्या पिडीत रुग्णांवर उपचार सुरू आहे. मात्र यातील आठ ते नऊ रुग्ण गंभीर असल्यामुळे त्यांना बुलढाणा येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आले आहे. चिखलीमध्ये या पिसाळलेल्या कुत्र्यामुळे नागरिकांत निर्माण झाली आहे.

**विषेश पथक गठीत**
चिखली नगरपालिकेचे मुख्य अधिकारी प्रशांत बिडगर यांना याची माहिती मिळताच त्यांनी गंभीर दखल घेतली. तसेच या पिसाळलेल्या कुत्र्याला पकडण्यासाठी पालिका कर्मचाऱ्यांची विशेष चमू तयार केली

**प्रामुख्याने चिखली शहरातील आठवडी बाजार, तहसील कार्यालय परिसर आणि राऊतवाडी परिसरात या कुत्र्याने तब्बल ३० नागरिकांना चावा घेतला.**

आहे. हे विशेष पथक राऊत वाडी, आठवडी बाजार, चिखली तहसिल कार्यालय परिसरात त्या कुत्र्याचा शोध घेत आहे. हजारो चिखली शहर वासीयांना या कुत्र्याने सळो की पळो करून सोडले आहे. या पिसाळलेल्या कुत्र्याचा ठावठिकाणा माहीत झालेल्या नागरिकांनी याची माहिती तात्काळ संबधित विशेष पथक अथवा नगरपालिकेला कळवावी असे आवाहन मुख्याध्याधिकारी प्रशांत बंडगर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मंदिरावर हल्ला झाला! त्या क्रमांकावर संदेश आल्याने पोलिसांची धावपळ

**बुलढाणा :** अचानक उद्भवलेल्या आणीबाणीच्या प्रसंगाची पोलिसांना माहिती देण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या प्रणालीवर चुकीची माहिती देणाऱ्या मेहकर येथील सर्किट युवकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. त्याने मध्यरात्री मंदिरावर हल्ला झाल्याचा संदेश ११२ वर दिल्याने मेहकर पोलिसांची धावपळ झाली होती. प्रत्यक्षात तसे काही झाले नसल्याचे आढळून आल्यावर त्याने वाहने जाळून टाकण्याची धमकी दिली. यामुळे त्याच्या विरुद्ध बुधवारी गुन्हा दाखल करून मेहकर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

# परभणीतील घटनेचे बुलढाणा जिल्ह्यात पडसाद, मलकापूर पांग्रा कडकडीत बंद

**परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली.**

**महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :**
परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली. पोलिसांच्या कोठडीत असलेल्या कार्यकर्त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेचे पडसाद राज्यात उमटत आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथे आज सोमवारी, १६ डिसेंबर रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला.



परभणी येथील घटनेचे पडसाद ठिकठिकाणी उमटत असल्याचे पाहण्यास मिळत आहेत. महाराष्ट्र बंदचे आवाहन केल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी या बंदला प्रतिसाद मिळत आहे. या घटनेच्या निषेधार्थ मलकापूर पांगरा येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. यामुळे गावातील दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले. सर्व जाती धर्माच्या लहान मोठ्या दुकानदार, व्यावसायिक, किरकोळ विक्रेते यांनी बंदच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपापली दुकाने बंद ठेवली. यावेळी बसस्थानक परिसरात असलेली सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. या दुर्दैवी घटनेची सखोल चौकशी करून दोषीवर कडक कार्यवाही करण्याची मागणी यावेळी गावकऱ्यांकडून करण्यात आली. बंद यशस्वी करण्यासाठी मलकापूर पांगरा ग्रामपंचायतचे सदस्य राजू साळवे, कैलास साळवे, दिलीप काकडे, बाळू पवार, रामेश्वर सोनकांबळे, गजानन चरवे, किशोर साळवे, अक्षय मगर, आदींनी पुढाकार घेतला.

# अल्पवयीन मुलीवर मातृत्व लादले

आरोपीस जन्मठेप , डीएनए चाचणी निर्णायक अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी मलकापूर न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.



**महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :** अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करून तिला गर्भवती केल्याप्रकरणी मलकापूर न्यायालयाने आरोपीस जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. तसेच हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास वर्षे सश्रम कारावासाची शिक्षाही सुनावण्यात आली आहे.
बुलढाणा जिल्ह्यातील मलकापुर न्यायालयाचे जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा विशेष न्यायाधिश एस. व्ही. जाधव यांनी सोमवारी, ९ डिसेंबर रोजी हा निकाल दिला. पीडितेची डीएनए चाचणी निकालात निर्णायक घटक ठरली. मलकापुर येथील एका अल्पवयीन मुलीला किसना यादव सोनोने तसेच अमोल समाधान वानखेडे (राहणार मलकापूर) या दोघांनी त्यांचे घरी बोलावून लैगिक अत्याचार केला. त्यामधून ती गर्भवती राहिली. सदर घटनेबाबत पिडितेने मलकापूर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. दोषारोपपत्र विशेष न्यायालय मलकापूररयेथे दाखल करण्यात आले होते. आरोपी किसना यादव सोनोने हा प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान फरार झाला. आरोपी अमोल समाधान वानखेडे याचा जामिन अर्ज न्यायालयाने फेटाळल्यानंतर त्यास न्यायालयीन बंदी ठेवून सदरचे प्रकरणपुढ चालवण्यात आले. आरोपी अमोल समाधान वानखेडे यांचेविरूद्ध सरकार पक्षातर्फे साक्षीदार तपासण्यात आले. त्यापैकी पिडीता, तिची आई, वैद्यकीय अधिकारी तसेच डी.एन.ए. तज्ञ, व तपास अधिकारी यांचे पुराव्यानंतर आरोपी अमोल समाधान वानखेडे याचे विरूद्ध गुन्हा सिद्ध झाला. अंतिम सुनावणी होवून सरकार पक्षातर्फे शैलेश जोशी विशेष सरकारी अभियोक्ता यांनी केलेला युक्तिवाद ग्राहय धरण्यात आला. आरोपी अमोल समाधान वानखेडे यास अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्याचे कलम सहवाचनिय कलम (जे) नुसार जन्मठेप म्हणजेच उर्वरीत आयुष्य आहे तो पर्यंत शिक्षा तसेच २५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास दोन वर्षे सक्त मजुरी तसेच कलम पोक्सो कायद्यानुसार जन्मठेप व हजार दंड, दंड न भरल्यास दोन वर्षे सक्त मजुरी तसेच कलम भा.दं. वि.नुसार वर्षे शिक्षा तसेच कलम भा.दं. वि. नुसार वर्षे शिक्षा आरोपीस सुनावली आहे.
अमोल वानखेडे यांचेकडून ५० हजार रूपये दंड वसुल झाल्यानंतर सदर रक्कम पिडीतेस देण्याचा आदेशही न्यायालयाने दिला आहे .तसेच सामाजिक न्याय विभागा मार्फत देण्यात येणाऱ्या पिडीत नुकसान भरपाई योजनेअंतर्गत सुद्धा जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बुलढाणा यांना अतिरीक्त नुकसान भरपाई ठरवून पिडीतेस देण्याबाबत सुद्धा आदेश देण्यात आला आहे. प्रकरणाचा तपास मलकापूर ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक गणेश शिंदे यांनी केला होता. तसेच पैरवी अधिकारी म्हणून पोलिस उपनिरीक्षक संतोष भिकाजी कोल्हे यांनी काम पाहिले. पिडीतेतर्फे ॲड. विशाल गोविंदा इंगळे यांनी सरकार पक्षास मदत केली.

## स्कूलबस आणि दुचाकीची धडक, युवकाचा मृत्यू



**महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :** बुलढाणा-चिखली राज्य मार्गावर आज झालेल्या अपघातात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. बुलढाणा नजीकच्या येळगाव नजीक एका शैक्षणिक संस्थेची बस आणि दुचाकीची समोरासमोर धडक होऊन ही दुर्घटना घडली. आज बुधवारी, ११ डिसेंबर रोजी झालेल्या या दुर्देवी अपघातात येळगाव जवळील आश्रम शाळेजवळ ही घटना घडली. अपघातात ठार झालेला तरुण हा बुलढाणा तालुक्यातील खूपगाव येथील रहिवासी असून जिवन इंगळे असे अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे.

# आता समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्याही बदल्या होणार

**राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना संपूर्ण सेवा कालावधीत एक वेळ विशेष बाब म्हणून बदली करण्यास राज्य शासनाने मंजुरात दिली आहे समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीचा मार्ग आता सुकर झाला पूर्वी स्थिर राहावे लागत होते बदल्या होणार**



**महासागर प्रतिनिधी, बुलढाणा दि. १६ :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत समुदाय आरोग्य अधिकारी पदी नियुक्ती झाली की त्या कर्मचाऱ्याला एकाच ठिकाणी कायम 'अडकून' पडावे लागत होते! याचे कारण या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदलीचे प्रावधानच नव्हते मात्र आता त्यांच्या बदलीचा मार्ग सुकर झाला आहे. या संदर्भाततील शासन निर्णय १० डिसेंबर रोजी निर्गमित झाला आहे. या निर्णयाचे कर्मचाऱ्यांकाडून स्वागत करण्यात आले आहे. केंद्रीय आरोग्य, आयुष, परिवार कल्याण राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे .केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांच्या बदल्या होत नव्हत्या. या अभियानांतर्गत नोकरीला लागल्यानंतर एकाच पदावर एकाच ठिकाणी कर्मचाऱ्यांना काम करावे लागत होते. बुलढाणा जिल्हाच नव्हे तर राज्यातील समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांची ही अडचण ठरली. या विभागांतर्गत काम करत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्या बदली संदर्भातील विनंती केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे केली होती. अधिकाऱ्यांच्या बदली विनंती संदर्भात आणि बदलीच्या मागणीसाठी पाठपुरावा करण्यात आला होता. या पाठपुराव्याला यश आले आहे.

**एक वेळ बदलीस मुभा!**
राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना संपूर्ण सेवा कालावधीत एक वेळ विशेष बाब म्हणून बदली करण्यास राज्य शासनाने मंजुरात दिली आहे. या संदर्भातील शासन निर्णय डिसेंबर रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे त्यामुळे आता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असलेल्या समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांच्या बदलीचा मार्ग सुकर झाला आहे .
यामुळे समुदाय आरोग्य अधिकारी प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांनी केंद्रीय आरोग्य राज्य मंत्र्यांचे आभार मानले आहे.

# पतंगाचा दोर, आयुष्याला घोर, विजेच्या धक्क्याने एका बालकाचा

**महासागर प्रतिनिधी, यवतमाळ दि. १६ :**
आर्णी येथे घराच्या छतावर पंतग उडविताना विजेच्या तारेला स्पर्श झाल्याने बालकाचा मृत्यू झाला. अन्य एका घटनेत बाभूळगाव तालुक्यात तारेच्या कुंपणात सोडण्यात आलेल्या वीज प्रवाहाचा धक्का लागून शेतकऱ्याचा मृत्यू झाला. रितेश संजय सुरजुसे (१३, रा. गांधीनगर आर्णी) व बाबाराव मारोती कुमरे (५५, रा. खडकसावंगा, बाभूळगाव) अशी मृतांची नावे आहेत. आर्णीतील गांधीनगर येथील रितेश हा रविवारी घराच्या छतावर पंतग उडवित होता. खांबावरून घरात वीजप्रवाह सोडलेल्या केबलच्या कापलेल्या भागास रितेशचा स्पर्श झाला. ला विजेचा जोरदार झटका बसला. जखमी अवस्थेत दवाखान्यात नेताना त्याचा मृत्यू झाला. रितेशला वडील नसून, मोठा भाऊ गतिमंद आहे. आई त्यांचा सांभाळ करते. रितेशच्या मृत्यूने रोजमजुरी करणाऱ्या सूरजुसे परिवारावर संकट ओढवले आहे. मागील १५ दिवसांत मांजामुळे गळा कापल्याने तिघेजण गंभीर जखमी झाले होते. आता पतंग उडविताना विजेचा धक्का लागल्याने बालकाचा मृत्यू झाल्याने पतंगीचा खेळ आयुष्याची दोरी कापत असल्याची चर्चा आहे. दुसऱ्या घटनेत बाभूळगाव तालुक्यातील खडकसावंगा येथील शेतकरी बाबाराव कुमरे हे प्रतापपूर शिवारात गुरांसाठी चारा आणण्यासाठी गेले होते. रात्री उशिरापर्यंत ते घरी परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला. रविवारी बाबाराव पिटकर यांच्या शेतात त्यांचा मृतदेह आढळला. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी कुंपणाच्या तारांमध्ये वीज प्रवाह सोडण्यात आला होता. त्यातील विजेच्या धक्क्याने बाबाराव यांचा मृत्यू झाल्याची तक्रार अरविंद कुमरे यांनी बाभूळगाव पोलीस ठाण्यात दिली. आंतरजातीय विवाह केलेल्या विवाहितेची छळामुळे आत्महत्या महागाव तालुक्यातील मुडाणा येथे आंतरजातीय विवाह केलेल्या विवाहितेने विहिरीत उडी घेऊन आत्महत्या केली. पल्लवी विकास भुतेकर (२३) असे मृत महिलेचे नाव आहे. तिने पाच वर्षांपूर्वी विकास प्रकाश भुतेकर याच्यासोबत आंतरजातीय प्रेम विवाह केला होता. मात्र पतीसह सासरची मंडळी सतत मानसिक व शारीरिक त्रास देत असल्याने तिने आत्महत्या केल्याची तक्रार तिचे वडील तुकाराम धोत्रे यांनी महागाव पोलीस ठाण्यात केली.

## आरटीई प्रवेश प्रक्रिया यंदा वेळेवर?

### शाळा नोंदणीस १८ डिसेंबरपासून प्रारंभ

**अमरावती :** खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मोफत प्रवेश सुविधा देणारी आरटीईची प्रवेशप्रक्रिया यंदा १८ डिसेंबरला शाळा नोंदणीपासून सुरू होणार आहे. जानेवारी महिन्यात विद्यार्थी नोंदणीला सुरुवात होईल. तर, मार्च महिन्यात प्रवेशासाठीची लॉटरी जाहीर होईल. यंदा पहिल्यांदाच जून-जुलै महिन्यात संपूर्ण प्रवेशप्रक्रिया पूर्ण होईल. त्यामुळे नियमित वेळेत आरटीईअंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे वर्गही सुरू होऊ शकतील. बालकांच्या मोफत शिक्षणहक्क कायद्यांतर्गत विशेष करून इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये २५ टक्के जागा या राखीव ठेवल्या जातात. या सर्व जागांवर आरक्षित प्रवर्ग तसेच आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आरटीई प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जाते.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **BAYA BEE**. NOW MY NEW NAME IS **BAYA BEE WAHAB.**
**ADD :** 136, ZINGABAI TAKLI, NEAR MASJID, JUNI BASTI, NAGPUR - 440030

MY OLD NAME WAS **KANCHAN BALA TAJPURIYA**. NOW MY NEW NAME IS **KANCHAN TAJPURIYA.**
**ADD :** PLOT NO. N-1, EIGHT CROSS ROAD LAXMI NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **MANOJKUMAR RADHESHYAM TAJPURIYA.** NOW MY NEW NAME IS **MANOJ RADHESHYAM TAJPURIYA.**
**ADD :** PLOT NO. N-1, EIGHT CROSS ROAD LAXMI NAGAR NAGPUR

MY OLD NAME WAS **ALI HUSEIN**. NOW MY NEW NAME IS **ALI HUSEN MOHAMMAD HANIF ANSARI.**
**ADD :** NEAR MIRA DATAR DARGAH 1061 YOGI ARVIND NAGAR NAGPUR 440026

**कार्यालय नगर पंचायत, महादुला**
जिल्हा - नागपूर
**निवीदा सूचना**
दिनांक :- 16/12/2024

महादुला नगर पंचायतचे सन २०२४-२५ व २०२५-२६ या दोन वर्षाकरिता खालील प्रमाणे कामे सनदी लेखापाल कडून करून घ्यावयाची आहे. या बाबत रोखीने निविदा फार्म फी रूपये ५००/- प्रत्येक कामा प्रमाणे पावती सह निविदा फॉर्म मध्ये आपले दर दिनांक २५/१२/२०२४ ला दुपारी ५.०० वाजे पावतो सिलबंद लिफाफा ०१ व ०२ मध्ये लेखे विभाग नगर पंचायत महादुला कडे सादर करावे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | अनामत रक्कम |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र नगर पंचायत लेखा संहिता २०११ नुसार महादुला नगर पंचायतचे सन २०२४-२५ व २०२५-२६ या वर्षातील उपर्जित तत्वावरील दुहेरी नोंद लेखा पध्दती प्रमाणे लेखे तयार करणे. | २०००/- |
| २ | नगर पंचायत कार्यालय महादुला चे सन सन २०२५-२५ व २०२५-२६ पर्यंत शासकीय देणी जि.एस.टी. (टी.डी.एस.) आ.टी. (टी.डी.एस.) पी.टी. चे मासिक, त्रेमासिक व वार्षिक रिटर्न्स जमा करणे. | २०००/- |

निविदाचा विस्तृत नमुना व अधिक माहितीसाठी नगर पंचायत कार्यालय महादुला येथे संपर्क साधावा.

मुख्याधिकारी
नगर पंचायत कार्यालय
महादुला

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

## फंडू एसएमएस

घडी घडी सेल्फी लेने वाली
लडकियों के मोबाईल
कुछ टाईम बाद खुद ही
बोलते हैं... चलो मुंह
बनाओ, सेल्फी लेनी है!

एक बार याद करके तो
देखो... एक बार पुकार
के, कॉल करके दो देखो,
अगर हम ना आए तो समझ
लेना... हम सो गए हैं और
फोन सायलेंट पर है!

अल्फाज तय
करते है फैसले
किरदारों के...
उतरना दिल में है
या दिल से
उतरना है...

# नकारात्मक विचार येतात...



मी २० वर्षांचा तरूण आहे. शालेय जीवनापासूनच मी अभ्यासात हुशार आहे. पण सध्या माझं अभ्यासावरचं लक्ष उडालं आहे. मनात सतत नकारात्मक विचार येतात. आयुष्यात काहीच करू शकणार नाही, असं सतत वाटत राहतं. सगळं सोडून दूर कुठे तरी जावं, असं वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर:** मित्रा, अभ्यासावरचं लक्ष उडण्यामागचं कारण तू स्पष्ट केलेलं नाही. तुला अपयश आलं आहे का? असं असेल तर यामुळे घाबरून जाऊनकोस. आयुष्यात कसोटीचे प्रसंग येत राहतात. त्याला पर्याय नाही. नकारात्मकता दूर ठेवण्याचा प्रयत्न कर. अभ्यासाकडे लक्ष दे.

**लाईफ गुरू**

प्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठी समुपदेशकाची मदत घे. आयुष्यात कधी कधी नैराश्याचे प्रसंग येतात. हेच प्रसंग आपल्याला सक्षम बनवत असतात, पारखत असतात. त्यामुळे मनाला कणखर बनव आणि अभ्यासात मन रमव. आवडीच्या गोष्टी कर. मित्रांसोबत थोडा वेळ घालव. यामुळे तुझ्या मनावरचं मळभ दूर होईल.






**तो मोटिव्हेशनल स्पीकर आहे. आयआयटी इंजिनिअर आहे. इतकंच नाही, तर तो गातो, गिटार वाजवतो आणि पोहतोसुद्धा. सर्वसामान्य ऑलराउंडर मुलगा हे करू शकतो. पण, जन्मत:च अपंग असलेल्या शिवम पोरवालने स्वत:च्या मेहनतीने आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वत:चं जग निर्माण केलं .**

# जग शिवमचं...

शिवम पोरवाल फोकोमेलिया सिंड्रोम हा विकार घेऊनच जन्मला. हा विकार झालेल्या व्यक्तीला हात, पाय नसतात किंवा ते कार्य करत नाहीत. त्याच्या उजव्या हाताला तीनच बोटं आहेत तर डाव्या हाताचा अंगठा पहिल्या बोटाशी जुळलेला आहे. आजही तो गुडघ्यांवर चालतो. पण परिस्थितीपुढे त्याने हार मानली नाही. जन्म झाल्यानंतर ही अवस्था बघून त्याला मारून टाकण्याचा सल्ला अनेकांनी दिला. त्याला बघण्यासाठी लोक लांबून येत असत. त्याची मस्करी करत. सहानुभूती दाखवत पण सुरूवातीपासूनच शिवमने संघर्षाची तयारी केली होती. त्याने सर्वसामान्य मुलांसारखं जगण्याचं आव्हान स्वीकारायचं ठरवलं. तो मध्य प्रदेशमधल्या माहिदपूर या छोट्याशा गावी एकत्र कुटुंबात रहात होता. त्याचे वडिल पानाच्या ठेल्यावर काम करत असत. त्यांना महिन्याला अवघे १०० रूपये मिळत असत. इतर मुलांप्रमाणे तो शारीरिक कामं करू शकत नसला तरी नव्या गोष्टी झटपट शिकून घेत असे. प्रत्येक गोष्ट तो अगदी मनापासून करत असे. शिवमचा हाच गुण ओळखून वडिलांनी त्याला शिक्षण द्यायचं ठरवलं. शिक्षणामुळेच तो स्वावलंबी आणि सक्षम बनू शकेल, असं त्यांना वाटायचं. शाळेत असताना शिक्षकांना त्याचं कौतुक होतं पण, इतर मुलं त्याची मस्करी करत असत. सुरूवातीला तो हिंदी माध्यमात शिकला. त्यानंतर त्याला इंग्रजी माध्यमात घालण्यात आलं. इथेही स्वत:च्या बुद्धीच्या जोरावर त्याने नाव कमावलं. वडिलांनी त्याला स्कूटर आणून दिली. त्यामुळे तो एकट्याने प्रवास करू लागला. या घटनेने त्याच्या आयुष्याला नवं वळण मिळालं.

**अचिव्हर**

शिवमला सतत काही तरी नवं करायला आवडतं. तो पोहायला शिकला. प्रशिक्षकांनी त्याची पॅराऑलिम्पिकसाठी तयारी करून घेतली. त्याने गेट परीक्षा दिली. त्याला आयआयटी पाटणामध्ये प्रवेश मिळाला. त्याने बीएसएनएलमध्ये टेलिकॉम ऑफिसर म्हणून कामाला सुरूवात केली. आज तो कॉम्प्युटर इंजिनिअर, प्रोग्रामर आहे. मोटिव्हेशनल स्पीकर म्हणून तो भाषणं देतो. त्याला पोहता येतं, गाता येतं. तो कविता करतो. तो गिटार वाजवायला शिकला आहे. आशा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने सगळं मिळवलं आहे. इतरांसाठी आशास्थान बनण्याचा त्याचा मानस आहे.

# फंडे सेफ बायकिंगचे



दोस्तांनो, मोटरसायकल कितीही आकर्षक वाटत असली तरी चार चाकी गाड्यांइतकी सुरक्षित नसते. झिप झॅप झूम... करत वाहतुकीतून वाट काढताना थ्रीलिंग वाटतं खरं! पण ते जीवघेणं तर ठरत नाही ना, याचा विचार व्हावा. बाईकवरून वाऱ्याच्या वेगावर स्वार व्हायला छान वाटतं. पण बाईक घसरली तर सुरक्षा मिळत नाहीं. तुम्ही स्वत: सुरक्षित राहायला हवंच. शिवाय इतरांच्या सुरक्षेचा विचारही करायला हवा. यासाठीच्या काही टिप्स...

बाईकचे लायसन्स मिळवण्यासाठी आधी ती आपल्याला यायला हवी. त्यामुळे आधी बाईक नीट शिकून घ्या. बाईक चालवण्याचं तंत्र शिकवणारे क्लासेस असतात. आपल्या सुरक्षेसाठी काय करायचं, याचे धडेही अशा ठिकाणी दिले जातात. नवी बाईक घ्यायची तर अशा क्लासेसना जाता येईल.

**बायकिंग**

* दोस्तांनो, शॉर्टस आणि साध्या चपला घालून बाईक चालवणारे बरेचजण दिसतील. पण बाईक चालवताना सुरक्षा मिळावी, यासाठी कपडेही तसेच हवे. म्हणून अनेकजण लेदरचा वापर करताना दिसतात. लेदर जॅकेट्स आणि पँट्स घातल्याने बाईक घसरली तरी थोडी सुरक्षा मिळू शकते.
* बाईक चालवताना पायांनाही सुरक्षा मिळायला हवी. त्यामुळे बूट योग्य पद्धतीचे हवेत. बाईकचं गियर बदलताना पायांचा वापर केला जातो. फ्लिपफ्लॉपमुळे पाय घसरू शकतो. पायांना स्थैर्य देणारे शूज घाला.
* मोटरसायकल चालवणं एक कला आहे. इतर प्रत्येक कलेप्रमाणे ती नीट यायला हवी. यासाठी बाईक चालवायला नीट शिकून घ्यायला हवं.
* बाईक चालवताना गाणी ऐकणं, फोनवर बोलणं, इकडे तिकडे बघणं असं काहीही नको. आसपास काय चाललंय, याकडे नीट लक्ष द्या. आजूबाजूच्या वाहतुकीचा अंदाज घ्या. वाहतुकीच्या वेगानुसारच बाईक हाका. तुमचं संपूर्ण लक्ष बाईकवर केंद्रीत करा.

# फूड केमिस्ट होण्यासाठी...

आपण खात असलेलं अन्न दर्जेदार आणि सकस असायला हवं. या अन्नामुळे शरीराचं कोणतंही नुकसान होऊनये, असा आपला प्रयत्न असतो. अन्न दर्जेदार आहे किंवा नाही हे फूड केमिस्ट ठरवतात. खाण्या-पिण्याची आवड असेल तर तुम्हीही हे क्षेत्र निवडू शकता. रसायनशास्त्र, विज्ञान आणि अन्न अशा तिन्हींमध्ये रस असेल तर तुम्ही फूड केमिस्ट म्हणून स्वत:चं करीअर घडवू शकता. लोकांना सकस आणि उत्कृष्ट अन्न मिळावं, अशी तुमची इच्छा असेल तर हे क्षेत्र तुमच्यासाठी अगदी योग्य आहे. अन्न आणि अन्नातले घटक आरोग्यादायी असावेत, यावर फूड केमिस्टचा भर असतो. हुशारी आणि भावनिक स्थैर्य या दोन्ही गोष्टी या क्षेत्रातल्या



करीअरसाठी गरजेच्या आहेत. फूड केमिस्टला बरंच संशोधन करावं लागतं. त्यांना प्रयोगशाळांमध्ये काम करावं लागतं. या क्षेत्रात येण्यासाठी संवादकौशल्य गरजेचं आहे. आपलं संशोधन, निष्कर्ष इतरांपर्यंत पोहोचवण्याची कला तुमच्याकडे असायला हवी. कारकिर्दीत किती उंची गाठायची आहे यावरून या क्षेत्रातलं शिक्षण ठरतं. शिक्षण जेवढं जास्त तेवढ्या संधीही जास्त मिळतात. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी रसायनशास्त्र, फूड केमिस्ट्री आणि बायोलॉजी या विषयांचा पाया भक्कम असायला हवा. रसायनशास्त्र, फुड केमिस्ट्री, फार्मास्युटिकल केमिस्ट्री किंवा फूड सायन्स या विषयांमध्ये पदवी मिळवून पुढे जाता येईल. या क्षेत्रासाठी उमेदवाराकडे सामाजिक दृष्टीकोन असणं महत्त्वाचं आहे.

**फ्युचर ऑप्शन्स**

# घुमना भी, फिटनेस भी



दोस्तांनो, भटकंतीला गेल्यावर फिटनेसकडे थोडं दुर्लक्षच होतं. रूटीनमधून ब्रेक घेतल्याने मग सगळं कसं अगदी निवांत असतं. त्यामुळे व्यायामाला आपोआप सुटी मिळते. खादाडीही जरा जास्तच होते. मग काय वजन वाढतं. पण, भटकंतीदरम्यानही तुम्ही फिटनेस जपू शकता.

* नव्या वातावरणाचा आनंद लुटताना शारीरिक हालचालही करा. दररोज काही तरी ठरवा. सायकल भाड्याने घ्या. सायकल चालवत निसर्गाचा आनंद लुटा. जिने चढा. शक्य तितकं चाला, हायकिंग करा. जवळच्या बागेत फेरफटका मारा.
* नव्या ठिकाणी चालत फिरण्यासारखी मजा नाही. या निमित्ताने स्थानिक संस्कृती जवळून पाहता येते. शहरात चालत भटकंती करा.
* साईटसीईंगला निघण्याआधी थोडा व्यायाम करा.

**भटकंती**

यानंतर हेल्दी ब्रेकफास्ट घ्या. यामुळे तुम्ही दिवसभर ताजेतवाने राहू शकाल. व्यायामामुळे तुमच्या कॅलरी खर्च होतील. दिवसभर उत्साह वाटेल.

* तिकिटांच्या खरेदीसाठी किंवा पर्यटनस्थळी रांग लावावी लागत असेल तर फक्त उभे राहू नका. थोडं जॉगिंग करा. पोट आत घेऊन दीर्घ श्वसन करा. हातापायांचे व्यायामही करता येतील. लोकांनी थोडं विचित्र नजरेने पाहिलं तरी काळजी करू नका. यामुळे तुम्हाला खूप उत्साही वाटेल.



# एक्सिपरिमेंट्स विथ परफ्युम्स

मित्रांनो, तुमच्या वॉर्डरोबमध्ये एखादा परफ्युम असेलच. परफ्युममुळे मस्त वातावरण तयार होतं. यार-दोस्तांची मैफल जमली असेल तर परफ्युम मस्टच. डेटवर जाताना तर परफ्युम शिंपडायलाच हवा. पेहरावाप्रमाणे परफ्युमही मिक्स अँड मॅच करता येतो. परफ्युम वापरतानाही निरनिराळे प्रयोग करता येतात. हे नेमकं कसं साधायचं हे जाणून घेऊया.

**ग्रूमिंग**

* कपड्यांवर सौम्य परफ्युम शिंपडता येईल. तर शरीरावर थोडं उग्र वासाचं परफ्युम चालून जाईल. एकाच वेळी ही दोन्ही परफ्युम्स कॅरी करता येतील. कपड्यांवरचा परफ्युम उडून गेला तरी शरीरावरचा सुगंध दरवळत राहील.
* एकाच वेळी वेगवेगळ्या कंपन्यांची परफ्युम्स शिंपडल्याने सगळ्याचा पार विचका होऊ शकतो. डोकं दुखायला लागतं. त्यामुळे एकाच प्रकारचा सुगंध असलेल्या दोन परफ्युम्सचं कॉम्बिनेशन करा.
* परफ्युम्सचं कॉम्बिनेशन करताना तुम्ही कल्पकता वापरू शकता पण, वुडी, फ्लोरल, फ्रेश आणि सिट्रस अशा सुगंधांमध्ये प्रयोग करा.
* परफ्युम्सचं लेअरिंग करताना थोडी काळजी घ्यायला हवी. एखादा परफ्युम कपड्यावर शिंपडल्यावर वेगळा वास येऊ शकतो तर शरीरावरचा वास वेगळा असू शकतो. त्यामुळे कोणता वास जास्त चांगला वाटेल, हे आधी ठरवा.
* परफ्युमचा वास जास्त काळ टिकवून ठेवायचा असेल तर ते शिंपडण्याआधी चांगलं बॉडी लोशन किंवा सुगंधी तेलाने शरीराला मसाज करा.

# कडकी लागलीये?



दोस्तांनो, खिशात कितीही पैसा खुळखुळत असला तरी कडकीची वेळ कधीतरी येतेच. पैशांची तंगी जाणवत असताना काही सुचतच नाही. कधी पगार उशीरा होतो तर कधी कर्जाचे, क्रेडिट कार्डाचे हप्ते फेडण्याच्या नादात हातात काहीच उरत नाही. अशा वेळी कोणाकडून पैसे उधार तरी घ्यावे लागतात किंवा आहे त्यातूनच भागवावं लागतं. या परिस्थितीत पैसा कसा वापरायचा? जाणून घेऊ. पैसा नसेल तर सवलतींचा शोध घ्यायला सुरूवात करा. बाय वन गेट वन फ्री, ५० टक्के डिस्काउंट अशा योजना असतात. सुपरमार्केट, हायपरमार्केटमध्ये अशा सवलती वर्षभर सुरू असतात. कपडे सेलमधून घ्या. ऑनलाईन शॉपिंगवर बऱ्यात सवलती असतात. सणावारी अशा साईट्स योजना जाहीर करतात. तेव्हा खरेदी करा आणि पैसे वाचवा. वर्तमानपत्रासोबत येणारी डिस्काउंट कुपन्स जपून ठेवा.

**मनी मॅनेजमेंट**

* रेडी टू ईट फूडच्या किंमती बऱ्याच असल्याने पैसा खर्च होतो. यातून पोषणमूल्यंही मिळत नाहीत. त्यामुळे थोडा फार स्वयंपाक शिका. आमटी भात, मुगाच्या डाळीची खिचडी असे पदार्थ बनवता येतील. यामुळे बाहेरील पदार्थासाठी खर्च होणारे बरेच पैसे वाचतील.
* किराणाच्या किंमती सतत कमी-जास्त होतात. दर कमी झाले की वर्षभराचं सामान भरून ठेवा.
* क्रेडिट कार्डामुळे खर्च भरपूर वाढतो. त्याऐवजी डेबिट कार्ड वापरा. यामुळे जितके पैसे आहेत तेवढाच खर्च होईल.

## स्मार्ट गॅझेट

### वायफाय कनेक्ट होत नाही?

आता टीव्हीही स्मार्ट झाला आहे. टीव्ही वायफायशी कनेक्ट करून विविध ॲप्स डाउनलोड करता येतात. मात्र कधीकधी स्मार्ट टीव्हीला कनेक्ट केलेलं वायफाय डिसकनेक्ट होतात आणि ते पुन्हा कनेक्ट करताना बऱ्याच अडचणी येतात. अनेकदा हार्डवेअरशी संबंधित समस्येमुळे काही समस्या उद्भवू शकतात. वायफाय अन्य डिव्हाइसशी कनेक्ट करून बघा. अन्य डिव्हाइसशी राउटर कनेक्ट झाल्यास तुम्ही राउटर टीव्हीशी पुन्हा जोडून घ्या. स्मार्ट टीव्हीमध्ये इंटरनेट कनेक्शन तपासण्यासोबतच त्यातील समस्यांचं निराकरण करण्याचा म्हणजेच ट्रबलशूटचा पर्यायही मिळतो. यासाठी टीव्हीच्या सेटिंग्जमध्ये जाऊन नेटवर्क सेटिंग्जचा पर्याय निवडा. इथे नेटवर्क स्टेटस दिसेल. तुम्ही टीव्ही रिबूट करण्याचा पर्याय निवडू शकता. कोणताही उपाय कामी न आल्यास फॅक्टरी रिसेट हा अंतिम पर्याय निवडून बघा.



## स्मार्ट टिप्स

### फोन चार्ज करताय?

स्मार्टफोनची बॅटरी लो होऊ लागल्यानंतर आपल्या हृदयाची धडधड वाढू लागते. मग मिळेल त्या ठिकाणी स्मार्टफोन चार्जिंगला लावला जातो पण सार्वजनिक ठिकाणी स्मार्टफोन चार्ज करणं धोक्याचं ठरू शकतं. तुमच्या फोनमधला सगळा डाटा हॅक होऊ शकतो. ऑथेंटिक ८ नावाच्या सिक्युरिटी फर्मने हा दावा केला आहे. सार्वजनिक ठिकाणचं चार्जिंग सॉकेट हॅक केलेलं असू शकतं. अशा सॉकेटमुळे तुमच्या स्मार्टफोनचा सगळा डाटा लीक होऊ शकतो. तुमचे मेल्स, मेसेजेस, अकाउंट नंबर सगळं हॅकर्सपर्यंत पोहचू शकतं. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी फोन चार्जिंगला लावण्यासाठी दहा वेळा विचार करा.



## सोशल मिडिया

### धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

ऑनलाईन शॉपिंग ही आता सर्वसामान्य बाब बनली आहे. विविध साईट्वरून ऑनलाईन खरेदी केली जाते. मात्र अशा पद्धतीने खरेदी करताना फसवणूक होण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं. सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. या माध्यमातून आपल्या बँक खात्याचा ॲक्सेस त्यांना मिळू शकतो. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्स ॲप मेमरी खातंय?

व्हॉट्स ॲपमुळे तुम्हाला स्टोरेजची समस्या भेडसावतेय का? व्हॉट्स ॲपवर येणारे व्हिडिओ तसंच फोटोज गॅलरीत सेव्ह होत असल्यामुळे फोन मेमरी फुल होते. यामुळे फोन स्लो होतो. हे ओव्हरलोडिंग तुम्ही टाळू शकता. यासाठी व्हॉट्स ॲपच्या फाईल्स मोबाईलमधली किती जागा व्यापत आहेत हे आधी जाणून घ्या. यासाठी व्हॉट्स ॲपच्या सेटिंग्जमध्ये जा. स्टोरेज अँड डाटा ऑप्शनवर क्लिक करा. इथे मॅनेज स्टोरेज पर्यायावर क्लिक करून फोन मेमरीची माहिती मिळवता येईल. व्हॉट्स ॲप मीडिया डिलिट करण्यासाठी मॅनेज स्टोरेजवर लार्जर दॅन ५ एमबीवर क्लिक करा. इथून नको असणाऱ्या मीडिया फाईल्स सिलेक्ट करून डिलिट करता येतील. यासोबतच ऑल फाईल डिलिटचा पर्यायही आहे.






■ **नागपूर :** येथे सोमवारपासून सुरू झालेल्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विरोधकांनी परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरण आणि मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडावरून महायुती सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला. ईव्हीएममुळे हे महायुतीचे सरकार अस्तित्वात आल्याचा आरोप करीत विरोधकांनी सभागृहाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले.

# राज्यात राज्य कुणाचे? कायद्याचे की गुन्हेगारांचे?





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडाचे सोमवारी विधिमंडळाच्या वरच्या सभागृहात म्हणजे विधानपरिषदेत तीव्र पडसाद उमटले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी हा मुद्दा उपस्थित करत राज्यात कायद्याचे राज्य आहे की गुन्हेगारांचे? असा संतप्त सवाल उपस्थित केला. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणातील आरोपींचा आर्टीफिशिअल इंटेलिजन्सच्या माध्यमातून शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल असे स्पष्ट केले.

सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात होताच अंबादास दानवे यांनी संतोष देशमुख हत्याकांडाचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, मी नियम 289 च्या मार्फत एक विषय मांडत आहे. बीडमध्ये मागील आठवड्यात 9 डिसेंबर रोजी एक घटना घडली. केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचा निर्घृण खून करण्यात आला. या घटनेची पार्श्वभूमी पाहिली तर तिथे एक खासगी कंपनी कार्यरत आहे. या कंपनीत 6 डिसेंबर रोजी काही लोक घुसले. त्यांनी तेथील वॉचमनला मारहाण केली. त्यानंतर त्या वॉचमनने‍ती कंपनी ज्या गावच्या हद्दीत येथे त्या गावातील सरपंचाला फोन करून बोलावले. त्यानंतर गावकरी व सदर हल्लेखोरांत बाचाबाची झाली. त्यात कंपनीच्या लोकांना मारहाण करण्यात आली.

त्यानंतर आरोपींवर गुन्हा दाखल झाला. पण लगेच आरोपींना जामीन मंजूर झाला. जामीन मिळाल्यानंतर पोलिसांनी आरोपींसोबतच बसून चहापाणी व पार्टी केली. त्याचे अनेक फोटो व्हायरल झालेत. त्यानंतर 2-3 दिवसांनी म्हणजे 9 डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली. एका टोलनाक्यावर अडवून त्यांचे अपहरण करण्यात आले. त्यांच्या एका सहका?याने त्याची कल्पना देशमुख यांच्या भावाला दिली. त्यानंतर त्यांचा भाऊ पोलिस ठाण्यात गेला. पोलिसांना तक्रार दाखल करण्याची विनंती केली. पण पोलिसांनी या प्रकरणी अक्षम्य चालढकल केली. त्यानंतर 3 तासांनी या देशमुख यांची हत्या झाल्याची माहिती मिळाली आणि अखेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

दानवे पुढे म्हणाले, संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. त्याचे फोटो पाहिले तर कुणाचेही मन हेलावून जाईल. या प्रकरणात एकूण 6 आरोपी आहेत. त्यातील 1 जण सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाशी संबंधित आहे. आतापर्यंत 3 आरोपींना अटक करण्यात आली, तर 3 जण अद्याप फरार आहेत. त्यानंतर आरोपींनी पोलिस ठाण्यापुढेच 'बाप तो बाप रहेगा' अशा आशयाचे पोस्टर लावले. माझी सरकारला विनंती आहे की, गुन्हेगार खून करून 'बाप तो बाप रहेगा' असे पोस्टर लावत असतील तर राज्यात कायद्याचा वचक कुठे आहे?

महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे गुन्हेगारांचे?

पोलिसांनी प्रस्तुत प्रकरणातील उर्वरित 3 आरोपींना तत्काळ अटक करावी. त्यांचे सीडीआर रेकॉर्ड तपासावेत. त्यांना कुणी फोन केला? हे तपासावे. या प्रकरणातील वाल्मिक कराड नामक एका आरोपीचा बीड जिल्ह्यातील एका मंत्र्याशी थेट संबंध आहे. त्यांनी या आरोपींना फोन केले. पोलिस स्टेशनला फोन केले, असा आरोप त्या भागातील जनतेने केला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सर्वांवर कारवाई केली पाहिजे. पोलिस अशा पद्धतीने आरोपींना मदत करत असतील तर महाराष्ट्रात कायद्याचे राज्य आहे गुन्हेगारांचे राज्य आहे? याचा खुलासा झाला पाहिजे, असे दानवे म्हणाले.

दुसरीकडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणावरील सरकारची बाजू स्पष्ट केली. ते म्हणाले, बीड जिल्ह्यातील घटना अतिशय गंभीर आहे. एका तरुण सरपंचाचा अतिशय निर्घृण पद्धतीने खून झाला. निश्चितच ही घटना सरकारने गांभिर्यानं घेतली आहे.

यासंदर्भात स्थानिक पीआयला सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. ठाणे अंमलदाराला निलंबित करण्यात आले आहे. 3 आरोपींना अटक करण्यात आली आहे. काही आरोपी अद्याप फरार असले तरी त्यांना शोधून काढून अटक केली जाईल. आरोपी कोणत्या पक्षाचा, जातीचा, धर्माचा आहे? अशा प्रकारचा विचार न करता, त्यांचा घटनेशी संबंध असेल तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. असेही फडणवीस यांनी सांगितले.

# भाजपने मागितली रामदास आठवलेंची माफी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :** महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा रविवारी विस्तार झाला. नागपूरच्या राजभवनमध्ये पार पडलेल्या या सोहळ्याचे महायुतीचा भाग असलेले रामदास आठवले यांना निमंत्रणच देण्यात आले नव्हते.

यावरून रामदास आठवले यांनी आपली नाराजी उघडपणे जाहीर केली होती. रामदास आठवलेंच्या नाराजीवरून भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांची माफी मागितली आहे. आमच्याकडून चूक झाल्याचे बावनकुळे म्हणाले.

नागपूर येथील राजभवनमध्ये मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला. महायुतीत सहभागी



असलेल्या रिपाइं आठवले गटाला निमंत्रण देण्याचे राहून गेले. त्यामुळे रामदास आठवले नाराज झाले होते. त्यांच्या नाराजीची भाजपने अखेर दखल घेतली आहे.

मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण न भेटल्यामुळे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी रामदास आठवले यांची माफी मागितली. मी रामदास आठवले यांची माफी मागतो. त्यांना गडबडीत मंत्रिमंडळ विस्ताराचे निमंत्रण वेळेत पोहचले नाही. आमच्याकडून चूक झाली आहे, असे म्हणत बावनकुळे यांनी आठवलेंची जाहीर माफी मागितली.

बावनकुळे यांनी यावेळी मंत्रिमंडळावरही भाष्य केले. मंत्रिमंडळात कोणाला घ्यायचे कोणाला नाही हा मुख्यमंत्र्यांचा निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले. भुजबळ यांना भविष्यात महायुती चांगले स्थान देईल, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. सुधीर मुनगंटीवार आणि इतरांची मंत्रीपदावरुन कोणतीही नाराजी नसल्याचे ते म्हणाले.

# ९ कोटींसाठी एका तरुणाचे अपहरण

## रवींद्र चव्हाण यांच्यावर पटोलेंचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :** अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजप आमदार रवींद्र चव्हाण यांच्यावर मोठा आरोप केला. रवींद्र चव्हाण यांनी एका तरुणाचे अपहरण करून त्याला त्यांच्या बंगल्यात डांबून ठेवले असल्याचे ते म्हणाले. चव्हाण यांच्या घरात त्या तरुणाला बेदम मारहाण देखील झाल्याचे त्यांनी सांगितले.

नाना पटोले यांनी केलेल्या आरोपानुसार, तरुणाने ९ कोटींची रक्कम गहाळ केली होती. त्याच्याकडून साडेचार कोटी रक्कम जप्त करण्यात आली, मात्र उर्वरित रक्कम न मिळाल्याने तरुणाला चव्हाण यांच्या बंगल्यात डांबून ठेवण्यात आले आहे. नाना पटोले यांना याबाबत अधिक माहिती विचारल्यावर त्यांनी माध्यमांना स्वतः चौकशी करण्याचे सांगितले.

सध्याचे सरकार हे जनतेचा मताचे नाही. जर हे सरकार जनतेच्या मताचे असते तर त्यांच्यामध्ये जनतेचा धाक असता. हा धाक नसल्याने परभणी हिंसासारखे प्रकार समोर येत आहेत. परभणीमध्ये संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आली. पोलिसांनी स्वतः तोडफोड केली आणि आंदोलकांवर आरोप केला. सामान्य माणसांवर कायदेशीर कारवाई लगेच होते, मात्र दोषी पोलीस अधिका?यांवर कारवाई का नाही, असा सवाल नाना पटोले यांनी विचारला. विधानसभेत याबाबत स्थगन प्रस्ताव दिल्यावर तो अध्यक्षांनी स्वीकारला नाही, अशी माहिती पटोले यांनी दिली.

# शिंदे गटात नाराजीचा भडका

### विजय शिवतारे संतापले

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :** मंत्रिमंडळ विस्तारानंतर आता महायुतीत नाराजीनाट्य पाहायला मिळत आहे.

मंत्रिपदासाठी इच्छूक असलेल्या अनेक आमदारांना मंत्रिमंडळ विस्तारात डावलण्यात आले आहे. त्यामुळे अनेकांची मंत्रिपदाची संधी हुकली आहे. त्यामुळे अनेकजण उघड नाराजी व्यक्त करत आहेत. त्यातच आता शिंदे गटाचे नेते विजय शिवतारे यांनी मंत्रीपद न मिळाल्याने संताप व्यक्त केला आहे. नुकतंच त्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना थेट वरिष्ठ नेतृत्वांवरच हल्ला केला.

माझ्यासाठी मंत्रिपद इतकं महत्त्वाचं नाही. मला लोकांनी निवडून दिलंय, मला त्यांच्यासाठी काम करायचं आहे. पण दुःख एवढंच आहे की महाराष्ट्र नेमका चाललाय कुठे? तुम्हाला विभागीय दिले जायचे. आपण कुठे तरी आता मागे चाललोय. आपण बिहारच्या मार्गानं चाललोय, असे विजय शिवतारे म्हणाले.

# वाल्मिक कराड मास्टरमाइंड

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :** बीड जिल्ह्यात माजलगाव येथील मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करत खून केल्याची घटना उघडकीस आली आणि महाराष्ट्रात एकच खळबळ उडाली. या घटनेवर संदीप क्षीरसागर यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीच आपली भूमिका मांडली आहे.



अतिशय दुर्दैवी घटना आमच्या बीड जिल्ह्यात घडली असल्याचे त्यांनी म्हंटले आहे. सर्व महाराष्ट्र या घटनेचा साक्षीदार आहे. अतिशय दहशतीचे वातावरण या गावात आहे. सर्वात महत्त्वाचा विषय जे काही गुन्हे दाखल झाले आहेत या संदर्भातली, यामधले काही गुन्हेगरांना तर अटकच झालेली नाही. ज्यांना अटक झाली ते काही प्रमुख गुन्हेगार नाहीत. यांचा मास्टरमाइंड वाल्मिक कराड आहे. आणि सगळ्यात प्रमुख त्याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. म्हणजे तपासची अशी दिशाभूल केली जात असल्याचे क्षीरसागर म्हणाले.

# किसान पुणे २०२४ प्रदर्शनात सोनालिकाचे ३ नवीन ट्रॅक्टर्स लाँच

**लोकार्थ**




भारतातील पहिल्या १ क्रमांकाचा ट्रॅक्टर निर्यात ब्रँड सोनालिका ट्रॅक्टर्सने महाराष्ट्रातील पुणे येथील किसान कृषी प्रदर्शन २०२४ मध्ये उपस्थिती दाखवली आहे, जेथे कंपनीने महाराष्ट्रावतील शेतकऱ्यांसाठी सानुकूल केलेले सर्वात नाविन्यलपूर्ण आणि हेवी ड्युटी ट्रॅक्टर्स दाखवले आहेत. कंपनीने ३ नवीन हेवी ड्युटी ट्रॅक्टलर्स सादर केले आहेत - सोनालिका टायगर डीआय २६, सोनालिका चीता डीआय ३२ आणि सोनालिका टायगर डीआय ६५ सीआरडीएस ४ डब्यूटाय डी, जे महाराष्ट्रातील खडतर जमिनीमध्येय अपवदात्मनक कार्यक्षमता देण्यारसाठी सानुकूल करण्यात आले आहेत.

या भव्य लाँचला पूरक सोनालिकाने प्रभावी लाइन-अपमधील ५ आणखी नाविन्ययपूर्ण ट्रॅक्टर्सना देखील दाखवले आहे, जसे सोनालिका चीता एनटी ३०४ डब्यूप्र डी, अपग्रेडेड सोनालिका सिकंदर डीआय ७५० ३ डीएलएक्सव ४ डब्यू०२ डी, सोनालिका टायगर डीआय ३० ४डब्यू डी, सोनालिका सिकंदर डीआय ६० डीएलएक्सर ४ डब्यूएल डी आणि सोनालिका सिकंदर डीआय ६० डीएलएक्स३ टॉर्क प्लिस ४ डब्युडी डी, तसेच महाराष्ट्र स्पेडशल मॉडेल सोनालिका सिकंदर डीआय ७४५ ३ डीएलएक्सू ४ डब्यूएल डी. या इव्हेंडण्ट्चे खास आकर्षण ठरले सोनालिका चीता डीआय ३२ चे लाँच, ज्या मध्ये हेवी ड्युटी ३ सिलिंडर २,७८० सीसी इंजिन, ८ एफ+२आर ट्रान्सकमिशन, उच्चस दर्जाचे ऑईल इमर्स डिस्के ब्रेक आणि पॉवर स्टिअरिंग, जे विविध कृषी कामासाठी प्रबळ कार्यक्षमता देतात. ■ ■

# ग्रँड स्लॅम विजेता आंद्रे आगासीच्या उपस्थितीत PWR DUPR इंडिया लीगची सुरूवात




पिकलबॉलसाठी मोठी प्रोत्साहनाची बातमी म्हणजे, टेनिस खेळातील दिग्गज आंद्रे आगासी यांनी मुंबईत झालेल्या भव्य कार्यक्रमात ढहफ उव्रढफइंडिया लीगची सुरूवात केली.

क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी या लीगच्या सुरुवातीसाठी केलेल्या पुढाकाराचे कौतुक केले आणि टाइम्स ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक विनीत जैन यांना या नव्या खेळाच्या प्रसारासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी शुभेच्छा दिल्या. आगासी जे आठ वेळा ग्रँड स्लॅम विजेता आहेत त्यांनी पिकलबॉलमध्ये त्यांचा प्रवास आणि या खेळाची लोकप्रियता वाढत असल्याची कारणे सांगितली.

पत्रकार परिषदेनंतर, आगासी यांनी भारतीय टेनिस चॅम्पियन रोहन बोपन्नाशी एक मित्रत्वपूर्ण सामना खेळला. या दोन टेनिस दिग्गजांनी पिकलबॉलमध्ये आपली क्षमता दाखवली आणि प्रेक्षकांनी त्यांच्या प्रत्येक क्षणाचा चांगला आनंद घेतला. PWR हा टाइम्स ग्रुप आणि पिकलबॉल लीग आशिया यांच्यातील सहयोगात्मक उपक्रम आहे. ■ ■

# पैसालो डिजिटल बोर्डाची व्यावसायिक कागदपत्रे जारी करून निधी उभारणीस मान्यता

**PAISALO**
**EASY LOAN आसान लोन**

पैसालो डिजिटल लिमिटेड कंपनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडे नोंदणीकृत NBFC नॉन-डिपॉझिट घेणारी एक कंपनी असून, तिच्या बोर्डाने प्रत्येकाचे दर्शनी मूल्य असलेले कमर्शियल पेपर्स जारी करण्यास मान्यता दिली आहे. 5,00,000 रुपए एक किंवा अधिक टप्प्यात एकूण रु.90 कोटी खाजगी प्लेसमेंट आधारावर ही मान्यता आहे. बोर्डाने 600 रु.च्या दर्शनी मूल्याच्या लिस्टेड कमर्शियल पेपर्स चे वाटप करण्यास मान्यता दिली. एकूण रुपए 5,00,000 प्रत्येकी स्टेट बँक ऑफ इंडियाला खाजगी प्लेसमेंटद्वारे 30 कोटी मिळणार आहेत.

इक्विटी शेअर्स आणि/किंवा परिवर्तनीय वॉरंट्स आणि/किंवा कंपनीच्या इतर सिक्युरिटीज इश्यू करून निधी उभारण्याच्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी आणि प्रायव्हेट प्लेसमेंटच्या आधारावर प्राधान्य इश्यूद्वारे बोर्डाची 23 डिसेंबर 2024 रोजी बैठक होईल, आवश्यकतेनुसार मंजुरीच्या अधीन या बैठकीत विचार होईल. अलीकडे, कंपनीने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने निर्धारित केलेल्या लागू ECB मार्गदर्शक तत्त्वांनुसार सुरक्षित विदेशी चलन परिवर्तनीय रोखे जारी करण्यासाठी वर D$ 50 दशलक्षचा पहिला टप्पा यशस्वीरित्या उभारला आहे. पैसलो डिजिटल लिमिटेडने आपले पहिले विदेशी चलन परिवर्तनीय बॉंड्स यशस्वीरित्या जारी केले आहेत, जे कंपनीसाठी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून चिन्हांकित आहेत.

ब्लू क्लाउड सोफ्टेक एक नाविन्यपूर्ण AIoT सोल्यूशन्स प्रदाता आणि विविध क्षेत्रातील अक-प्रेरित सोल्यूशन्समध्ये तज्ञ असलेली एक आघाडीची कंपनी, तिने जाहीर केले की तिने ब्लूपोर्ट - मोबाइल डिव्हाइस सोल्यूशन्स (मोबाईल डिव्हाइस सोल्यूशन्स) वितरीत करण्यासाठी भागीदारी केली आहे.

या प्लॅटफॉर्म साठी नुकतीच करारावर स्वाक्षरी केली आहे, जी विशेषतः बायोमेडिकल उपकरणांचे व्यवस्थापन अनुकूल करण्यासाठी डिझाइन केलेली आहे.

ब्लू पोर्ट हे एक अत्याधुनिक प्लॅटफॉर्म आहे जे विशेषतः आरोग्य सेवा संस्थांसाठी डिझाइन केलेले आहे. हे आरोग्य सेवा संस्थांना मजबूत सुरक्षा सुनिश्चित करणाऱ्या प्रगत तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन त्यांचे बायोमेडिकल उपकरण व्यवस्थापन सुधारण्यास सक्षम करते. यात मजबूत एनक्रिप्शन, रिमोट व्यवस्थापन क्षमता आणि तपशीलवार प्रवेश नियंत्रणे समाविष्ट आहेत. याव्यतिरिक्त, उपाय HIPAA अनुपालनासह कठोर नियामक आवश्यकता पूर्ण करतात.

आम्ही वैद्यकीय उपकरणांसाठी सुरक्षित ऑपरेटिंग सिस्टम डेव्हलपमेंटसह एम डी एम ऑर्डर प्राप्त करण्यास उत्सुक आहोत आणि आरोग्य सेवा क्षेत्रात आमचे नाविन्यपूर्ण उपाय आणण्यासाठी उत्सुक आहोत, ब्लू क्लाउड सोफ्तेकच्या श्रीमती जानकी यारलागड्डा यांनी सांगितले. ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre@rediffmail.com

# मलकापूर पांग्रा कडकडीत बंद

■ **महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. १६ :** परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली. पोलिसांच्या कोठडीत असलेल्या कार्यकर्त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेचे पडसाद राज्यात उमटत आहे.

सिंदखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांग्रा येथे आज सोमवारी, १६ डिसेंबर रोजी कडकडीत बंद पाळण्यात आला. परभणी येथील घटनेचे पडसाद ठिकठिकाणी उमटत असल्याचे पाहण्यास मिळत आहेत. महाराष्ट्र बंदचे आवाहन केल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी या बंदला प्रतिसाद मिळत आहे. या घटनेच्या निषेधार्थ मलकापूर पांगरा येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. यामुळे गावातील दैनंदिन व्यवहार विस्कळीत झाले.

सर्व जाती धर्माच्या लहान मोठ्या दुकानदार, व्यावसायिक, किरकोळ विक्रेते यांनी बंदच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन आपापली



दुकाने बंद ठेवली. यावेळी बसस्थानक परिसरात असलेली सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली होती. या घटनेची सखोल चौकशी करून दोषीवर कडक कार्यवाही करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

बंद यशस्वी करण्यासाठी मलकापूर पांगरा ग्रामपंचायतचे सदस्य राजू साळवे, कैलास साळवे, दिलीप काकडे, बाळू पवार, रामेश्वर सोनकांबळे, गजानन चरवे, किशोर साळवे, अक्षय मगर, आदींनी पुढाकार घेतला.

नागपूर
महासागर वृत्तसागर
▪ मंगळवार, दि. १७, डिसेंबर २०२४ ▪

# शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती बरोबर स्वयंशिस्त हा यशाचा मूलमंत्र : सी.पी.राधाकृष्णन

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११२ वा दीक्षांत समारंभ संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर, दि. 16 : जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर स्वयंशिस्त असणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती बरोबर यशस्वीतेसाठी स्वयंशिस्त यशाचा मूलमंत्र असल्याचे प्रतिपादन राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११२ वा दीक्षांत समारंभ आज ऑडिटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्विस कॉलेज येथे आयोजित करण्यात आला, यावेळी ते बोलत होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ११२ व्या दीक्षान्त समारंभात सहभागी होणे अत्यंत आनंदाची आणि गौरवास्पद असल्याचे सांगत सर्व पदवीधर, पदक विजेते आणि पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. विद्यापीठाने नुकतीच आपली शतकपूर्ती साजरी केली असून राष्ट्रनिर्माण कार्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्याचप्रमाणे शतकभरात अनेक प्रख्यात माजी




विद्यार्थी घडविले असल्याचे राज्यपाल म्हणाले.

एनएमडी महाविद्यालय गोंदिया येथील विद्यार्थिनी प्रगती रमेश छतवानी यांना ६ सूवर्ण पदके, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थिनी रूपाली केवलराम देशपांडे यांना ४ सूवर्ण पदके व १ पारितोषिक, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थी नूतन पांडुरंग इंगोले यांना ४ सुवर्णपदके व १ पारितोषिक तसेच डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थी अजय सुखदेव नरांजे यांनी एमए (डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा) परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ४ सुवर्णपदके व १ पारितोषिक, विद्यापीठ जनसंवाद विभागातील तेजस अतुल पाटील याने ३ सुवर्णपदक व एक पारितोषिक, विद्यापीठ पदव्युत्तर गृहविज्ञान विभागातील दिव्या अनिल पैतोड हिला ४ सुवर्ण पदके देऊन गौरविण्यात आले.

श्री बिंजानी सिटी कॉलेज नागपूर येथील केदार विश्वनाथ खोब्रागडे ४ सुवर्णपदक तर विद्यापीठाची वयाच्या ६५ व्या वर्षानंतर आचार्य पदवी संपादन केल्याबद्दल योगतज्ञ डॉ. विठ्ठलराव जिपकाटे पारितोषिक रामदास शरचंद्र बुचे यांना प्रदान करण्यात आले.

# नायलॉन मांजासह चौघांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १६ :

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा शाखा (एसएसबी) आणि पाचपावली पोलिसांनी वेगवेगळ्या कारवाईमध्ये नायलॉन मांजासह चार जणांना अटक केली. विशाल सतीश नागपाल (26) रा. कृष्णा अपार्टमेंट, डिप्टी सिग्नल, सुशील मधू रहांगडाले (27) रा. हिमाचल कॉलनी, कापसी, सूरज दिवाकर मंडलिक (19) रा. लाडपुरा आणि यश विलास डोळसकर (20) मस्कासाथ अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पहिली कारवाई एसएसबीच्या पथकाने केली. व्हीसीए ग्राऊंडकडे जाणाऱ्या मार्गावर विशाल आणि सुशील हे एमएच-49/एएक्स-4756 क्रमांकाच्या दुचाकी वाहनावर पोते ठेवून जाताना दिसले. संशयाच्या आधारावर पोलिसांनी त्यांना थांबवून पोते तपासले असता प्रतिबंधित नायलॉन मांजाच्या 55 चकऱ्या मिळाल्या.

# राम हे पृथ्वीला पडलेले सर्वात मनोहरी स्वप्न : डॉ. कुमार विश्वास

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

ईश्वर जेव्हा सनातन धर्म व सत्याच्या प्रतिष्ठापनेसाठी ज्या अवतरणीकेच्या सहाय्याने पृथ्वीवर अवतरतो ती शिडी म्हणजे रामाचा अवतार आहे, अशी ताकद असणारा राम म्हणजे प्रत्येक भारतीयाच्या डोळ्यासमोरील पडलेले मोठे व मनोहारी स्वप्न आहे असा हा राम मार्ग आहे, सृष्टी आहे, दृष्टी आहे तसेच एकांत व मैफिल आहे.असे प्रतिपादन कुमार विश्वास यांनी अपने अपने नाम या राम कथेच्या तिसऱ्या पुष्पात केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या व कलागुणांचा संगम असलेल्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या आज, चवथ्या दिवशी 'अपने अपने राम' अंतर्गत विवेचनपूर्व प्रवचन देताना ते बोलत होते. हनुमाननगरातील क्रीडा चौक येथील ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणात हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संस्कार भारतीच्या प्रमुख कांचन गडकरी, आ. मंजुळा गावित, आ. अमित गोरखे, हितवादचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र पुरोहित, पतंजलीचे प्रमुख यशपाल आर्य, उद्योगपती पदमेश गुप्ता आणि संजय गुप्ता आदी मान्यवरांच्या हस्ते प्रभू रामचंद्राची पूजा, पुष्पार्चन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. कुमार विश्वास पुढे म्हणाले की, पर्यटकांना प्रेमाचे प्रतीक दाखविताना ताजमहाल एवजी रामसेतू दाखवावा किंवा बिहार येथे पहाडावर वृक्ष लावून मार्ग तयार करणारा मांझी दाखवावा.

त्यांनी राम जटायू यांच्यातील भावनिक संवादाला वर्तमान स्थितिशी जोडत मार्मिक उद्बोधन केले. वनवास दिला म्हणून द्वेष न करता, भरतासारखा भाऊ दिला म्हणून रामाने सदैव कैकयी मातेचे प्रेमाने आभार मानले. स्वधमार्ची सापेक्ष व्याख्या म्हणजेच रामराज्य होय, असे कुमार विश्वास म्हणाले. प्रारंभी डॉ. कुमार विश्वास यांच्या चमुतील विरेन, नीरजा उपरेती, प्रियांश शहा यांनी सुमधुर भजन व रामधून सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेणुका देशकर, कविता तिवारी, ऋचा सुगंध यांनी केले. खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, उपाध्यक्ष डॉ. गौरीशंकर पाराशर, अशोक मानकर, दिलीप जाधव, सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, सदस्य बाळासाहेब कुलकर्णी, हाजी अब्दुल कदीर, सारंग गडकरी, अविनाश घुशे, डॉ. दीपक खिरवडकर, संदीप गवई, संजय गुळकरी, रेणुका देशकर, गुड्डू त्रिवेदी, किशोर पाटील, विजय फडणवीस, महेंद्र राऊत, दिलीप गौर, शैलेश ढोबळे यांचे महोत्सवाच्या सफलतेसाठी सहकार्य लाभत आहे.

### सांस्कृतिक वातावरण फुलवणारा महोत्सव देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री पदभार स्वीकारल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांचा पहिला जाहीर सत्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या मंचांवर झाला. सत्काराला उत्तर देताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या व्यासपीठाने कलावंत व विचारवंतांची ओळख दिली आहे. मोठमोठ्या कलाकारांना प्रत्यक्ष अनुभवायला मिळणे हे या महोत्सवाचे आकर्षण आहे. उदयोन्मुख कलाकारांनाही अभिव्यक्तीसाठी या मंचाने मोठा हात दिला आहे. सांस्कृतिक वातावरण फुलवणारा हा महोत्सव आता शहराचे अविभाज्य अंग झाला आहे.

### अमिताभ बच्चन यांना यायची इच्छा : नितीन गडकरी

मनोरंजन, लोकप्रबोधन, लोकसंस्कार, सांस्कृतिक अभिरुची वाढवणे व कलासक्त संस्कारक्षम मन तयार करणे हा या महोत्सवाचा उद्देश आहे. महानायक अमिताभ बच्चन यांनाही या महोत्सवात सहभागी होण्याची इच्छा असल्याचे , केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी याप्रसंगी सांगितले. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या चवथ्या दिवशी, प्रथम सत्रात नागपूरचे युवा कलाकार असलेल्या 'सफर' बँड तर्फे शास्त्रीय आणि सुफी गीतांचा नजराणा पेश करण्यात आला. 'सफर' अंतर्गत आयुष मानकर व चमुतर्फे सरस गीते सादर करण्यात आली. या युवा कलाकारांच्या कलाविष्काराने रसिक मंत्रमुग्ध झाले. याप्रसंगी खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयुष मानकर, वंश गोरटकर, सुशांत पाटील, आकाश, आदित्य, सौरभ आणि अबीर या गायक, वादकांचा सन्मान करण्यात आला.



# नागपूर फिल्म फेस्टिवल चलचित्राचे अनावरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ आणि नागपूर चलचित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ जानेवारी २०२५ रोजी नागपूर फिल्म फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या फिल्म फेस्टिवलचे नागपुरात प्रथमच आयोजन होत असून विद्यापीठात फेस्टिवलच्या चलचित्राचे अनावरण शनिवार, दिनांक १४ डिसेंबर २०२४ रोजी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभा कक्षात आयोजित कार्यक्रमाला कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, कपिल शर्मा शोचे लेखक एकाग्र शर्मा, कुलगुरु डॉ. राजेंद्र काकडे, गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, अधिसभा सदस्य डॉ. किशोर इंगळे, विद्यापीठ ज्ञान स्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. स्वामी विवेकानंद यांचा जन्मदिवस असलेल्या १२ जानेवारी रोजी या कार्यक्रमाचे आयोजन विद्यापीठ परिसरात होत आहे. या फिल्म फेस्टिवलमध्ये लघु फिल्म, डॉक्युमेंट्री, लहान मुलांकरिता, व्यावसायिक, कॅम्पस, रील, वर्टीकल, ॲनिमेशन आदी विविध श्रेणींमध्ये चित्रपट तयार करता येणार आहे.

याकरिता महिला सशक्तिकरण, रोजगार सृजन, सामाजिक समरसता, पर्यावरण, भविष्यातील भारत, जनजातीय समाज, ग्रामीण विकास, लोक संस्कृती, जलवायू परिवर्तन, शौर्याच्या कथा, नैतिक कथा, नागरिकांची जबाबदारी, भारतीय कुटुंब प्रणाली, वोकल फॉर लोकल, विकसित भारत, भारतीय ज्ञान परंपरा, विज्ञान आणि तंत्रज्ञान असे अनेक अन्य विषय या फेस्टिवलसाठी राहणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २ लाखांपर्यंत नगद पुरस्कार दिले जाणार आहे.

स्पर्धेत व्यावसायिक गटात ५०० रुपये, विद्यार्थ्यांसाठी २०० रुपये शुल्क राहणार आहे. चित्रपट पाठविण्याची अंतिम तारीख ३० डिसेंबर २०२४ ही आहे. सभा कक्षात पार पडलेल्या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना माननीय कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी अशा प्रकारचे फेस्टिवल नागपुरात प्रथमच होत असल्याने आयोजकांचे अभिनंदन करीत त्यांना शुभेच्छा दिल्या.

मनात आलेल्या कल्पनांना मूर्त रूप आणण्याचे काम आपण करीत असून मस्तीष्कात आलेले विचार उभे करण्याचा प्रयत्न आपण करीत असल्याचे ते म्हणाले. नागपूरच्या इतिहासात या क्षणाची ऐतिहासिक नोंद होईल असे ते म्हणाले. कपिल शर्मा शो चे लेख एकाग्र शर्मा यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना या उपक्रमाचे कौतुक केले. चलचित्र फाउंडेशनच्या वतीने आयोजित फेस्टिवल प्रशंसनीय असून चांगल्या विषयाला जुळण्यासाठी आपण येथे आलो असल्याचे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी सिने क्षेत्रातील आलेले विविध अनुभव व्यक्त केले. महाराष्ट्र नसता तर देश नसता असे म्हणत या प्रकल्पाला यशस्वीता येईल, असे ते म्हणाले. विशेष म्हणजे, प्रसिद्ध सिने अभिनेता राजकुमार यांची आज १०० वी जयंती असल्याने चलचित्र अनावरण कार्यक्रम अवस्मरणीय ठरणार असल्याचे आयोजक जय गाला यांनी सांगितले. सभा कक्षात आयोजित कार्यक्रमाला जनसंवाद विभागाचे प्रभारी विभाग प्रमुख डॉ. प्रबास साहू, ललित कला व छंद मंदिर विभाग प्रमुख डॉ. संयुक्ता थोरात, आयोजन समितीचे सदस्य सर्वश्री अजय राजकारणे, महेंद्र पेंढारकर, विनय चहांदे, प्रवीण साहनी, सई देशपांडे, आस्था माने, जय गाला, ध्रुपद गाडे, हर्ष घरकाटे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

## नितलने खाऊच्या पैशातुन वाटले शालेय साहित्य



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

येरला येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना नीरीचे राजेश सांगोडे यांनी त्यांची मुलगी नितल सांगोडे हिने जमा केलेल्या खाऊच्या पैशातुन तिच्या वाढदिवसा निमित्त शालेय साहित्याचे वाटप केले. तसेच शाळेला संगणक सुद्धा भेट दिला. नितलचा हा उपक्रम दरवर्षीच असतो. उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी नितलला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

संचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका कल्पना मांडवकर यांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका जयमाला सोमकुवर, शिक्षिका आरती बारापात्रे, शिक्षक दिवाकर गणवीर उपस्थित होते.

## गोविंदराव वंजारी अभियांत्रिक विभागाची औद्योगिक भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

गोविंदराव वंजारी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील माहिती तंत्रज्ञान विभागाने नुकतीच सॉफ्ट पॉलिनोमियल (आय)प्रायव्हेट लिमिटेड, माटे स्क्वेअर, नागपूर येथे औद्योगिक भेटीचे आयोजन केले होते. या भेटीसाठी बी. टेक माहिती तंत्रज्ञानाचे विद्यार्थी उपस्थित होते. जीडब्ल्यूसीईटीचे प्राचार्य डॉ. सलीम चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ही भेट घेण्यात आली. या भेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती आणि विविध आव्हानांना कौशल्याने कसे तोंड दिले जाते.

दीपक देशपांडे, सॉफ्ट पॉलिनोमियल्स (आय) प्रायव्हेट लिमिटेड मधील सीएचआरओ तसेच ग्रोथ ऑफिसर आणि अनुप पारधी, कोर्स समन्वयक यांनी सध्याच्या उद्योगातील ट्रेंड आणि मशीन लर्निंग, ड क्लाउड कॉम्प्युटिंग,ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी आणि सायबर सिक्युरिटी यांसारख्या उच्च मागणीच्या क्षेत्रांवर चर्चा केली. त्यांनी सॉफ्ट स्किल्सचे महत्त्व, विशेषतः परस्पर संवाद आणि इंग्रजी भाषेतील प्रवीणतेशी त्याचा संबंध यावर प्रकाश टाकला. ही भेट सर्व उपस्थितांसाठी अत्यंत माहितीपूर्ण आणि फायदेशीर ठरली. या सत्रात प्रा.प्रचिती आडघुळकर आणि प्रा.अबोली विरागडे यांच्यासह टी अँड पी समन्वयक प्रा. प्रवीण वाट उपस्थित होते.

# रामटेकला तब्बल ४४ वर्षांनी मिळाले मंत्रीपद

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १६ :

तब्बल ४४ वर्षांनंतर, आमदार ॲड. आशिष जयस्वाल यांनी रविवारी महायुती सरकारमध्ये राज्यमंत्री म्हणून शपथ घेतल्याने रामटेक विधानसभा मतदारसंघाचा राजकीय वनवास संपला आहे.



जयस्वाल यांनी १९९५ मध्ये त्यांच्या राजकीय कारकिदीर्ला सुरुवात केली आणि ते काँग्रेसशी संबंध असलेल्या कुटुंबातून राजकारणात आले. त्यांचे दिवंगत वडील नंदकिशोर जयस्वाल हे कचूरवाही येथील जिल्हा परिषद सदस्य होते.आ.आशीष जयस्वाल यांनी आपल्या कुटुंबाचा वारसा पुढे चालू ठेवला.सन १९९५ मध्ये त्यांनी शिवसेनेच्या तिकिटावर पहिल्यांदा जिल्हा परिषदेची जागा जिंकली.

१९९७ मध्ये त्यांनी रामटेक विधानसभेची निवडणूक लढवली आणि पराजित झाले. मात्र, त्यांनी १९९९, २००४ आणि २००९ मध्ये शिवसेनेचे उमेदवार म्हणून निवडणूक जिंकली. २०१४ मध्ये भाजप-शिवसेना युती तुटल्यानंतर त्यांचा भाजपच्या डी. मल्लिकार्जुन रेड्डी यांच्याकडून पराभव झाला. २०१९ मध्ये जयस्वाल यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि रेड्डी यांचा पराभव केला. यंदा त्यांनी महायुती आघाडीच्या तिकिटावर निवडणूक लढवली आणि अपक्ष उमेदवार राजेंद्र मुळक यांचा पराभव केला.

जयस्वाल यांचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी जवळचे संबंध असल्याने त्यांना मंत्रीपद मिळण्यास मदत झाली. रामटेक मतदारसंघाला ४४ वर्षांपासून मंत्री पद मिळाले नाही. मधुकरराव किंम्मतकर (मामाजी) १९८० मध्ये काँग्रेस सरकारमध्ये शेवटचे मंत्री होते.

जयस्वाल यांच्या नियुक्तीनंतर शिवसेनेच्या शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी रामटेक आणि आसपासच्या गावांमध्ये मिठाई आणि फटाके फोडून आनंदोत्सव साजरा केला.

# एचआरएमएस/यूएमआयडी व वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत वर्षातील 37 वे एचआरएमएस/यूएमआयडी आणि वैद्यकीय तपासणी शिबिर कलमेश्वर स्थानकावर यशस्वीरित्या आयोजित केले.



हे आयोजन नागपूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. मनीष अग्रवाल यांच्या नेतृत्वाखाली पार पडले, ज्यामध्ये सीटीटीआय, सहाय्यक, ट्रॅक मेंटेनर, तंत्रज्ञ, स्थानक प्रमुख आणि विभागीय अभियंते यांच्यासह कलमेश्वर व आसपासच्या स्थानकांतील रेल्वे कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

या शिबिराद्वारे कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले, ज्यामध्ये मुख्यतः एचआरएमएस व यूएमआयडी प्रणालीच्या माध्यमातून सेवा-संबंधित तपशील व कुटुंबीयांची माहिती अद्ययावत करण्यावर भर देण्यात आला. अनेक समस्या जागेवरच सोडवण्यात आल्या, ज्यामुळे विभागाची वेळेवर व प्रभावी सेवा देण्याची वचनबद्धता अधोरेखित होते. सोडवता न आलेल्या तक्रारींची नोंद करून त्यावर पुढील उपाययोजना केल्या जाणार आहेत.

या उपक्रमात निवारक आरोग्य सेवेवर ही भर देण्यात आला. रक्त तपासणी, रक्तदाब मोजणी आणि नेत्रतपासणी यांसारख्या तपासण्या वैद्यकीय पथकाने पार पाडल्या, जेणेकरून संभाव्य आरोग्य समस्या ओळखता येतील व वेळेत मदत उपलब्ध होईल. नागपूर विभागाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक श्री. जी.एस. मंजुनाथ आणि वरिष्ठ विभागीय कार्मिक अधिकारी सौ. संझी जैन यांच्या मार्गदर्शनाखाली या आरोग्यसेवा पुरविण्यात आल्या.

हे शिबिर नागपूर विभागाने आयोजित केलेल्या एचआरएमएस/यूएमआयडी व वैद्यकीय तपासणी शिबिरांच्या मालिकेचा एक भाग आहे, ज्यामध्ये ग्रामीण व शहरी भागातील कर्मचाऱ्यांना महत्त्वाची प्रशासकीय व वैद्यकीय मदत उपलब्ध होत आहे. पुढील शिबिर 20 डिसेंबर 2024 रोजी भंडक रेल्वे स्थानकावर आयोजित होणार आहे.

या उपक्रमांद्वारे मध्य रेल्वेचा नागपूर विभाग कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे आणि अधिक आरोग्यपूर्ण, प्रतिबद्ध आणि कार्यक्षम कर्मचारी वर्ग घडवत आहे. तक्रारींचे निवारण व निवारक आरोग्य सेवा यावर भर देऊन विभाग कर्मचारी-केंद्रित उपक्रमांसाठी नवा आदर्श निर्माण करत आहे.

## डीपीएस मिहान येथे वार्षिकोत्सव उत्साहात साजरा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

दिल्ली पब्लिक स्कूल (डीपीएस), मिहान येथे शाळेच्या भव्य प्रांगणात वार्षिक सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम 'गेमचेंजर-ए लीप टूर्डस ट्रान्स्फॉर्मेशन' या थीमवर होता. इयत्ता तिसरी ते अकरावीपर्यंतच्या हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी संगीत, चमकदार नृत्य, अभिनय आणि नाट्य सादरीकरणाद्वारे उत्सव साजरा केला.

प्रमुख अतिथी म्हणून नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी होत्या. सन्माननीय अतिथी म्हणून आयआयएम नागपूरचे संचालक डॉ.भीमराया मैत्री, दिव्यांग क्रिकेटर गुरुदास राऊत उपस्थित होते.

यावेळी डीपीएस मिहान आणि कामठी रोड नागपूरच्या अध्यक्षा आणि प्रो-व्हाइस चेअरपर्सन तुलिका केडिया, डीपीएस मिहान आणि कामठी रोडच्या संचालिका सविता जयस्वाल, डीपीएस कामठी रोडच्या प्राचार्या योगिता उमाळकर आणि इंद्रजित परगनिहा यांच्यासह बहुसंख्य पालक उपस्थित होते. डीपीएस मिहानच्या प्राचार्या निधी यादव यांनी वार्षिक दिनाच्या कार्यक्रमात स्वागतपर भाषण केले.

## २.४८ लाखांच्या मालावर डल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

कुटुंब वाढदिवसाच्या कार्यक्रमासाठी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड आणि दागिन्यांवर डल्ला मारला. ही घटना वाठोडा पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी सचिन मोहन हुड (37) रा. महादेवनगर, तरोडी रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गुरूवारी सायंकाळी सचिन हे कुटुंबासह घराला कुलूप लावून पुतण्याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी शहरातून बाहेर गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप आणि कडीकोंडा तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटातून रोख 50 हजार आणि सोन्याचांदीचे दागिने असा एकूण 2 लाख 48 हजार रुपयांचा माल चोरून नेला. शुक्रवारी सचिन घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली.

# सेवानिवृत्त जि.प. शिक्षकांकडून गट विमा योजना मासिक वर्गणी वसूल करण्यात येवू नये : शरद भांडारकर

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १६ :

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागा अंतर्गत पदवीधर शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, उच्च श्रेणी मुख्याध्यापक व शिक्षक, कनिष्ठ व्याख्याता, माध्यमिक मुख्याध्यापक यांच्या वेतनातून तत्कालीन कार्यालय प्रमुखांनी शासन निर्णयानुसार ३० रुपये ऐवजी ६० रुपये तर २४० ऐवजी ४८० या सुधारित दराने कपात केली नसल्याचे कोषागार अधिकाऱ्यांनी आक्षेप नोंदविले.

अशा शिक्षकांकडून सुधारित गट विमा मासिक वर्गणी १२ टक्के चक्रवाढ व्याज दराने वसूल करण्याचे जिल्हा परिषदेला सूचित करून रक्कम परतीचे प्रस्ताव परत केल्याने खळबळ माजली.

महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेत्तर सेनेचे राज्य सरचिटणीस शरद भांडारकर यांनी सेवानिवृत्त शिक्षकांकडून रक्कम वसूल करण्यास सक्त विरोध केला आहे.

सदर प्रकरणीतील सर्व शिक्षक सन २०१८ ते २०२४ या वर्षात सेवा निवृत्त झाले असून त्यांना त्यांचे पगारातून गट विमा योजनेची कपात केलेली रक्कम परत करण्याबाबतचे प्रस्ताव जिप शिक्षण विभागाने कोषागार कार्यालयात सादर केल्यानंतर हा घोटाळा उघडकीस आला आहे.

या सर्व प्रकरणात सेवा निवृत्त शिक्षक जबाबदार नसून पगार पत्रक तयार करणारे व पगार पत्रक मंजूर करणारे जबाबदार असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. शिक्षक सेवेत असतांना त्यांचे पगारातून ज्या दराने गट विमा योजना मासिक वर्गणी वसूल केली आहे.

त्याच दराने जमा झालेली रक्कम सेवा निवृत्त शिक्षकांना परत करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेत्तर सेनेचे देवीदास काळाने, मनोज घोडके, जनार्दन सवाई, दिलीप शहारे, रमेश बिरणवार, प्रमोद हरणे, हरिश्चंद्र दहाघाणे, रामकृष्ण ढेंगे, उत्तम मनकवडे, वनमाला डोकरीमारे, सुधीर सोनटक्के, दिलीप शेंडे, दिनकर वानोडे आदींनी केली आहे.

# डॉ. मनोहर गोलाईत यांच्या संशोधन उत्कृष्टतेचा सन्मान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नुकत्याच साईखेड़ा येथील जी. एच. रायसोनी यूनिवर्सिटीच्या सहाव्या दीक्षांत समारंभात, श्री मनोहर भाऊरावजी गोलाईत यांना इलेक्ट्रॉनिक्स इंजीनियरिंग मध्ये पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. ही पदवी आय.आय.आर.एम., आनंदचे संचालक प्रोफेसर उमाकांत दाश यांच्या हस्ते आणि डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या उपस्थितीत देण्यात आली. गोलाईत यांचे संशोधन "विविध अनुप्रयोगांसाठी सूक्ष्म मायक्रोस्ट्रिप एंटीना डिझाइन आणि निर्मिती" या विषयावर केंद्रित होते. हे



संशोधन विद्यापीठाच्या इंजिनिअरिंग आणि तंत्रज्ञान शाळेत संपन्न झाले, ज्यामध्ये डॉ. महेंद्र गायकवाड (प्रोफेसर, जी.एच. रायसोनी यूनिवर्सिटी, साईखेड़ा) यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. लोकेश कुमार ब्रह्माणे (सह-मार्गदर्शक, सहाय्यक प्राध्यापक, राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, गोवा) यांच्या सह-मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या संशोधनामुळे दोन आंतरराष्ट्रीय जर्नल पेपर आणि दोन परिषद पेपर प्रकाशित करण्यात आले.

ही उपलब्धी श्री गोलाईत आणि त्यांच्या कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण आहे. ते या यशाचे श्रेय आपल्या वडिलांना, भाऊराव गोलाईत आणि आई, श्रीमती शशिकला गोलाईत यांना देतात. तसेच, ते कुलाधिपति सुनील रायसोनी, उप-कुलपति डॉ. मीना राजेश आणि कुलसचिव डॉ. श्रीराम जोशी यांचे आभार मानतात. ही उपलब्धी जी.एच. रायसोनी यूनिवर्सिटीच्या शैक्षणिक उत्कृष्टता आणि संशोधन गुणवत्ता दर्शवते

# दिल्ली पब्लिक स्कूल मिहान शाळेचा वार्षिक दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

१४ डिसेंबरला नागपूरच्या दिल्ली पब्लिक स्कूल, मिहान शाळेचा वार्षिक दिन सोहळा मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात साजरा झाला. हा कार्यक्रम गेम चेंजर- अ लीप टूज ट्रान्सफॉर्मेशन या थीमवर आधारित होता, ज्याने 2024 हे ऑलिम्पिक वर्ष मानून क्रिडा परिवर्तनाचे माध्यम म्हणून खेळाचे सुंदर प्रदर्शन केले. इयत्ता ३ ते ११ च्या १००० हून अधिक विद्यार्थ्यांनी संगीतात सहभाग घेतला. धमाकेदार नृत्य, अभिनय आणि नाट्यपूर्ण सादरीकरणाच्या उत्साहाने हा कार्यक्रम संपन्न झाला.



नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. प्रख्यात शिक्षणतज्ञ भीमराया मेत्री, दिव्यांग क्रिकेटपटू ,विश्वचषक विजेते, कर्णधार गुरुदास राऊत हे मान्यवर अतिथी म्हणून उपस्थित होते.

यावेळी डीपीएस मिहान आणि कामठी रोड नागपूरच्या अध्यक्षा व प्रो- उपाध्यक्षा तुलिका केडिया, डीपीएस मिहान आणि कामठी रोडच्या संचालिका सविता जैस्वाल, डीपीएस कामठी रोडच्या प्राचार्या योगिता उमाळकर आणि इंद्रजित परगनिहा यांच्यासह पालकही उपस्थित होते. डीपीएस मिहानच्या प्राचार्या निधी यादव यांनी वार्षिक दिनाच्या कार्यक्रमात स्वागतपर भाषण केले.

सुश्री तुलिका केडिया, अध्यक्षा आणि प्रो उपाध्यक्षा, यांनी संदेशात पालकांनी खेळाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन ठेवला पाहिजे आणि खेळातील उत्कृष्टता हे शैक्षणिक उत्कृष्टतेच्या बरोबरीचे मानले पाहिजे यावर भर दिला. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या विजयालक्ष्मी बिदरी, यांनी आपल्या भाषणात, 'माझी शाळा सुंदर शाळा' पुरस्कार प्राप्त केल्याबद्दल विद्यार्थ्यांना अपवादात्मक पायाभूत सुविधा आणि व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल शाळा आणि व्यवस्थापनाचे अभिनंदन केले. डॉ. मेत्री यांनी आपल्या भाषणात संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढवण्यावर भर देण्याच्या शाळांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. गुरुदास राऊत यांनी शाळेबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या विविध कल्पक कलाकृती 'मोहक प्रवासवर्णन' या विषयावरील प्रदर्शन होते. सविता जैस्वाल यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभ हा शाळेतील सर्व विजेते आणि उत्तुंग कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी तसेच सह-अभ्यासक्रम सहभागासाठी पुरस्काराने सन्मानित करण्यात आला.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७७ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (16) रोजी शोध पथकाने 77 प्रकरणांची नोंद करून 47,800/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 21 प्रकरणांची नोंद करून 8,400/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 8 प्रकरणांची नोंद करून 3,200/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 4,000/- रुपयांची वसुली करण्यात आली.

वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 16 प्रकरणांची नोंद करून 19,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे बांधणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000 रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/ रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक ठिकाणी रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी बांधकामाचा मलबा / टाकवू कचरा टाकणे साठवणे या अंतर्गत 2 प्रकरणांची नोंद करून 2,000 रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 21 प्रकरणांची नोंद करून 4,200/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 5 प्रकरणांची नोंद करून 5,000/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. सुंदर ऑर्चिड यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. वेनचर बि ॲड बि यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मे. चेकर्स यांनी सेव्हर लाइन ब्लॉकिज मुळे त्यांच्यावर रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. हनुमान नगर झोन अंतर्गत मे. श्री कृपा रेसिडेन्सी यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्याच्याकडेला टाकल्याबद्दल रू. 10,000/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. योगिता स्विट भंडार यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. शाहु कबाड यांनी भंगार रस्त्याच्या कडेला पसरल्यामुळे रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. तसेच मे. अरूण किराणा शॉप यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. 5,000/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. उपद्रव शोध पथकाने 7 प्रकरणांची नोंद करून रू. 50,000/- दंड वसूल केला.

# ३० मोर्चेकरी अन् तिप्पट पोलिस तरीही फोडला घाम

## टेकडी मार्गावर दिव्यांगांच्या मोर्चात तणाव, बॅरिकेड्सवर आदळली वाहने



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विदर्भ विकलांग संघर्ष समितीच्या बॅनरखाली दिव्यांग बांधवांनी विधान भवनावर हल्ला बोल केला.

या मोर्चात केवळ 30 ते 40 जण असले तरी त्यांनी संख्येने तिप्पट असलेल्या पोलिसांना चांगलाच घाम फोडला होता. मोर्चेकऱ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून काही वेळासाठी पोलिसांची चांगलीच तारांबळ उडाली होती. गत 15 वर्षांपासून विदर्भ प्रदेशाध्यक्ष गिरीधर भजभुजे यांच्या नेतृत्वात विधीमंडळावर मोर्चा काढला जात आहे. त्यामुळे बंदोबस्तात असलेल्या पोलिसांना मोर्चेकऱ्यांविषयी चांगली माहिती आहे. त्यादृष्टीकोणातून पोलिसांची तयारी होतीच. परंतू 2 तासातच तणावाची स्थिती निर्माण होईल, असा विचारही कोणी केला नव्हता. रात्री उशिरापर्यंत हा मोर्चा टेकडी मार्गावर ठाण मांडून होता.

यशवंत स्टेडियम येथून निघालेल्या मोर्चात केवळ 30 ते 40 दिव्यांग बांधव स्वतःच्या वाहनाने सहभागी झाले होते. टेकडी मार्गावर मोर्चा अडविल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी प्रचंड नारेबाजी करीत लक्ष वेधून घेतले. संधी मिळताच गिरीधर भजभूजे आपल्या सहकाऱ्यांसह दुसऱ्या मार्गाने मॉरिस टी पॉइंट चौकापर्यंत पोहोचले. हे दृष्य पाहून पोलिसांची तारांबळ उडाली. डीसीपी शशिकांत सातव, एसीपी अतुल सबनिस आणि नरेंद्र हिवरे सतर्क झाले आणि त्यांना मोर्चात परत आणले. या दरम्यान मोर्चेकऱ्यांनी केक कापून एका सहकाऱ्याचा वाढदिवसही साजरा केला. मात्र सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास अचानक मोर्चेकऱ्यांनी प्रचंड नारेबाजी करीत बॅरीकेट्सवर वाहन आदळण्यास सुरूवात केली.

बॅरीकेट्स खाली पाडण्याचा प्रयत्न केला. प्रचंड गोंधळ आणि तणावाची स्थिती पाहून टेकडी मार्ग मोर्चा पॉइंटवरील सर्व अंमलदार सज्ज झाले. दरम्यान काही मोर्चेकरी रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला गेले. नारेबाजी करीत रस्ता अडविला. तासभर तणावाची स्थिती होती. पोलिसांनी मोठ्या कौशल्याने परिस्थिती हातळली.

**उपमुख्यमंत्री शिंदे यांची भेट घालून देण्याची मागणी**

संघर्ष समितीचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष भजभुजे यांनी सांगितले की, गत 15 वर्षांपासून बस स्थानकाजवळ स्टॉल देण्याची मागणी केली जात आहे मात्र दरवेळी केवळ आश्वासनच मिळत आहे. घर टॅक्समध्ये दिव्यांगांना 50 टक्के सूट केवळ ग्रामीण भागात लागू आहे. हे शहरातही लागू करण्यात यावे. संजय गांधी निराधार योजनेंतर्गत दिव्यांगांना मानधन 1500 रुपयांहून वाढवून 6 हजार रुपये करण्यात यावे. सरकारने दिवाळीत लाडक्या बहिणींना पैसे दिले मात्र अध्यार्हून अधिक दिव्यांग यापासून वंचित राहिले. सरकारकडून जारी जीआरनुसार 200 वर्ग फुटाची जागा तत्काळ देण्यासह विविध मागण्या घेऊन मोर्चेकरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी अडून होते.

रात्री उशिरापर्यंत त्यांनी टेकडी मार्गावर ठिय्या मांडला होता. मोर्चात चंद्रशेखर कुंभारे, मनोज बारापात्रे, गजानन डोमकावळे, कमल पद्मावत, प्रकाश जिवने, पवन राजपूत, अखिलेश तिवारी, राजेश लाडे, मिलिंद इंगळे, कमलाकांत मेश्राम यांच्यासह कार्यकर्त्यांचा समावेश होता.

### दिव्यांग शाळांना १०० टक्के अनुदान द्या

विनाअनुदानित दिव्यांग शाळांच्या धोरणानुसार तपासण्या तातडीने करून सर्व विनाअनुदानित पात्र शाळांना अनुदान देण्यात यावे, या प्रमुख मागणीसह इतरही मागण्यांकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास मंचच्या कार्यकर्त्यांनी विधीमंडळावर धडक दिली. संघटनेचे अध्यक्ष डॉ. आव्हाळ यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्त्यांनी यशवंत स्टेडियम येथून मोर्चा काढला. सीताबर्डी मार्गाने निघालेला मोर्चा टेकडी मार्गावर थांबविण्यात आला. शिष्टमंळाने दिव्यांग मंत्रालयाचे सचिव यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन दिले. आठ दिवसात प्रश्न सोडविण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला मिळाले. कंत्राटी कर्मचारी पहारेकरी, मदतनीस सफाईगार यांना 6 व 7 व्या आयोगानुसार 50 टक्के वेतनश्रेणी लागू करण्यात यावे, सोलापुरातील मुक्ताई मतिमंद मुलांचे बालगृहाची चौकशी करावी, आयुक्त कार्यालयाने थकीत वेतन प्रस्ताव पाठवून मंजूर करून घ्यावे, 123 दिव्यांग शाळांना 100 टक्के अनुदान द्यावे, गैरकारभाराची चौकशी करावी, 40 लाखांची लाच प्रकरणात नांदेडच्या जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याला बडतर्फ करावे, राज्यातील सर्व दिव्यांग शाळातील कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी आधार बेस बायोमेट्रीक प्रणालीचा वापर करावा, आदी मागण्या करण्यात आल्या. संघटनेच्या शिष्टमंडळाने दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव सचिदानंद सिंह यांची भेट घेऊन मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. याप्रसंगी दिलीप जेठे, किसन इंगोले, आनंद वाघ, संदीप बंदे, अनिकेत भोयर आदींचा समावेश होता.

# परभणी हिंसेमागे आंबेडकरी नव्हे, हिंदुत्ववादी संघटना : सुषमा अंधारे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :



मागील आठवड्यात परभणीमध्ये संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यावर संतप्त आंबेडकरी संघटनांनी बंद पुकारला होता. या बंद दरम्यान परभणीमध्ये हिंसाचार उसळला. याप्रकरणी शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी याप्रकरणी मोठा आरोप केला.

आंबेडकरी संघटनांनी शांतीपूर्ण बंदची हाक दिली होती मात्र यात काही हिंदुत्ववादी संघटनांनी तोडफोड करत आंबेडकरी चळवळीला बंद करण्याचा कट रचला आहे, असा आरोप अंधारे यांनी नागपूरमध्ये एका पत्रपरिषदेत केला.

संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्यावर आंबेडकरी संघटनांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस यांच्या उपस्थिती शांती बैठक घेतली.

जिल्हाधिकारी यांनी स्वतः बाबासाहेबांच्या पुतळ्याला हार घातला. या नंतर आंबेडकरी संघटना यांनी विरोध प्रदर्शित करण्याकरिता शांतीपूर्ण बंद पुकारण्याची घोषणा केली. ज्या दिवशी आंबेडकरी संघटना यांनी बंद पुकारला होता, त्याच दिवशी भाजपच्या वतीने बांगलादेशी हिंदूंसाठी मोर्चा काढण्यात आला. आंबेडकरी संघटनांनी पुकारलेला बंद दुपारपर्यंत शांतीत सुरू होता. मात्र दुपारनंतर भाजपच्या मोर्च्यात सहभागी काही लोकांनी निळे दुप्पटे घेत हिंसाचार केला. वरिष्ठ अधिकाऱ्यांना या बंदबाबत माहिती होती, त्यांनी प्रतिबंधात्मक उपाय करण्याची गरज होती.

आंबेडकरी चळवळीला बदनाम करण्यासाठी बंदच्या नावाखाली तोडफोड करण्यात आली, असा आरोप अंधारे यांनी केला. हिंसाचार कुणी केला? त्यांची चौकशी का होत नाही आहे? असे विविध प्रश्न अंधारे यांनी उपस्थित केले. पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशनच्या नावावर दलित तरुणांना अटक करत बेदम मारहाण केली. यात एका विधी क्षेत्रातील विद्यार्थ्याचा मृत्यू झाला.

# २१ रोजी डॉ. उदय मोगलेवार अभिष्टचिंतन सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

हिंगणा नगरीमध्ये वेणा व दुर्गा नदीच्या संगमावर बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष स्व.डॉ.सुधाकर मोगलेवार यांनी आपल्या हयातीत श्री.संत गाडगे गाडगे महाराज महाविद्यालय या नावाच जे रोपट लावल त्या रोपट्याच्या संगोपनासाठी आणि संस्थेच्या उत्तरोत्तर प्रगतीसाठी डॉ. उदय मोगलेवार यांनी आपल्या वडीलांना मोलाची सोबत केली. वडिलाच्या निधनानंतर बसवेश्वर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष या नात्याने ते मोठ्या प्रमाणात कष्ट घेत आहेत. कुणीही गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून त्यांना आर्थिक मदत करतात वडीलांचा वसा पुढे नेत विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण कसे देता येईल यासाठी नेहमी प्रयत्नशील राहतात.

या अशा एका चिरतरूण, दिलखुलास, कणखर, बाणेदार व्यक्तीमत्वाचे धनी डॉ. उदय मोगलेवार यांच्या एकसष्ठी निमित्त अभिष्ट चिंतनाचा सोहळा शनिवार दि. २१ डिसेंबर रोजी सकाळी १० वा. संत गाडगे महाराज महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजिक केला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष, डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी (पूर्वाध्यक्ष, अ.भा.म.साहित्य महामंडळ), उद्घाटक, मा. श्यामकुमार बर्वे (रामटेक मतदारसंघ), विशेष उपस्थिती अलका कुबल (सुप्रसिध्द मराठी अभिनेत्री), प्रमुख उपस्थिती डॉ.भाऊ दायदार, प्रा.विजया मारोतकर राहतील. याप्रसंगी सुधाकर अडबैले (शिक्षक आमदार) यांच्या हस्ते 'उदयश्री' या स्मरणिकेचे प्रकाशन होणार आहे.

तसेच नवनिर्वाचित आमदारांचा समीर मेघे (आमदार), विकास ठाकरे (आमदार), कृपाल तुमाणे (आमदार), अमोल मिटकरी (आमदार) यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

शिवाय व प्रदीपजी दाते (अध्यक्ष, वि.सा. संघ) यांच्या हस्ते श्याम देऊळकर (स्मृतीगंधा क्रिएशन अण्ड कम्युनिकेशन) निर्मित डॉ. उदय मोगलेवार यांच्या माहिती पटाचे प्रक्षेपण होईल.

डॉ.आरती मोगलेवार प्राचार्य डॉ.गणेश चव्हाण डॉ. गणेश मायवाडे डॉ. उल्हास मोगलेवार,डॉ.वामन खोब्रागडे,प्रा.धनंजय मेंढुले, डॉ.संजोग तुपे, डॉ. रितेश कोहळे,डॉ.अनिल चरडे,डॉ.संजय ढोक, डॉ. राजदिप उताणे,राजू कहालकर,संदीप हिवरकर, रोहित श्यामकुवर बर्वे ,मनोज रघटाटे,राहूल तिडके यांची उपस्थिती होती.

# ऐतिहासिक वाटचालीला अधोरेखित करणाऱ्या ग्रंथाची होणार निर्मिती : डॉ. नीलम गोऱ्हे

## ज्येष्ठ संपादक सुधीर पाठक यांच्या अध्यक्षतेखाली संपादकीय मंडळाची निर्मिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विदर्भ विकासासह अनेक सामाजिक प्रश्नांवर सभागृहात झालेल्या चर्चा ते लोकाभिमूख शासन निर्णयापर्यंतचा एक मैलाचा टप्पा नागपूर विधानभवनाने अनुभवला आहे. येथील कापूस उत्पादक शेतकऱ्यांपासून ते अनुशेषापर्यंत अत्यंत अभ्यासपूर्ण चर्चा हिवाळी अधिवेशनात झाल्या आहेत. याचा आढावा घेणारा परिपूर्ण संदर्भ ग्रंथ साकारावा असा मानस आहे. येथील तिन्ही पिढ्यांचा सहभाग असलेले सशक्त संपादक मंडळ या ग्रंथाची दिलेल्या मुदतीत अभ्यासपूर्ण निर्मिती करेल असा विश्वास विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केला.




येथील विधानभवनात नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाचे वृत्तांकन करणारे ज्येष्ठ पत्रकार, संपादक यांची विशेष बैठक उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी निमंत्रीत केली होती. त्यांच्या अध्यक्षतेखाली विधानभवनातील राष्ट्रकुल समिती सभागृहात झालेल्या या बैठकीस विधानभवनचे सचिव 2 (कार्यभार) विलास आठवले, वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राचे संचालक निलेश मदाने, नागपूर विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे, माजी संपादक सुधीर पाठक, नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्रा, लोकमतचे संपादक श्रीमंत माने, महाराष्ट्र टाईम्सचे संपादक श्रीपाद अपराजित, तरुण भारतचे संपादक गजानन निमदेव, पुण्य नगरीचे संपादक रमेश कुलकर्णी, ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर दुपारे, आनंद निर्वाण, विश्वास इंदुलकर, शैलेश पांडे, महेश उपदेव, रवी गुळकरी, विकास वैद्य, वैभव गांजापुरे व इतर सन्माननिय पत्रकार उपस्थित होते. या संपादक आणि ज्येष्ठ पत्रकारांनी आपले योगदान देण्याचे सहर्ष मान्य केले.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशने - विधानपरिषदेतील ऐतिहासिक पाऊलखुणा या ग्रंथाच्या परिपूर्ण निर्मितीसाठी संपादकीय मंडळ निश्चित करण्याचा सर्वांच्या वतीने निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ज्येष्ठ पत्रकार सुधीर पाठक यांच्या अध्यक्षतेखाली संपादकीय मंडळ बैठकीत जाहीर करण्यात आले. यात प्रदीप मैत्र, कार्याध्यक्ष, श्रीपाद अपराजित, श्रीमंत माने, गजानन निमदेव, रमेश कुलकर्णी, शैलेश पांडे, भुपेंद्र गणवीर, महेश उपदेव, प्रभाकर धुपारे, मनिष सोनी, आनंद निर्वाण, विकास वैद्य आणि नागपूर व अमरावती विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे. समन्वय संपादक निलेश मदाने यांचा समावेश आहे. आवश्यक तो विस्तार यात चर्चेनुसार केला जाईल असेही स्पष्ट करण्यात आले.

या प्रस्तावित ग्रंथासंदर्भात चर्चा करताना यातील मजकूर हा संशोधन व संदर्भाच्या दृष्टीने पूरक असावा असा सवार्नुमते निर्णय घेण्यात आला.

# स्वरतरंगद्वारा हिट्स ऑफ शम्मी कपूर अँड आशा पारेख




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

स्वरतरंगद्वारा हिट्स ऑफ शम्मी कपूर अँड आशा पारेख या कार्यक्रमाचे मंगळवार 17 रोजी आयोजन करण्यात आले असून यात सुप्रसिद्ध कलाकार शम्मी कपूर आणि आशा पारेख यांची सदाबहार गाणी सादर केली जातील.

साऊथ अंबाझरी रोड येथील मुंडले सभागृहात संध्याकाळी 6.30 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन गायक निरंजन बोबडे यांचे आहे. त्यांच्यासह यात गौरी शिंदे, लक्ष्याती काजलकर आणि पूजा टिकेकर हे गायक गाणी सादर करणार असून कार्यक्रमाचे संचालन शुभांगी रायलू करणार आहेत. या कार्यक्रमाच्या निःशुल्क प्रवेशिका सोमवार16 रोजी संध्याकाळी 5 वाजतापासून लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात उपलब्ध राहणार आहेत. श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले.

# चाकूसह तरुणास केली अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

एमआयडीसी पोलिसांनी गस्तीदरम्यान मिळालेल्या माहितीवरून एका तरुणाला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकू मिळाला. पोलिसांनी चाकू जप्त करून तरुणाला अटक केली. अंकुर अविनाश सहारे (24) रा. काचीपुरा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. रविवारी दुपारी एमआयडीसी ठाण्याचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान जयताळा मार्गावर भाऊचा धक्का हॉटेलजवळ एक तरुण शस्त्र घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांचे पथक परिसरात पोहोचले. अंकुरला ताब्यात घेऊन झडती घेतली असता चाकू मिळाला. पोलिसांनी आर्म्स ॲक्ट आणि मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविला.

# बीड येथील प्रकरणातील आरोपींवर कडक कारवाई करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील घटना गंभीर असून यास सरकारने गांभीयार्ने घेतले आहे. संबंधीत आरोपी व दोषी पोलीसांवर कारवाई करण्यात आली असून या प्रकरणातील आणखी कोणी दोषी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी 289 अन्वये उपस्थित केलेल्या बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येविषयीच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या घटनेसाठी सीआयडीची एक विशेष एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तांत्रिक व कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार असून फरार आरोपींना लवकरच पकडण्यात येईल. या प्रकरणात एका पोलीस अधिकाऱ्यांस सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून एकास निलंबित करण्यात आले आहे. आरोपी कोणत्याही जाती, धमार्चा किंवा राजकीय पक्षाचा असला तरी तसेच कोणत्याही दबावाचा विचार न करता यासंदर्भात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# खासदार सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत 'जागर भक्तीचा' तिसरा दिवस

## परित्त देशना परित्राण पठणाने तथागतांना नमन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

नागपुरात सध्या शितलहर असून किमान तापमान सातत्याने घसरत असताना सुद्धा आज सकाळच्या सत्रात खासदार सांस्कृतिक महोत्सव अंतर्गत 'जागर भक्तीचा' या कार्यक्रमात हजारो बौद्ध बंधु-भगिनी, आबालवृद्धांनी परित्त देशना परित्राण पठणात सहभाग घेतला. यावेळी मंचावर भंते समूहाने उपस्थितांना परित्त देशना परित्राण पठण करून देतानाच त्याचा अर्थ देखील उलगडून सांगितला. जगात शांतता, स्थिरता, सौख्य, मनःशांती स्थपित व्हावी आणि याचा मानवाला लाभ व्हावा यासाठी आजचे आयोजन करण्यात आले.



तत्पूर्वी तथागत गौतम बुद्ध आणि परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पअर्पण करून बुद्ध वंदना घेण्यात आली. याचे नेतृत्व माजी मंत्री सुलेखा कुंभारे यांनी केले. यावेळी संस्कार भारतीच्या प्रमुख कांचन गडकरी, वंदना भगत, उषा पायलट, प्रमुख संयोजक धर्मपाल मेश्राम, सुभाष पारधी, डॉ. मिलिंद माने, अशोक मेंढे, संदीप जाधव, नितीन तेलगोटे, सतीश वाघ, एड. राहुल झांबरे प्रामुख्याने उपस्थित होते. याशिवाय अनुसूचित जाती मोचार्चे अध्यक्ष सतीश शिरस्वान, सुनील वाहाने, उपाध्यक्ष प्रदेश मोर्चा हिमांशू पारधी, नेताजी गजभिये, शंकर मेश्राम अशोक मोटघरे यांची देखील कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

परित्राण पाठाचा आध्यात्मिक फायदा तर आहेच पण त्याचबरोबर शारीरिक लाभ सुद्धा आहे. हृदयाची गती स्थिर ठेवण्यासाठी, मेंदूला योग्य व्यायाम होण्यासाठी परित्राण पाठाचा उपयोग केला जातो असे सांगून भंते यांनी उपस्थितांना गौतम बुद्ध यांनी जगाला दिलेल्या शांती आणि अहिंसेच्या विचारांचा उल्लेख केला.

# कडाक्याच्या थंडीत बेघरांना मनपाचा निवारा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १६ :

थंडीचा पारा दिवसेंदिवस घसरत आहे. अशा स्थितीत रस्त्यालगत, फूटपाथवर राहणाऱ्या भिक्षेकरी, बेघरांचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी नागपूर महानगरपालिका सरसावली आहे. नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून रस्त्यालगत, मोकळ्या ठिकाणी, फूटपाथवर राहणाऱ्या भिक्षेकरू, बेघरांची व्यवस्था बेघर निवारा केंद्रांमध्ये करण्यात येत आहे. या निवारा केंद्रांच्या माध्यमातून बेघरांना निवाऱ्यासोबतच औषधोपचार आणि व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणले जात आहे.



मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निदेर्शानुसार व अतिरिक्त आयुक्त श्रीमती आंचल गोयल यांच्या मार्गदर्शनात शहरातील विविध भागातील बेघर निवारा केंद्रांच्या माध्यमातून आतापर्यंत ८४३ भिक्षेकऱ्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्यात यश आले आहे.

मनपाद्वारे शहरातील भिक्षेकरी व रस्त्यावर राहणाऱ्या तसेच फुटपाथवर झोपणाऱ्या बेघरांना शोधून त्यांना मनपाच्या निवाऱ्यांमध्ये नेण्यात येत आहे. सदर शोध मोहिम सामाजिक सुरक्षा पथक, पोलिस सोबत मिळून राबविण्यात येत आहे. नागपूर शहरातील मिठा नीम दर्गा, संविधान चौक, रेल्वे स्थानक परिसर, सीए रोड, मेयो हॉस्पिटल, अग्रेसन चौक, धार्मिक स्थळे अशा विविध भागांमधून सोमवारी (ता.१६) १९ निराश्रीत बेघर आणि भिक्षेकरींना शोधून मनपाच्या निवारागृहात आणून आश्रय देण्यात आले आहे. महापालिकेच्या वाहनांतून व पोलीस सामाजिक सुरक्षा विभागाचे वाहनातून बेघर निवाऱ्यापर्यंत सोडण्याची सोय करण्यात आली आहे. निवारागृहात पाणी, स्वच्छतागृह, गादी, चादर, कपडे, सुरक्षा, भोजन आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. लाभार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत आहे व आवश्यक तो औषधोपचार करण्यात येत आहे. यामुळे बेघर व निराधारांना मनपा निवारा केंद्राचा मोठा आधार मिळत आहे.

केंद्र शासनाच्या स्माईल या प्रकल्पाद्वारे नागपूर महानगरपालिकेद्वारे बेघर निवारा केंद्र शहरातील विविध भागांमध्ये चालविण्यात येत आहेत. शहरातील विविध भागामध्ये कार्यरत बेघर निवारा केंद्रामध्ये सध्या १३८ भिक्षेकरी लाभ घेत आहेत. नागपूर महानगरपालिकेद्वारे भिक्षेकरी सर्वेक्षण करण्यात आले होते. या अंतर्गत जवळपास १६९१ भिक्षेकऱ्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते. भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग यांच्यामार्फत भिक्षेकरी लाभार्थ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत राष्ट्रीय स्तरावर मोहीम राबविण्याकरिता दिल्ली, कोलकत्ता, मुंबई, चेन्नई, बेंगलुरु, हैद्राबाद, नागपूर, पटना, लखनऊ व इंदोर अशा १० शहरांची निवड करण्यात आली होती. त्यानुसार २३ फेब्रुवारी २०२१ ला नागपूर शहरातील भिक्षेकऱ्यांचे सर्व्हेक्षणाचे काम हातात घेण्यात आले होते. हे सर्वेक्षण जिओ टॅग, बायो-मॅट्रिक थंब इंप्रेशन द्वारे करण्यात आले.

मनपाद्वारे निर्माण करण्यात आलेल्या बेघर निवारा गृहाच्या संचालनासाठी ई-निविदा प्रक्रियेतून संस्थांची निवड करण्यात आली आहे. सह्याद्री ग्रामीण विकास बहुउद्देशीय युवक कल्याण संस्था नागपूर, संस्कृती महिला व बालविकास बहुउद्देशीय संस्था मनिष नगर, वैष्णवी बहुउद्देशीय शिक्षण संस्था नागपूर, परमात्मा एक बहुउद्देशीय शिक्षण संस्था तांडापेठ या संस्थांद्वारे निवारागृहाची जबाबदारी सांभाळण्यात येत आहे. सर्व संस्थाच्या बेघर निवारागृहांची एकूण क्षमता ही एकूण ४३० आहे. मनपाद्वारे २८ जानेवारी २०२२ रोजी सर्वप्रथम सह्याद्री ग्रामीण विकास बहुउद्देशीय युवक कल्याण संस्थाची निवड करण्यात आली. या संस्थेद्वारे १५० पुरूष भिक्षेकरी क्षमतेचे निवारागृह संचालनाची जबाबदारी सोपविण्यात आली. पुढे केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग यांच्यामार्फत स्माईल या प्रकल्पाची सुरूवात करण्यात आली.